◆ मे २००७
◆ वर्ष सातवे
◆ अंक पाचवा

# मेहता मराठी ग्रंथजगत

— अनुक्रमणिका —

| | |
|---|---|
| **संपादकीय** - | ४ |
| **साहित्यवार्ता** | ८ |
| **विशेष वार्ता** | २६ |
| **सुधा मूर्ती - मुलाखत** | ३० |
| **पुस्तक परिचय** | |
| **मन्नो :** मंजूषा आमडेकर | ३९ |
| **सोन्याचा पाऊस :** मंजूषा आमडेकर | ४३ |
| **खेळ खेळा चित्रे रंगवा :** रमेश मुधोळकर | ४९ |
| **बंटूचा टिकटिक मित्र :** राजीव तांबे | ५५ |
| **ठकुबाई ठेंगे :** अरुंधती महाम्बरे | ५९ |
| **आजीचा धडा :** शकुन्तला फडणीस | ६४ |
| **नशीबवान शेखर :** वृषाली पटवर्धन | ६८ |
| **इमानी कुत्रा :** शरद दळवी | ७१ |
| **घड्याळातली कोकिळा :** निर्मला मोने | ७६ |
| **साधंसुधं :** प्रमोदिनी वडके-कवळे | ८३ |
| **पुरस्कार** | ८७ |
| **वाचकांचा प्रतिसाद** | ९२ |
| **श्रद्धांजली** | ९७ |

संपादक :
सुनील मेहता

कार्यकारी संपादक :
शंकर सारडा

संपादन सहाय्य :
अनिरुद्ध पाटील

विशेष सहाय्य :
माया वळामे
मुग्धा कुलकर्णी

अंकाची किंमत १५ रु.

वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने पाठवावी.

प्रसिद्धी
दरमहा १५ तारखेस

मांडणी-अक्षरजुळणी :
*मेहता पब्लिशिंग हाऊस*

संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर, पुणे-४११ ०३०.
फोन : २४४७६९२४ फॅक्स :०२०-४४७५४६२
Email - mehpubl@vsnl.com
Website - mehtapublishinghouse.com

**वार्षिक वर्गणी १५० रु. तीन वर्षाची ३५०रु. पाच वर्षाची ५००रु.**
**३ किंवा ५ वर्षासाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट !**

*या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.*

## संपादकीय

# आपले बालसाहित्य आणि आपण

'मेहता मराठी ग्रंथजगत' चा 'मे' महिन्याचा हा अंक बालसाहित्यावर लक्ष केंद्रित करणारा आहे. गेल्या दोन वर्षांत 'मेहता पब्लिशिंग हाऊस'तर्फे बहुरंगी आकर्षक बालकथांच्या निर्मितीवर भर देण्यात येत असून नव्याजुन्या बालसाहित्यकारांची सुमारे तीस पुस्तके प्रकाशित करण्यात आली आहेत. त्याआधीही अमर चित्रकथा तसेच बिरबल, तेनालीराम, हितोपदेश, पंचतंत्र इत्यादी कथांची बहुरंगी छपाई असलेली बरीच पुस्तके आम्ही काढलेली होती. फ्रँकफर्टच्या ग्रंथजत्रेत जागतिक बालवाङ्मयाचे जे भव्य दर्शन घडले त्यामुळे मराठीतही आपण जाणीवपूर्वक बालवाङ्मय काढायला हवे हे मनावर बिंबले आणि त्या दृष्टीने प्रारंभिक जुळणी सुरू करण्यात आली.

दहावीस वर्षांपूर्वीची बालकथांची पुस्तके बहुतांशी डेमी अष्टपत्री आकारातील एकरंगी असत. बत्तीस ते चौसष्ट पृष्ठांची, वेगवेगळ्या पुनर्निवेदित कथांचे संकलन असणारी ही पुस्तके १४ पॉइंट बोल्ड (वा १६, १८ पॉइंट) अशा मोठ्या टाइपात छापत. त्यात कथांना अनुसरून काही चित्रे असत; किंमतही दोन,तीन ते दहा रुपये या दरम्यान असे. त्या वेळी वाचकांच्या अपेक्षाही माफक असत आणि बालसाहित्यावर फार खर्च करण्याकडे पालकांचा कलही नसे. कधी कधी दोन रंगी आतील छपाई करण्याची चैन काही प्रकाशक दाखवत. कवितांच्या पुस्तकात एका रंगाची काही डिझाइन्स आधी छापत आणि त्यावर काळ्या शाईत मजकूर वा कविता– म्हणजे मुद्रणदृष्ट्या फार अफलातून गोष्ट केली असे समाधान लेखक-प्रकाशकांना वाटे. डबल क्राऊन अष्टपत्री हा मोठा आकार– म्हणजे त्यापुढची झेप! तशा आकारात दोन रंगी कवितासंग्रह निघाला की विंदा करंदीकर, मंगेश पाडगावकर, वसंत बापट वगैरे अग्रगण्य कवीही संतुष्ट असत. मौज, पॉप्युलर वगैरे काही मान्यवर प्रकाशकच असे बालसाहित्यकारांचे लाड करीत. बाकीचे आपले सरधोपट पुस्तके काढून शाळेच्या स्नेहसंमेलनात बक्षीसासाठी अशी पुस्तके शेकड्याने विकण्यात धन्यता मानत.

आता मात्र बालसाहित्याकडे पाहण्याचा पालकांचा, शिक्षकांचा, लेखक-



प्रकाशकांचा दृष्टिकोन बदलू लागला आहे. जागतिकीकरणाच्या लाटेमुळे इंग्रजीतील अग्रगण्य प्रकाशनसंस्था भारतीय बाजारपेठेची अवाढव्य क्षमता बघून भारतात आपले हातपाय पसरण्यासाठी उत्सुक आहेत. इंग्रजी हा विषय प्राथमिक शाळांपासून शिकवला जात असल्याने, भारतातल्या कोट्यवधी मुलांच्या हाती आपली पुस्तके जाऊ शकली तर कोट्यवधी रुपयांची कमाई होऊ शकेल, हे साधे गणित आता सर्वांनाच चक्रावून टाकत आहे. ओरिएंट लाँगमन, मॅकमिलन, ऑक्सफर्ड वगैरेंची शालेय पुस्तके आणि बालसाहित्य आपल्याकडे आधीपासूनच आहे. आता स्कोलॅस्टिक,डिस्ने वगैरेंनी भारतीय बाजारपेठेत मुसंडी मारली आहे.त्यांची मूळची इंग्रजी पुस्तके तर त्यामुळे सर्वत्र सहज उपलब्ध होत आहेतच. त्याशिवाय त्या पुस्तकांची प्रादेशिक भाषांतील भाषांतरेही काढण्यासाठी अनेक उपक्रम राबवले जात आहेत. अनेक परदेशी प्रकाशक आपल्या बालवाङ्मयाचे भारतातील प्रकाशनाचे हक्क देण्यासाठी आता उत्सुक आहेत.


केवळ पुस्तकांपुरतेच हे मर्यादित राहिलेले नाही. दूरचित्रवाणीवर डिस्ने, पोगो वगैरे चॅनल्सही कार्टून्स, कॉमिक्स, चित्रपट भारतीय भाषांत डब करून दाखवत आहेत. मिकी माऊस, टॉम अँड जेरी, स्पायडरमॅन, सुपरमॅन, पोकेमॅन वगैरेंचा दैनंदिन खुराक आपल्या मुलाबाळांना घरबसल्या मिळतो आहे, या सर्वांचा मुलामुलींच्या भावजीवनावर आणि जीवनशैलीवर जो प्रभाव पडणार आहे तो एक वेगळाच अभ्यासविषय ठरेल. परंतु आजची आपली मुले जागतिकीकरणाच्या या लाटेत नव्या मानसिकतेत वाढणार आहेत हे आता विसरून चालणार नाही. परदेशातील परीकथा, लोककथा, क्लासिक्स, ज्ञान व मनोरंजनाची पुस्तके, चरित्रे, विज्ञानविषयक पुस्तके पूर्वी संपादित, अनुवादित वगैरे स्वरूपात मराठीत येत होतीच. ती त्या लेखकाच्या मगदुराप्रमाणे व भाषाप्रभुत्वाप्रमाणे कमीअधिक समाधान देत; यापुढच्या काळात ही प्रक्रिया अधिक साक्षेपाने व सराईतपणे व्हायला हरकत नाही. त्यादृष्टीने उत्तम अनुवादक, रूपांतरकार, भावानुवादक, भाषांतरकार यांची गरजही यापुढे अधिक असणार आहे. स्पर्धात्मक वातावरणामुळे ही रूपांतर-अनुवादाची कामे कार्यक्षमतेने करणाऱ्या व्यक्तींना महत्त्व प्राप्त होईल. कार्टून्स-कॉमिक्सचे डबिंग आणि सबटायटल्स यासाठीही कलावंतांची गरज भासेल. मूळ इंग्रजीप्रमाणेच फ्रेंच, रशियन, जपानी, जर्मन, चिनी वगैरे भाषांच्या जाणकारांनाही त्यामुळे मागणी राहील. विद्यापीठातून अनुवाद-भाषांतरविद्या विभागांचीही अधिक सोय यापुढे करावी लागेल.

युनेस्कोच्या माध्यमातून भारतासारख्या आशियाई देशांत सर्व शिक्षा अभियानाला प्रोत्साहन मिळत आहे. युनेस्कोकडून त्यासाठी शेकडो कोटी रुपये उपलब्ध होत

आहेत. त्यामध्ये राज्य सरकारांनीही त्या अनुदानाएवढ्या रकमेची तरतूद करावी अशी अपेक्षा आहे. या अभियानाच्या अंतर्गत निरंतर शिक्षण योजना, खडू-फळा योजना, विज्ञानसाहित्य योजना वगैरे उपक्रम राबवले जात आहेत. त्याबाबत इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्र मागे आहे असे दिसून येते. शासकीय यंत्रणेने त्या योजनांची कार्यवाही सुविहितपणे व वक्तशीरपणे केली तर मराठीत उत्तम बालसाहित्य आणि नवसाक्षरोपयोगी साहित्य तयार होण्यास अवसर मिळेल. अशा योजनांसाठी सध्या फार कमी कालावधी दिला जातो. त्यामुळे नवीन पुस्तकांची योजनापूर्वक निर्मिती करण्यासाठी वेळ मिळत नाही. इंग्रजी पुस्तकांच्या खरेदीत तर दिल्लीतल्या प्रकाशकांनाच मोकळे कुरण मिळते. किंमतीबाबतचे व कमिशनबाबतचे शासकीय धोरणही चांगल्या निर्मितीला खीळ घालते. पुरवलेल्या मालाची बिले आणि अनामत रकमा परत देतानाही फार दीर्घसूत्रीपणा दाखवला जातो. मागच्या निरंतर शिक्षण योजनेसाठी अनामत रक्कम घेतलेले डीडी दोन वर्षांनी तसेच परत देण्यात आले; काही जिल्हा परिषदांनी ते अजूनही परत दिलेले नाहीत. शासकीय यंत्रणांनी सुविहितपणे कामे केली तर बालवाचक, प्रौढ साक्षर यांना सर्व शिक्षा अभियानाचा खरा फायदा मिळू शकेल; आणि मराठीत त्यासाठी उत्तम साहित्य निर्माण करण्याला चालना मिळू शकेल. सर्व शिक्षा अभियानाच्या मूळ हेतूलाच खो मिळेल असे सध्याचे वातावरण आहे. मराठी भाषेच्या व साहित्याच्या अभिवृद्धीच्या दृष्टीने हे वातावरण उपकारक ठरावे असा प्रयत्न व दृष्टिकोन असला पाहिजे.

बालसाहित्याच्या निर्मितीत प्रकाशन संस्थांची भूमिका सर्वात प्रभावशाली ठरते. लहानमोठे कोश, चरित्रे, माहितीपूर्ण पुस्तके, संक्षिप्त कादंबऱ्या, विज्ञानाची पुस्तके, बालगीते, बालनाट्ये, कथा कादंबरी, मजकूर कमी आणि चित्रे भरपूर असणारी पिक्चर बुक्स वगैरे मालिकांची वयोगटानुसार आखणी करून जाणत्या लेखक-चित्रकारांच्या मदतीने त्यांचे सुयोग्य संपादन करणे हे काम प्रकाशनसंस्थांच्या पुढाकारानेच होऊ शकते. केवळ लेखक वा केवळ चित्रकार आपल्या बळावर अशा योजना राबवू शकत नाहीत. अशा योजनापूर्वक काढलेल्या बालसाहित्यालाच भावी काळात मागणी राहील. हे आव्हान आपण कसे स्वीकारतो यावर सर्व काही अवलंबून आहे.

मराठी बालसाहित्य आशयदृष्ट्या आणि निर्मितीदृष्ट्या अधिक कसदार, दर्जेदार व्हावे यासाठी यापुढच्या काळात नेटाने प्रयत्न व्हायला हवेत.






**श्री संत रामदास यांच्या जन्मचतु:शताब्दीनिमित्त**
**आमचे वैभवशाली प्रकाशन**

# ।। सुलभ दासबोध ।।

सौ. चारुशीला भिडे यांनी केलेले
संपूर्ण दासबोधाचे रसाळ निरुपण




**किंमत : ५०० रुपये. सवलतीत : ४५० रुपये.**

पृष्ठे - डबल डेमी ५४२, पुठ्ठा बाईंडिंग

**आमच्या खर्चाने रजिस्टर पोस्टाने अथवा कुरियरने घरपोच पाठवू.**

**पत्ता**
**राजश्री प्रकाशन**
हेमि क्लासिक, एलोरा पॅलेस चौक, पुणे-सातारा रोड, बालाजीनगर, धनकवडी, पुणे ४११ ०४३. **फोन नं. २४३७१०२६/२४३७४४९८**

# साहित्यवार्ता

## * जर्मनीपाठोपाठ फ्रान्समध्ये भारतीय साहित्याचा बहुमान

'सॅलोन दु पारि' या फ्रान्समधील ग्रंथप्रदर्शनात यंदा भारत सन्माननीय पाहुणा होता. यानिमित्ताने अनेक भारतीय लेखकांना फ्रेंच साहित्यरसिकांशी संवाद साधता आला.

गेल्या वर्षी जर्मनीतील फ्रँकफुर्ट येथे जगातील सर्वात मोठे पुस्तक प्रदर्शन भरले होते. त्या वेळी भारताला प्रमुख पाहुणा म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. यंदा 'सॅलोन दु पारि २००७' हे प्रदर्शन व्हर्साय येथे भरले होते. फ्रान्सचे पंतप्रधान डोमिनिक दि विलेपिन यांच्या हस्ते २३ मार्च रोजी प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. ते २७ मार्चपर्यंत चालले.

यंदा प्रदर्शनाचे २७ वे वर्ष होते. दरवर्षी या प्रदर्शनात एका देशाला सन्माननीय पाहुणा असा बहुमान देण्यात येतो. भारताला हा मान मिळण्याची ही प्रथमच वेळ होती. या प्रदर्शनासाठी ३० भारतीय लेखकांना आमंत्रित करण्यात आले होते. त्यात यू. आर. अनंतमूर्ती, विक्रम सेठ, शशी देशपांडे, अमित चौधरी, तरुण तेजपाल, शशी थरूर, मुशीरुल- हसन, अल्ताफ टायरवाला, उपमन्यू चटर्जी, पवन के. वर्मा, एम. टी. वासुदेवन नायर आणि गोपीचंद नारंग यांचा समावेश होता.

'सेंटर नॅशनल दु लिव्र' या मध्यवर्ती संस्थेने हे प्रदर्शन आयोजित केले होते. प्रदर्शनाच्या काळात छायाचित्र प्रदर्शन, राजस्थानी लोककलावंतांचे सादरीकरण आदी उपक्रम भारतातर्फे झाले.

## * 'फकिरा' आता मराठी पडद्यावर!

अण्णा भाऊ साठे यांच्या 'फकिरा' कादंबरीवरील चित्रपटाचा मुहूर्त गुढीपाडव्याच्या दिवशी पुण्यात कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांच्या हस्ते करण्यात आला.

या वेळी निर्माते प्रवीण लावंड, निर्मिती आलेखक विवेक वाघ, दिग्दर्शक सुनील नाईक, कलाकार अरुण नलावडे, राहुल सोलापूरकर, लीना भागवत, प्रकाश धोत्रे, संगीतकार आनंद मोडक, कार्यकारी निर्माते अभय भगत आदी उपस्थित होते.

अण्णा भाऊ साठे यांच्या 'फकिरा' कादंबरीवर चित्रपट निर्माण करणे, हे



शिवधनुष्य असून ते पेलण्यात सेवागिरी फिल्मस्‌ला यश येवो, अशा शुभेच्छा डॉ. नरेंद्र जाधव यांनी दिल्या.

## * 'विंदां'वर दोन माहितीपट

ज्ञानपीठ पुरस्कारविजेते ज्येष्ठ कवी विंदा करंदीकर यांचे बालकाव्य आणि अन्य कविता यांचे जतन करण्यासाठी दोन स्वतंत्र माहितीपट डॉ. माधवी वैद्य यांनी तयार केले आहेत.

चित्रीकरणाकरिता सेनापती बापट रस्त्यावरील 'अक्षरनंदन' प्रशालेतील विद्यार्थ्यांसमोर विंदांचे काव्यवाचन झाले. प्रत्येकी तीस मिनिटे लांबीचे हे माहितीपट 'आर्या कम्युनिकेशन्स'तर्फे निर्माण केले गेले आहेत. विंदांना ज्ञानपीठ पुरस्कार मिळाल्यानंतर 'मनस्वी कवी विंदा' हा माहितीपटही बनवला होता.

*एक झुरळ रेडिओत गेले*
*गवई होऊन बाहेर आले*

अशा खट्याळ कविता विंदांकडून ऐकताना मुलांच्या कोवळ्या, निरागस चेहऱ्यांवर काहीतरी वेगळे गवसल्याचा आनंद दिसत होता. या वेळी विंदांनी 'बाताराम', 'पऱ्यांच्या गप्पा' आदी कविता सादर केल्या. मुलांच्या कवितांनंतर विंदा मोठ्यांच्या कवितांकडे वळले. त्यास शिक्षकांचा प्रेक्षकवर्ग लाभला. 'कसा मी कळेना?', 'तेच ते नि तेच ते', 'माझ्या मना बन दगड', 'असेच होते म्हणायचे तर', 'लागेल जन्मावे पुन्हा' आदी कविता त्यांनी सादर केल्या.

## * मर्ढेकरांच्या कवितांना संगीताचा साज

आधुनिक मराठी कवितेचे जनक बाळ सीताराम मर्ढेकर यांनी मराठी कवितेचे व्याकरणच बदलून टाकले. त्यांच्या निवडक १५ कवितांना संगीतकार सुरेंद्र अकोलकर चाली देत आहेत. 'पितात सारे गोड हिवाळा' ही हिवाळ्यातील सकाळचे मुंबैतल्या बंदराचे वर्णन करणारी रचना त्यांनी पाश्चात्त्य संगीताचा बाज वापरून 'टाइम्स म्युझिक'साठी संगीतबद्ध केली.

'पितात सारे गोड उन्हाळा' हे गीत आघाडीचे गायक रवींद्र साठे यांनी गायले आहे. 'फलाटदादा फलाटदादा, किती तरी दिवसांत नाही चांदण्यात गेलो' आणि 'आला आषाढ श्रावण' इत्यादींचा अल्बममध्ये समावेश आहे.

या अल्बमचे संगीत पुण्यातल्या सॉनिक स्टुडिओमध्ये तयार होत आहे. प्रत्यक्ष गाणी मुंबईत रेकॉर्ड होणार आहे.

मर्ढेकरांच्या कवितांना चाली लावण्याचा प्रयत्न यापूर्वी पु. ल. देशपांडे यांनी केला होता असे समीक्षक डॉ. द. भि. कुलकर्णी यांनी सांगितले. ते म्हणाले की, मुळात चिंतनशील असणारी मर्ढेकरांची कविता तिच्या व्यापक अर्थासकट गीतातूनही प्रकट होत असेल तर ती स्वागतार्ह बाब आहे.

## * सी-डॅकचे प्रादेशिक भाषा 'सर्च इंजिन'

कोणत्याही मजकुराचे प्रादेशिक भाषांमध्ये भाषांतर करणारी 'जिस्ट' नावाची संगणकप्रणाली तयार केल्यानंतर प्रगत संगणन केंद्रातर्फे (सी-डॅक) आता प्रादेशिक भाषांमधील 'सर्च इंजिन' कार्यान्वित करण्यात येणार आहे.

'सी-डॅक'चा विसावा वर्धापनदिन १९ मार्च रोजी साजरा करण्यात आला. भारतीय भाषांमधील 'सर्च इंजिन' विकसित करण्यासाठी गुगल आणि याहू यांसारख्या विख्यात 'सर्च इंजिन' कंपन्यांशी बोलणी चालू आहे. हे तंत्रज्ञान विकसित केल्यानंतर या कंपन्यांच्या सहकार्याने ते 'नेटिझन'पर्यंत पोचविण्यात येईल.

गेल्या तीन वर्षांपासून 'सी-डॅक'चे तज्ज्ञ या प्रकल्पावर काम करीत आहेत. त्यामध्ये संगणक विषयातील ७० तज्ज्ञ आणि ३० भाषातज्ज्ञांचा समावेश होता.

वर्धापनदिनानिमित्त आयोजित समारंभात केंद्रीय माहिती-तंत्रज्ञान खात्याच्या संशोधन व विकास विभागाचे सल्लागार डॉ. ए. के. चक्रवर्ती यांचे भाषण झाले. 'सी-डॅक'चे महासंचालक एस. रामकृष्णन आदी उपस्थित होते.

माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात झपाट्याने प्रगती होत असल्याने भविष्यातील वेध घेण्याची गरज आहे, असे सांगून डॉ. चक्रवर्ती म्हणाले की, ई-समाजाची निर्मिती करण्यासाठी ११ व्या पंचवार्षिक योजनेमध्ये विविध उपक्रम जाहीर करण्यात आले आहेत. ई-प्रशासनावर सध्या भर देण्यात असून त्यानंतर ई-आरोग्य, ई-शिक्षण आदी सुविधा विकसित करण्यात येणार आहेत.

## * रांगणेकर जन्मशताब्दी समिती

केवळ मराठी रंगभूमीला आधार न देता तिला नव्याने घडवणारे मोतीराम गजानन उर्फ मो. ग. रांगणेकर यांचे हे जन्मशताब्दी वर्ष असून त्यासाठी रांगणेकर जन्मशताब्दी समितीची स्थापना करण्यात आली आहे. रांगणेकरांचे सदाबहार नाटक 'कुलवधू' पुन्हा एकदा नव्या संचात सादर करण्यात येणार आहे.

या समितीचे जयंत साळगावकर अध्यक्ष आणि ज्येष्ठ रंगकर्मी प्रभाकर पणशीकर उपाध्यक्ष असून कार्यवाह अरुण फडके, कोषाध्यक्ष सुभाष सराफ आहेत. नाट्य संमेलनाचे अध्यक्ष मोहन जोशी, समीक्षक डॉ. वि. भा. देशपांडे, प्रोग्रेसिव्ह ड्रॅमॅटिक असोसिएशनचे शशिकांत कुलकर्णी, तसेच वंदना खांडेकर इत्यादी सदस्य आहेत.

रांगणेकरांच्या सृजनसोहळ्याचे उद्घाटन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या हस्ते मुंबईत सात एप्रिल रोजी झाले. या वेळी ज्येष्ठ नाटककार विजय तेंडुलकर, दिग्दर्शक दामू केंकरे आणि निर्माते मोहन वाघ यांचा सत्कार करण्यात आला.

## * 'प्रवास... एका प्रवासाचा'चे प्रकाशन

जिद्दी, चिकाटी आणि आकांक्षेला वय हा अडथळा ठरू शकत नाही. केसरीभाऊ पाटील यांनी पर्यटन क्षेत्रातील कामाला पन्नाशीत सुरुवात करून यश



संपादन केले. त्यांच्यामुळे उद्योजकांपुढे नवा आदर्श निर्माण झाला आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते राज ठाकरे यांनी केले.

'अमेय प्रकाशन'च्या 'प्रवास... एका प्रवासाचा' या श्री. केसरी पाटील यांच्या आत्मचरित्राच्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन ठाकरे यांच्या हस्ते झाले.

व्यवसाय उभा करायचा ही सोपी गोष्ट नाही. पण जिद्द, शिस्त व चिकाटीने तो कसा उभा करता येतो हे पाटील यांनी दाखवून दिले आहे. पर्यटनाच्या क्षेत्रात परदेशी कंपन्यांची स्पर्धा असताना न्यूनगंडातून मराठी माणसाला बाहेर काढून केसरी पाटील यांनी त्याला महाराष्ट्राच्या सीमा ओलांडण्यास भाग पाडले.

पुस्तकाचे लेखक मकरंद जोशी यांनीही या वेळी मनोगत व्यक्त केले. वीणा पाटील यांनी केसरी पाटील यांची प्रकट मुलाखत घेतली. 'अमेय प्रकाशन'चे उल्हास लाटकर यांनी स्वागत केले.

## * माध्यमांची भूमिका महत्त्वाची

'शं. वा. किर्लोस्कर स्मृती स्मारक समिती'तर्फे देण्यात येणारा या वर्षीचा 'शंवाकि' पुरस्कार 'युनिक फीचर्स'च्या 'अनुभव' मासिकाला मुकुंदराव किर्लोस्कर यांच्या हस्ते देण्यात आला. 'अनुभव' मासिकाचे संपादक सुहास कुलकर्णी व आनंद अवधानी यांनी हा पुरस्कार स्वीकारला. प्रतिष्ठानचे विश्वस्त सुधीर मोघे, सदा डुंबरे, श्याम देशपांडे आणि कलावती कानेटकर या वेळी उपस्थित होते.

मुकुंदराव किर्लोस्कर म्हणाले, ''रेव्ह पार्ट्यांसारखे प्रकार आपल्याभोवती घडत आहेत. राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात अजून किती अध:पतन होणार आहे, याची कल्पना करवत नाही. त्यामुळे आजच्या काळात माध्यमांची भूमिका पूर्वीपेक्षा खूप महत्त्वाची ठरते. सामाजिक प्रश्नांना वाचा फोडणे व लोकशिक्षण करणे अशी दुहेरी जबाबदारी माध्यमांवर आहे. प्रत्यक्षात मात्र याच्या उलट चित्र दिसते आहे. मनोरंजक मजकूर प्रसिद्ध केल्याने सवंग वाचनाची पिढी आपण तयार करीत आहोत, याचे भान काही माध्यमांना नाही. या परिस्थितीत 'अनुभव'सारख्या मासिकाचे प्रयत्न मोलाचे आहेत.''

## * 'मृत्यू उपरांत जीवन'मध्ये समरसून जगायची शिकवण

''पंचमहाभूतांनी बनलेला स्थूल देह त्या पंचतत्त्वांत समरसून जाण्यापूर्वी समरसून जगावे कसे, हे 'मृत्यू उपरांत जीवन' या ग्रंथात सांगितले आहे,'' असे मत संतसाहित्य व तत्त्वज्ञानाचे अभ्यासक डॉ. अशोक कामत यांनी व्यक्त केले.

'तेज ग्यान फाउंडेशन'चे तेजगुरू सरश्री तेजपारखीजी लिखित 'मृत्यू उपरांत जीवन' या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभात ते अध्यक्षपदी होते.

'यंग इंडिया पब्लिशर्स'तर्फे प्रकाशक दिलीप लाठी यांनी काढलेल्या या पुस्तकाचे प्रकाशन विद्यावाचस्पती शंकर अभ्यंकर यांच्या हस्ते झाले.

डॉ. कामत म्हणाले, 'मानवी जीवन मर्यादित आहे. ते हसत आणि श्रद्धेने जगायचे, असे हे पुस्तक सुचवते. सकारात्मक विचार करत जीवन आनंदमय कसे जगावे, हे या पुस्तकातून सांगितले आहे. या पुस्तकाचा शंकर सारडा यांनी अप्रतिम अनुवाद केला आहे.'

अभ्यंकर यांनी 'आत्मानुभवातून प्रकटलेला ग्रंथ' या शब्दांत पुस्तकाचा गौरव केला. 'अध्यात्म हेच खरे ज्ञान असून, या तत्त्वज्ञानाची उकल या ग्रंथात आहे,'' असे ते म्हणाले. डॉ. मकरंद परांजपे यांनी सूत्रसंचालन केले.

### * पर्यावरणाच्या संतुलनासाठी पक्ष्यांचे संवर्धन महत्त्वाचे

'पक्षी हा पर्यावरणातील अत्यंत महत्त्वाचा घटक असून, पर्यावरणाच्या संतुलनासाठी सर्व प्रकारच्या पक्ष्यांचे संवर्धन होणे आवश्यक आहे,'असे मत ज्येष्ठ पक्षितज्ज्ञ आशिष कोठारी यांनी व्यक्त केले. कोठारी यांच्या 'बर्डस इन अवर लाईव्हज' या पुस्तकाचे प्रकाशन ज्येष्ठ दिग्दर्शक अमोल पालेकर यांच्या हस्ते करण्यात आले. व्यासपीठावर पर्यावरणतज्ज्ञ डॉ. प्रकाश गोळे, बी. जी. देशमुख, हृषीकेश तळवलकर उपस्थित होते.

कोठारी म्हणाले, 'पक्षी मनुष्यांशिवाय जगू शकतात; परंतु मनुष्यांना पक्ष्यांशिवाय जगता येणे अवघड आहे. आपल्या भोवतीच्या अनेक पक्ष्यांचे उंदीर, साप, कीटक हे खाद्य असल्यामुळे माणसांना पक्ष्यांचा अप्रत्यक्षपणे उपयोग होत असतो. परंतु वाढत्या शहरीकरणामुळे आणि कमी होणाऱ्या हिरवाईमुळे अनेक पक्षी स्थलांतरित होत आहेत आणि याचा परिणाम पर्यावरणाच्या संतुलनावर होत आहे.'

### * डॉ. किरण ठाकूर यांच्या पुस्तकाचे प्रकाशन

विभागातील शिक्षकांचे काम आणि प्रत्यक्ष पत्रकारिता यांचा समन्वय डॉ. किरण ठाकूर यांनी साधला. पत्रकारितेमध्ये त्यांनी आपल्या सर्जनशीलतेचा ठसा उमटविला आहे, असे गौरवोद्गार ज्येष्ठ पत्रकार ल. ना. गोखले यांनी काढले.

पुणे विद्यापीठाच्या संज्ञापन व वृत्तपत्रविद्या विभागाचे प्रमुख डॉ. किरण ठाकूर यांच्या 'पायोनियर ऑफ मॉडर्न जर्नालिस्ट इन इंडियन लँग्वेजेस' या पुस्तकाचे प्रकाशन गोखले यांच्या हस्ते करण्यात आले. ठाकूर सेवानिवृत्त झाल्याबद्दल त्यांना या वेळी निरोप देण्यात आला. 'सकाळ'चे संचालक संपादक आनंद आगाशे, ठाकूर यांच्या पत्नी शलाका ठाकूर आणि 'चिनार प्रकाशन'चे संजय नहार आदी या वेळी उपस्थित होते.

गोखले म्हणाले, ''विभागातील शिक्षकांनी चालविलेले काम आणि प्रत्यक्ष पत्रकारिता यांच्यात डॉ. ठाकूर यांनी समन्वय साधला. पत्रकारिता हा शिकण्याचा उद्योग नसून, करण्याचे काम आहे, अशी त्यांची भूमिका होती.'' 'सकाळ'चे संस्थापक संपादक डॉ. नानासाहेब परुळेकर यांच्या कार्याची ओळख इंग्रजी भाषेत उपलब्ध व्हावी, या उद्देशाने डॉ. ठाकूर यांनी या पुस्तकाचे लेखन केले आहे.



आपल्या पत्रकारितेच्या कामात 'सकाळ' आणि 'यूएनआय' हे आपल्यासाठी आदर्श होते. या संस्थांमधून आपल्याला पत्रकारितेचे कौशल्य आणि शैली आत्मसात करण्यास मदत झाली; तसेच कमी शब्दांमध्ये जास्त आशय मांडणे शक्य झाले, असे डॉ. ठाकूर यांनी सांगितले.

### * 'मुक्तिदाता मोशे'चे प्रकाशन

''ऐतिहासिक कादंबरीलेखन करताना वास्तव आकलन मांडण्यासाठी लेखकाला स्वत:चे कसब पणाला लावावे लागते. इस्रायली स्वातंत्र्ययोद्धा मोशे यांच्या संदर्भात लेखन करताना सनी पाटोळे यांना हे कसब जमले आहे,'' असे मत साहित्यिक डॉ. राजन गवस यांनी व्यक्त केले.

इस्राइलचे स्वातंत्र्यसेनानी मोशे दायान यांच्या जीवनावरील 'मुक्तिदाता मोशे' या कादंबरीचे प्रकाशन डॉ. गवस यांच्या हस्ते झाले. इस्रायली दूतावासाचे मुंबईतील व्यापार प्रतिनिधी डॅनिअल झोआर झोनशाईन, 'कॉन्टिनेन्टल प्रकाशन'चे अनिरुद्ध कुलकर्णी, सॅमसन पारेख, लेखक सनी पाटोळे व अशोक हिवाळे या वेळी उपस्थित होते.

### * अमूर्त तत्त्वाला मूर्तीमुळे 'सगुण' रूप

मूर्तिशास्त्राचे अभ्यासक डॉ. देगलूरकर यांच्या 'विष्णुमूर्ते नमस्तुभ्यम्' ग्रंथाचे प्रकाशन शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांच्या हस्ते झाले. श्रीद्वारकाधीश चॅरिटीज विश्वस्त न्यासातर्फे हा ग्रंथ प्रकाशित करण्यात आला आहे.

डॉ. देगलूरकर म्हणाले, ''मूर्तिशास्त्र केवळ पूजेपुरते नाही. त्याला अनेक आयाम आहेत. अमूर्त परम तत्त्वाला मूर्तीने 'सगुण' रूप दिले; मात्र मूर्ती हे साधन आहे; साध्य नव्हे, हे लक्षात ठेवले पाहिजे.''

मूर्तिशास्त्र पूजेत बांधलेले नसून, प्राचीन इतिहास 'दृश्य' करणे हे त्याचे वैशिष्ट्य आहे, असे मत मांडत विविध प्रकारच्या मूर्तींच्या पारदर्शिकांसह आपल्या ग्रंथाचे अंतरंग डॉ. गो. बं. देगलूरकर यांनी सादर केले. पुरंदरे यांनी मूर्तींचे सौंदर्य मानवी मनावर कसा परिणाम करते, याचे विवेचन केले. मानवी जीवनातील सुख-दु:खे शिल्परूपात स्थिर झालेली दिसतात, असे ते म्हणाले. 'फिरस्ता संशोधक' असा डॉ. देगलूरकर यांचा उल्लेख डॉ. अशोक कामत यांनी केला. डॉ. सुचेता परांजपे यांनी परिचय करून दिला.

### * 'सच्चर का सच' पुस्तिकेचे प्रकाशन

मुस्लिम समाजाच्या आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक स्थितीचा शोध घेण्यासाठी नेमण्यात आलेल्या सच्चर समितीच्या अहवालाच्या मराठीतील भाषांतराचे 'सच्चर का सच' या पुस्तिकेचे प्रकाशन बारामती येथे झाले. महंमद पैगंबर जन्मदिनाचे

औचित्य साधून कोल्हापूर, इचलकरंजी, निपाणी, इस्लामपूर व बारामती या पाच ठिकाणी प्रकाशन करण्यात आले.

पुस्तिकेचे लेखक हाजी महंमदगौस नाईक, मुस्लिम समाज प्रबोधन संस्थेचे अध्यक्ष हुसेन जमादार, महाराष्ट्र प्रदेश सर्वोदय मंडळाचे उपाध्यक्ष शंकर बगाडे आदींनी बारामतीत पत्रकार परिषद घेऊन प्रकाशनाची पार्श्वभूमी विशद केली.

श्री. नाईक म्हणाले, ''मुस्लिम समाज आज कोठे आहे, याचे सत्य सच्चर समितीच्या अहवालाने जगापुढे आणले आहे. भारतातील अनुसूचित जातीजमातीपेक्षाही मुस्लिम समाज मागास आहे, असे सच्चर अहवाल सांगतो. सर्वच ठिकाणी मुसलमानांची संख्या नगण्य आहे. यातही विशेष म्हणजे या समाजातील बालमृत्यूचे प्रमाण अतिशय कमी आहे.''

'भारतात असलेला सुमारे १५ कोटी मुस्लिम समाज मागे राहिला तर देश पुढे कसा जाणार, हा खरा प्रश्न आहे. केवळ मदरशांत जाऊन उर्दू किंवा अरबी भाषेत शिक्षण घेऊन चालणार नाही. ज्या राज्यांत मुस्लिम लोक राहतात तेथील स्थानिक भाषा आत्मसात केल्याशिवाय त्यांना स्पर्धा परीक्षांत सहभागी होता येणार नाही. नोकरी किंवा इतर ठिकाणी हक्क सांगायचा असेल, तर ज्ञान आत्मसात करणे गरजेचे आहे. सर्वमान्य शिक्षणाबाबत मुस्लिम समाजाने अंतर्मुख होऊन विचार करण्याची गरज आहे,' असे अहवालात नमूद केले आहे.

### * रोहिणी भाटे यांचा सत्कार

कोणत्याही फळाची अपेक्षा न ठेवता आयुष्य वेचून मिळालेली कलेची पुंजी आपल्या शिष्यांना बहाल करणाऱ्या ज्येष्ठ नृत्यपंडिता रोहिणी भाटे खऱ्या अर्थाने कलाकाराचे आयुष्य जगल्या आहेत. आपली कला शिष्यांच्या माध्यमातून सर्वदूर जावी हे त्यांचे ध्येय होते आणि त्यामध्ये रोहिणीताई यशस्वी झाल्या, असे गौरवोद्गार ज्येष्ठ सारंगीवादक पंडित रामनारायण यांनी काढले.

संगीत नाटक अकादमीचा रत्न पुरस्कार मिळाल्याबद्दल 'उद्गार' आणि 'ऊर्मी' या संस्थेच्या वतीने भाटे यांचा पं. रामनारायण यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या वेळी ज्येष्ठ व्हायोलियनवादक पं. डी. के. दातार, कथकनर्तक पं. राजेंद्र गंगाणी, पं. कुमार बोस या वेळी उपस्थित होते. पं. रामनारायण म्हणाले, ''स्वत:ला प्रसिद्धी कशी मिळेल, ही मानसिकता सध्या अनेक कलाकारांमध्ये वाढते आहे. कलेचा प्रसार करण्यापेक्षा पुरस्कार कसे मिळतील, यासाठी ते प्रयत्नशील असतात. पण रोहिणीताईंच्या बाबतीत हे सर्व समज चुकीचे आहेत. रोहिणीताईंनी आपले आयुष्य नृत्याला वाहून घेतले. नृत्याची परंपरा पुढे नेण्यासाठी धडपडणाऱ्या रोहिणीताईंना हा पुरस्कार शासनाने यापूर्वीच देण्याची गरज होती.''

### * नवे मासिक– चैत्रपालवी

'वाचन संस्कृतीचा प्रसार करण्यासाठी वाङ्मयीन नियतकालिकांची आवश्यकता



आहे,' असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक आणि माजी संमेलनाध्यक्ष राजेंद्र बनहट्टी यांनी केले. कल्पना मुद्रणालयाचे संचालक आनंद लाटकर, अनिल थत्ते तसेच नंदन देऊळकर यांनी निर्मिलेल्या 'चैत्रपालवी' अंकाचे प्रकाशन बनहट्टी यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ मुद्रक चिं. स. लाटकर होते. 'मौज प्रकाशन'च्या मोनिका गजेंद्रगडकर या वेळी उपस्थित होत्या.

बनहट्टी म्हणाले, 'सध्या वाङ्मयीन लेखनाची वानवा आहे. अनेक मासिके काळाच्या पडद्याआड गेली आहेत. त्यांची जागा घेणाऱ्या नियतकालिकांची वानवा आहे. त्यामुळे साहित्य कुठे प्रकाशित करायचे, असा प्रश्न प्रस्थापित आणि नवोदित लेखकांपुढे आहे. यामुळे त्यांच्या आविष्कारावर मर्यादा येत आहे.'

लाटकर यांनी जुनी नियतकालिके, तसेच मासिकांविषयी आणि शुभदा चंद्रचूड यांनी 'चैत्र पालवी'तील लेखक आणि त्यांच्या कथा-कवितांबाबत माहिती दिली.

### * 'गझलदीप'चे प्रकाशन

'माणसामध्ये ईश्वराचे दर्शन घडते, तेव्हाच गझल होते. माणूस आपल्या अनुभवाने, सोसलेल्या दु:खातून मिळालेली आग मोजक्या शब्दांत मांडतो, तेव्हा ती गझल होते. गझलकार प्रदीप निफाडकर यांच्या गझलेत तो दर्द, ती आग दिसते,' असे ज्येष्ठ गझलकार निदा फाजली यांनी सांगितले.

प्रसिद्ध शायर बशर नवाझ आणि ज्येष्ठ गझलकार निदा फाजली यांच्या हस्ते प्रदीप निफाडकर यांच्या 'गझलदीप'चे प्रकाशन बालगंधर्व रंगमंदिरात झाले. अध्यक्षस्थानी माहिती आयुक्त विजय कुवळेकर होते.

निदा फाजली म्हणाले, 'अरबस्तानातून निघालेली ही गझलयात्रा सुफी-संतांबरोबर हिंदुस्थानातील मैदानी प्रदेशात आली. तिने अनेक चढउतार पाहिले, पण त्या प्रत्येक वेळी माणूस ही परमशक्ती एकच होती.'

आदमी आपने आप से सच बोलता है.
अपनी अंतरात्मा की, दिल से दिल की बात कहता है।''

विजय कुवळेकर म्हणाले, 'गझलचे तंत्रमंत्र सांगणारे गझलनामा लिहायचे ज्येष्ठ गझलकार सुरेश भट यांच्या डोक्यात होते. पण, त्यांचे लिहायचे मात्र राहून गेले. गुरूने तू माझा वारस, असे स्वत: म्हणणे हे कोणत्याही शिष्याच्या दृष्टीने लाखमोलाचे असते. आपल्या गुरूचे हे स्वप्न प्रदीप निफाडकर यांनी पूर्ण केले. हे पुस्तक म्हणजे भट यांना वाहिलेली श्रद्धांजली आहे.'

### * पाचवा पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव

महाराष्ट्र सरकारचा सर्वोत्कृष्ट चित्रपटासाठीचा प्रभात आंतरराष्ट्रीय पुरस्कार 'द ओल्ड बार्बर' या चीनच्या चित्रपटाने, तर सर्वोत्कृष्ट मराठी चित्रपटासाठीचा 'संत तुकाराम पुरस्कार' नीना कुलकर्णी निर्मित व गजेंद्र अहिरे दिग्दर्शित 'शेवरी' या

चित्रपटाने पटकावला. वीस हजार डॉलर असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

पाचव्या पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या समारोप प्रसंगी या पुरस्कारांची घोषणा करण्यात आली. ज्येष्ठ उद्योगपती राहुल बजाज प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक म्हणून फ्रेंच दिग्दर्शक कॉस्टा गॅव्हरस यांना दहा हजार डॉलरचा 'प्रभात आंतरराष्ट्रीय पुरस्कार' देण्यात आला. 'स्पेशल ज्युरी ॲवॉर्ड' देऊन 'द रोड' (चीन) या चित्रपटाचा गौरव करण्यात आला.

मराठी चित्रपटांत अभिनेत्री देविका दफ्तरकार यांना 'नितळ'मधील भूमिकेसाठी, तर छायालेखक देबू देवधर यांना 'मातीमाय'मधील छायाचित्रणासाठी गौरवण्यात आले. ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र आणि अभिनेत्री आशा पारेख यांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

श्री. बजाज म्हणाले, 'सर्जनशीलता हा कलेचा प्राण असतो. चित्रपटही आपल्या संस्कृतीचे दर्शन घडवतात. आर्थिक सुबत्ता नसली, तरी संस्कृती जपता येते पण संस्कृतीशिवाय सुबत्तेला अर्थ नसतो.'

मराठी चित्रपटांच्या स्पर्धात्मक विभागाचे परीक्षक के. जॉर्ज, जागतिक चित्रपटांच्या स्पर्धात्मक विभागाचे परीक्षक शमिक बंदोपाध्याय यांनीही मनोगत मांडले.

### * तेंडुलकर आणि डॉ. लागू यांचा मुक्त संवाद

'अक्षरमानव' आणि भारती विद्यापीठाच्या वतीने ज्येष्ठ रंगकर्मी डॉ. श्रीराम लागू आणि प्रसिद्ध नाटककार विजय तेंडुलकर यांचा संवाद आयोजिण्यात आला. निखिल वागळे यांना त्यांची मुलाखत घेतली.

स्वातंत्र्यानंतर आज देशाची परिस्थिती काय आहे इथपासून हा संवाद सुरू झाला. 'भाबड्या कल्पनेत आमची पिढी गाफील राहिली. तिथेच चुकलो,' अशी कबुली डॉ. लागू यांनी दिली. 'सर्व पर्यायांमध्ये अपयश आल्याने आता कोणावर अवलंबून राहण्यापेक्षा सामान्य माणसानेच स्वत:हून पुढाकार घेतला, तर परिस्थितीत बदल होण्याची शक्यता आहे,'असेही त्यांनी सांगितले.

तेंडुलकर म्हणाले, 'स्वातंत्र्यानंतर देशाचे विघटन सुरू झाले असून, ही प्रक्रिया आता पराकोटीला गेली आहे. जागतिकीकरणाच्या रेट्यामुळे देश नाही, तर वसाहत निर्माण झाली आहे. एकसंध नसलेल्या देशालाच मी शोधतोय.'

महासत्ता होणार असे स्वप्न दाखवणारे स्वत:च्या पायाखालचे भीषण वास्तव विसरतात, अशी खंत व्यक्त करून तेंडुलकर म्हणाले, 'जागतिक स्तरावर गलिच्छ राजकारण करणाऱ्या अमेरिकेच्या दडपणाखाली अनेक गोष्टी होत असल्याने, आपल्या देशाचे भवितव्य तरी आपल्या हातात राहिले आहे का, अशी शंका वाटते.'

सत्ता राबविणे आणि पैसे मिळविणे, या व्यतिरिक्त सरकार काही करीत नाही, अशी टीका करून डॉ. लागू म्हणाले, 'जातीय दंगे म्हणजे मनुष्यप्राण्याने



स्वीकारलेला अतिरेकीपणाचा मार्ग आहे.'

न्यायव्यवस्था राजकीय अर्थाने वापरली जाते, तेव्हा न्याय मिळत नाही, असे नमूद करून तेंडुलकर म्हणाले, 'दुसऱ्याच्या जीवनाविषयी बेदरकारपणा दाखवून मारून, लुटून मला काही तरी मिळवायचे आहे, ही राजकारणाच्या मर्यादेपलीकडे एक प्रवृत्ती बनत चालली आहे, ही शरमेची बाब आहे.'

अकाली मृत्यूमुळे आयुष्याकडे पाहण्याच्या दृष्टीत फरक पडत नाही, असे ठाम मत डॉ. लागू यांनी मांडले, तर माणसात बदल होतोच. त्याचे आयुष्य पूर्वीसारखे राहत नाही, असे स्पष्ट मत तेंडुलकरांनी व्यक्त केले. 'बाहेरून कितीही हल्ले झाले, आतून कीड लागली तरी जीवन सुरूच राहिले पाहिजे,' असे डॉ. लागू यांनी सांगितले, तर तेंडुलकर म्हणाले, 'नवीन पिढीच्या भवितव्याविषयी चिंता वाटत असली, तरी अनपेक्षित वळणे आणि परिस्थितीला कलाटणी मिळून चांगले काही घडले, तर सध्याची तरुण पिढीच त्याला कारणीभूत असेल.'

आयुष्याने खूप त्रास दिला; पण त्याचा प्रत्येक वेळी फायदा होत गेला. कुणीतरी मला बोट धरून पुढे नेत राहिले, आता याला नियती म्हणायची की आणखी काय, हे तुम्हीच ठरवा, असे मत तेंडुलकरांनी व्यक्त केले. त्यावर, 'नियती ही माणसाने निर्माण केलेली सुंदर सबब आहे. पराभव विसर्जित करण्यासाठी तयार केलेले एक कुंड,' अशी संभावना डॉ. लागू यांनी केली. नियतीमधला हा वाद अंधश्रद्धेकडे गेला, तसा दोघांमध्ये खऱ्या अर्थाने वाद झडला. 'अनेक प्रश्नांची उत्तरे माणसाला सापडत नाहीत, तेव्हा त्याला प्रसंगी अंधश्रद्धेचा आधार घ्यावा लागतो,' असे मत तेंडुलकरांनी व्यक्त करताच, ''हे म्हणजे चोरी ही गरज आहे, सांगण्यासारखे असून, अंधश्रद्धेचा आधार घ्यावा लागत असेल, तर विवेकशक्तीचा पराभव आहे,' असे प्रत्युत्तर डॉ. लागू यांनी दिले. 'माणूस जेव्हा छोटा असतो, त्याच्याकडे जगण्याची साधने मर्यादित असतात, तेव्हा विवेकबुद्धी त्याला आधार देत नाही,' श्री. तेंडुलकरांनी म्हटले.

सध्याच्या 'मीडिया'विषयी...

डॉ. लागू : 'मीडिया'पासून मी दूर गेलो आहे. जाहिराती मिळविण्यासाठी वृत्तपत्रे सध्या छापली जातात अन् टीव्हीवर असंख्य जाहिराती दाखवून कुठल्याही कार्यक्रमाला पायदळी तुडविले जाते.

तेंडुलकर : वृत्तपत्रांसाठी 'वाचक' आणि दूरचित्रवाण 'दर्शक' हे केवळ 'आकडे' झाले असून, यामध्ये सर्वसामान्य एखाद्या सोंगटीसारखा भरडला जात आहे.

### * गोविंद तळवलकर यांची मुलाखत

जागतिकीकरणाचे चटके अमेरिकेलाही बसत आहेत. हे चक्र उलटे फिरविणे कोणाच्याही हाती नाही. आहे त्या परिस्थितीतून मार्ग काढून आपल्याला नॉर्वे-स्वीडनसारख्या कल्याणकारी समाजाची निर्मिती करायची आहे की झिंबाब्वेसारख्या

मागासलेल्या देशांसारखे रहायचे आहे, हे आपण ठरवायचे आहे, असे प्रतिपादन गोविंद तळवलकर यांनी केले.

सध्या जागतिकीकरणाविरोधात जी ओरड होत आहे, ती निरर्थक आहे. ती प्रक्रिया कोणालाही थोपविता येणार नाही. यामुळे उद्‌भवणाऱ्या आव्हानांवर व संकटांवर समाजात चर्चा झाली पाहिजे. ती भारतासारख्या लोकशाहीवादी, खुल्या समाजातच होऊ शकते. आहे त्या परिस्थितीतून मार्ग काढणे हाच त्यावरील उपाय आहे असे तळवलकर म्हणाले.

'पंचम निषाद' या संस्थेतर्फे या प्रकट मुलाखतीचे आयोजन करण्यात आले होते. 'लोकसत्ता'चे संपादक कुमार केतकर यांनी तळवलकर यांची मुलाखत घेतली. पंडित नेहरू व यशवंतराव चव्हाण यांच्याविषयी समाजमनात असलेले काही समज कसे चूक आहेत, हे सांगत त्यांनी त्याच्याशी संबंधित किस्से सांगितले.

आपल्याकडे आलेला ज्ञानाचा वारसा ही ब्रिटिशांची देणगी आहे. ब्रिटिश अभ्यासू होते. एलफिन्स्टनला इथून दुसऱ्या ठिकाणी तोफा पाठवायच्या होत्या, त्यानिमित्ताने त्याने नकाशा तयार केला. त्याला मराठीही येत होते. मात्र पानिपत कुठे आहे; दक्षिण की उत्तरेला याची कल्पनाही त्यावेळेस आपल्याला नव्हती. भारत कसा काय आहे, याविषयी ब्रिटिशांना उत्सुकता होती. मात्र ते कुठून आले, याची उत्सुकता आपल्याला नव्हती. ब्रिटिशांनी केलेल्या अभ्यासाला तोड नाही. ब्रिटिशांचे हे ऋण अगदी न्या. रानडे, गोखले, लोकमान्य टिळक सर्वांनीच वेळोवेळी मान्य केले आहे, असे तळवलकर म्हणाले.

आयुष्याच्या सुरुवातीच्या काळात साम्यवाद आणि रॉयवादी विचारसरणीचा असलेला प्रभाव याविषयी सांगून नेहरूंबाबत बोलताना ते म्हणाले की, कराची काँग्रेसच्या वेळेसच रॉय यांचा प्रभाव नेहरूंवर पडला होता.

आपले राज्य आल्यानंतर आपली घटना असायला हवी, हे रॉय यांनी मांडलेले मत नेहरूंना पटलेले होते. दुसऱ्या एका प्रश्नाच्या उत्तरात ते म्हणाले की, १९४२ साली काँग्रेसने केलेल्या ठरावामध्ये स्वातंत्र्यानंतरच्या परराष्ट्रधोरणाचे बीजारोपण झाले होते. आपल्याला स्वातंत्र्य हवे होते आणि त्यावेळेस आपण फॅसिस्ट नाही, हेही जगाला सांगायचे होते. ती राजकीय मुत्सद्देगिरी त्यावेळेस नेहरूंनी दाखवली. पंतप्रधान झाले त्यावेळेस नेहरूंशिवाय दुसरा पर्याय गांधीजींसमोर नव्हता. वल्लभभाई पटेल, जयप्रकाश नारायण व सुभाषचंद्र बोस हे पर्याय स्वीकारणे शक्य नव्हते.

१९३५ साली ब्रिटिशांनी निवडणूक कायदा आणला. त्यावेळेस त्याला काँग्रेसने विरोध केला. त्यानंतर १९३७ साली ते स्वीकारून निवडणूक लढवली. खरेतर त्याचवेळेस १९३७ साली नेहरू पंतप्रधान झाले होते, ती वस्तुस्थिती गांधीजींनी १९४७ साली स्वीकारली, असेही ते म्हणाले.

काँग्रेस म्हणजे राष्ट्रीय प्रवाह आणि तो आपण कधीही सोडायचा नाही, हे यशवंतराव चव्हाणांनी पक्के ठरविले होते, असे सांगून यशवंतराव चव्हाण यांनी राजकारणातील मध्यममार्ग निवडला. यशवंतराव हे कधीही रॉयवादी नव्हते, असेही ते म्हणाले.

फाळणीबाबतच्या प्रश्नांबाबत तळवळकर म्हणाले की, १९१६ साली टिळक-जिना यांनी स्वाक्षरी केलेल्या करारामध्ये मुस्लिमांसाठी ३३ टक्के आरक्षण मान्य करण्यात आले. त्याहीपूर्वी गोखले यांनी तीच भूमिका मांडली होती. या व अशा अनेक घटनांमध्येच फाळणीची बीजे आहेत. गांधीजी आले त्यावेळेस परिस्थिती हाताबाहेर गेली होती. फाळणी अपरिहार्य होती. अन्यथा राज्याराज्यांमध्ये पाकिस्ताची निर्मिती झाली असती. रानडे, गोखले, टिळक सर्वांनीच संसदीय लोकशाही हवी, अशी भूमिका घेतली होती. पण केवळ आग्रही भावना असून भागत नाही तर ते सारे व्यवहारात यावे लागते. त्याचा पाठपुरावा पंडित नेहरूंनी केला. पूर्वी जिथे फ्रेंच किंवा पोर्तुगीज वसाहती होत्या तिथे आता अराजक किंवा यादवीची स्थिती आहे. केवळ भारतच विकासाच्या वाटेवर आहे. हे यश लोकशाहीमध्ये दडलेले आहे, याचीही जाण ठेवायला हवी.

### * शशी थरूर

मुदत संपत असलेले संयुक्त राष्ट्रांचे सार्वजनिक माहिती खात्याचे उपसरचिटणीस शशी थरूर यांनी खासगी कंपन्यांचे सल्लागार म्हणून काम करण्याचा विचार असल्याचे सांगितले. विशेषत: भारताशी संबंध असलेल्या कंपन्यांसाठी त्यांना काम करायचे आहे.

सत्तावीस वर्षांच्या सेवेनंतर राजीनामा देऊन निवृत्ती स्वीकारल्यावर आता भारतीय वृत्तपत्रांसाठी लिहिलेले स्तंभ पुस्तकरूपात प्रकाशित करणार असल्याचे त्यांनी सांगितले. भविष्यात एखादे स्वतंत्र पुस्तकही लिहिण्याची शक्यता आहे.

### * जे. कृष्णमूर्ती यांचे तत्त्वचिंतन

धार्मिक अथवा विविध विचारसरणीच्या प्रभावाखाली मानसिकदृष्ट्या बंदिस्त करून घेतलेल्या व्यक्तींसाठी स्वत:च निर्माण केलेल्या तुरुंगातून स्वत:ची कशी मुक्तता करावी याचा विचार जे कृष्णमूर्ती मांडत होते, असे 'लोकसत्ता'चे संपादक कुमार केतकर यांनी म्हटले. १८५० ते १९५० या काळात विलक्षण तत्त्वचिंतन झाले आहे. तशा प्रकारचे तत्त्वचिंतन दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात झालेले दिसत नाही. १९५० नंतर मांडलेला कोणताही विचार किंवा तत्त्व याचा संदर्भ द्यायचे ठरले तर विचाराच्या पद्धतीचे मूळ १८५० ते १९५० याच काळातील आढळते, असे केतकर यांनी सांगितले.

कृष्णमूर्तींच्या काळातील तत्त्वचिंतनाचा मागोवा घेण्यापूर्वी केतकर यांनी त्यापूर्वीच्या काळातील जागतिक परिस्थितीचा आढावा घेतला. मध्ययुगीन काळात धर्माच्या अथवा विचारसरणीच्या नावाने माणसांच्या कत्तली करण्यात आल्या. जे धर्म शांततेचा प्रसार करत होते त्यांनीच धर्माच्या नावाने सर्वाधिक कौर्याचे प्रकार केले. युरोपात जशा कत्तली झाल्या त्याचप्रकारे बौद्ध धर्माचा प्रसार करणाऱ्या चीन आणि जपानमध्ये क्रौर्याचे प्रकार झाले. हिंदू धर्मातही मानसिक अथवा शारीरिक अत्याचार करण्यात आले, असे केतकर यांनी सांगितले. कोणताही सिद्धांत पूर्ण शांतता निर्माण करणारा नाही असे कृष्णमूर्ती मांडतात. फेबीयन समाजवादाच्या जवळ जाणारा विचार थिऑसाफी सोसायटी मांडत होती. संघटना अथवा संस्थांच्या माध्यमातून विचार मांडणे ही विकृती आहे, असे मानणाऱ्या कृष्णमूर्ती यांनी आर्थिक सत्ताकेंद्र असलेल्या थिऑसाफीचे प्रमुख पद नाकारले. संघटना हीसुद्धा हिंसा आहे, असे गांधीजी मानत. त्यामुळे गांधीजींचा विचार कृष्णमूर्तींच्या जवळचा होता. धर्म, बुवाबाजी अथवा विचारसरणी या संस्था मानसिक गुलामी देतात. त्यामुळे त्यापासून मुक्तीचा विचार कृष्णमूर्ती यांनी मांडला, असे केतकर यांनी सांगितले.

### * नाटकांविषयी सर्वकाही... आता 'नेट'वर!

नाटकांच्या कार्यशाळांविषयी माहिती, नव्या घडामोडी, नव्या नाटकांचे परीक्षण, जुन्या नाटकांच्या संहिता, नाट्यकर्मींची ओळख, यांसारख्या नाटकांसंबंधी अनेक बाबींची माहिती देणारे संकेतस्थळ 'समन्वय' या पुण्यातील नाट्यसंस्थेतर्फे सुरू करण्यात आले आहे.

www.samanvaytheatre.com संकेतस्थळावर नाटकांची 'क्लिपिंग्स'; तसेच पुण्यातील रंगकर्मींचा 'डाटा'ही उपलब्ध करून देण्यात येणार आहे, अशी माहिती 'समन्वय'चे हेमंत ढोमे यांनी लिी.

ते म्हणाले, ''संस्थेच्या विविध उपक्रमांची आणि 'समन्वय' निर्मित नाटकांची माहिती संकेतस्थळाद्वारे पोचविण्यात येणार आहे. त्याशिवाय वेगवेगळ्या माध्यमांतून सर्व रंगकर्मींना एकत्र जोडण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. त्यासाठी 'मेंबर प्रोफाइल' अंतर्गत पुण्यातील रंगकर्मी त्यांचा 'बायोडाटा' आणि छायाचित्र 'समन्वय'कडे पाठवू शकतील. रंगकर्मींची 'प्रोफाईल्स' संकेतस्थळावर 'अपडेट' करण्यात येतील.''

### * 'नि:शब्द झुंज'चे प्रकाशन

''वंचितांच्या विकासासाठी काम करण्याचे मोठे आव्हान समाजापुढे आहे. अशा प्रकारच्या कामावर श्रद्धा असावी लागते. ती सतत टिकवून ठेवणे आवश्यक असते,'' असे प्रतिपादन साहित्यिका मेघना पेठे यांनी पुणे येथे केले.

सामाजिक कार्यकर्त्या रेणू गावस्करलिखित 'नि:शब्द झुंज' या पुस्तकाचे



प्रकाशन प्रतिभा गोडबोले यांच्या हस्ते करण्यात आले. प्रतिभा गोडबोले यांनी या पुस्तकाचा परिचय दिला. रेणू गावस्कर यांनीही मनोगत व्यक्त केले.

### * 'माझा प्रवास'चे शतक!

'बाईसाहेब स्वत: पांढरे घोड्यावर स्वार जाहली. अंगावर पायजमा वगैरे सर्व पुरुष पोषाख होताच. टाकीण बूट घातले होते व सर्वांगास तारांचे कवच घातले होते, कंबरेस ज्यंबा वगैरे हतेरे होती. खाकेत तरवार लाविली होती आणि रेसिमकाठी धोतरानी पाठीसी बारा वर्षांचा मुलगा (दामोदर) बांधून जय शंकर असा शब्द करून किल्ल्याखाली स्वारी उतरली आणि सर्वांसह भर शहरातून उत्तर दरवाज्यानी बाहेर गेली...' ब्रिटिशांविरोधात अखेरची लढाई करणाऱ्या झाशीच्या राणीचे हे प्रत्यक्ष वर्णन, वसईकर वेदशास्त्री विष्णूभट गोडसे यांनी त्यांच्या 'माझा प्रवास' उर्फ १८५७ च्या बंडाची हकीकत या मराठीतल्या पहिल्या प्रवासवर्णनातील पुस्तकात लिहिले आहे.

'माझा प्रवास'च्या पहिल्या छापील आवृत्तीला शंभर वर्षे पूर्ण होत असून नवी आवृत्ती लवकरच काढणार असल्याचे व्हीनस प्रकाशनचे प्रमुख डॉ. अनिल पाध्ये यांनी सांगितले.

गोडसे भटजींनी ते १८८३ मध्ये हाताने लिहिले. चिंतामण वैद्य यांनी ते पुण्यात प्रथमच पुस्तकरूपात १९०७ मध्ये छापले. या घटनेस आता १०० वर्षे होत आहेत. भारत इतिहास संशोधक मंडळाकडे वैद्य यांनी दिलेल्या गोडसे भटजींच्या हस्तलिखिताची मूळ प्रत आहे.

प्रपंचासाठी द्रव्य मिळवावे म्हणून गोडसे बाहेर पडले आणि त्या काळात झाशीच्या राणीच्या पदरी काही दिवस होते. कादंबरीपेक्षाही रोमहर्षक असे हे सत्यकथन आहे.

### * राजर्षी शाहू ग्रंथाची दुसरी आवृत्ती जूनमध्ये

राजर्षी शाहू ग्रंथाची दुसरी आवृत्ती जूनमध्ये प्रकाशित करण्याचा निर्णय महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनीने केला. ग्रंथांच्या पहिल्या आवृत्तीचे प्रकाशन २००१ मध्ये शरद पवार यांच्या हस्ते झाले होते. १ हजार रुपये किंमत असलेल्या या ५०० पानी ग्रंथाची प्रकाशनपूर्व किंमत ५०० रुपये ठेवल्याने, ग्रंथाच्या ३ हजार प्रती संपल्या. गेली सहा वर्षे हा ग्रंथ उपलब्ध नव्हता. वाचकांच्या मागणीमुळे ग्रंथाच्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन २६ जून रोजी होणार असल्याचे डॉ. जयसिंगराव पवार यांनी सांगितले. ही दुसरी आवृत्ती केवळ ३०० रुपयांत उपलब्ध होईल.

हा ग्रंथ तीन खंडांत विभागला असून, त्यात २२५ छायाचित्रे आणि ६० पेंटिंग्ज आहेत.

या ग्रंथाचे सध्या इंग्रजी आणि हिंदीतही भाषांतर सुरू आहे. इंग्रजी भाषांतर अरुण साधू, तर हिंदी भाषांतराचे काम डॉ. पद्मा पाटील आणि वसंतराव मुळीक

करीत आहेत.

## * पुस्तकसंग्रह हीच संपत्ती

'उत्तमोत्तम पुस्तके वाचणे ही माझी आवड आहे. १९४२ सालापासून माझ्या मनावर अनेक चांगल्या पुस्तकांनी संस्कार केले. अशा पुस्तकांचा संग्रह हीच माझी मोठी संपत्ती आहे,' अशा शब्दात लोकसभेतले विरोधी पक्षनेते लालकृष्ण अडवानी यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

चिपळूणमधल्या लोकमान्य टिळक स्मारक ग्रंथालयाच्या आप्पासाहेब साठे सभागृहाचे उद्घाटन अडवाणी यांच्या हस्ते झाले.

माणसाच्या मनावर चांगली पुस्तके प्रभाव टाकतात, म्हणूनच माणसाच्या आयुष्यात पुस्तकांचे अनन्यसाधारण महत्त्व आहे, असे ते म्हणाले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुण्यतिथीच्या निमित्ताने अडवाणी यांचे रायगड किल्ल्यावर आगमन झाले. रायगडावर शिवरायांना मानवंदना दिल्यानंतर ते चिपळूणच्या १४२ वर्षे जुन्या टिळक ग्रंथालयात आले.

## * तस्लिमा नसरीन यांची नवीन कादंबरी

प्रसिद्ध बंडखोर मुस्लिम लेखिका तस्लिमा नसरीन सतत येत असलेल्या धमक्यांना भीक न घालता नवीन कादंबरी लिहिण्यात गर्क आहेत.

'नारीर कोणो देश नेई' (महिलांना कोणताही देश नाही) या नावाची ही कादंबरी आहे. तस्लिमांच्या विरोधात फतवा जाहीर करणाऱ्या मुस्लिम मौलवींना या पुस्तकामुळे आणखी एक कोलीत मिळेल, असे तस्लिमा म्हणाल्या.

लिंगभेद, वंशभेद, धर्मभेद याविरुद्ध मी सतत आवाज उठवीत आले असून यापुढेही ते काम सुरू ठेवणार आहे. बांगलादेशातील हिंदू अल्पसंख्य असोत, भारतातील मुस्लिम असोत वा पाकिस्तानातील ख्रिश्चन असोत अथवा कोणत्याही समाजातील महिला असोत त्या नेहमी भरडल्याच जातात. या विरोधात आवाज उठविण्यास या पृथ्वीतलावरील कोणतीही ताकद मला रोखू शकणार नाही, असे त्या म्हणाल्या.

## * माडगूळात व्यंकटेश माडगूळकर यांचा पुतळा

'बनगरवाडी', 'सत्तांतर' आणि 'माणदेशी माणसं' आदि पुस्तके लिहिणारे ज्येष्ठ लेखक व्यंकटेश माडगूळकर यांचा पुतळा माडगूळ येथे त्यांच्या ८० व्या जयंतीला (८ एप्रिलला) बसवला गेला. व्यंकटेश माडगूळकर ट्रस्टतर्फे त्यांचे अप्रकाशित लेखन पुस्तकरूपात लवकरच प्रकाशित होणार आहे.

खुद्द माडगूळमध्ये शाळा सोडणाऱ्या मुलींसाठी आणि महिलांसाठी माडगूळकरांच्या नावाने एसएससीला बसण्यासाठी केंद्र सरकारच्या ओपन स्कूलचा उपक्रम राबवला जात असून त्यामध्ये १३ महिला सहभागी झाल्या आहेत, असे प्रतिष्ठानच्या



कार्यकारी विश्वस्त ज्ञानदा नाईक यांनी सांगितले.

१९८० च्या सुमारास हा पुतळा तात्यांना समोर बसवूनच चिलपती या बंगलोरच्या कलावंताने फर्ग्युसन कॉलेजात तयार केला होता. त्या पुतळ्याच्या आधारे फायबरचे दोन पुतळे तयार करण्यात आले असून एक माडगूळला तर दुसरा तात्यांच्या पुण्यातल्या 'अक्षर' या निवासस्थानी बसवण्यात आला आहे.

माडगूळकरांच्या अप्रकाशित साहित्यामध्ये कथा, ललित लेख आणि इतर वाङ्मयाचाही समावेश आहे. आधुनिक कवी बा. सी. मर्ढेकर यांच्यावरील मृत्यूलेखही त्यात आहे.

## * जपानमधील पहिल्या ऑनलाइन विद्यापीठाचे वर्ग सुरू

जपानच्या पहिल्या ऑनलाइन विद्यापीठाच्या वर्गांना आता सुरुवात झाली आहे. हे विद्यापीठ प्रामुख्याने वयस्कर लोकांसाठी आहे. या सायबर युनिव्हर्सिटीत एकूण ५१६ विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

पदवीसाठी या विद्यार्थ्यांना चार वर्षांचा अभ्यासक्रम देण्यात आला आहे. माहिती-तंत्रज्ञान आणि जागतिक वारसा यांसारखे काही विषय त्यांना आहेत. त्यामध्ये १३० विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष आणि अन्य विद्यार्थ्यांनी संगणकाच्या माध्यमातून सहभाग घेतला. साकुजी योशिमुरा नावाच्या एका पुरातत्त्व संशोधकाने पुढाकार घेऊन हे विद्यापीठ सुरू केले आहे. विद्यापीठाचा कुलगुरूही तोच आहे.

## * 'संकलित साधना'च्या पूर्वनोंदणीस प्रारंभ

साने गुरुजींनी स्थापना केलेल्या साधना साप्ताहिकाच्या हीरकमहोत्सवी वर्षानिमित्त 'साधना'तून प्रसिद्ध झालेल्या लेखांचे 'संकलित साधना' या नावाने आठ खंड प्रसिद्ध होणार आहेत. एस. एम. जोशी यांच्या स्मृतिदिनाचे औचित्य साधून विश्वास नांगरे-पाटील यांच्या हस्ते पूर्वनोंदणीस प्रारंभ करण्यात आला.

'साधना' १५ ऑगस्ट १९४८ रोजी सुरू झाले. प्रत्येकी दोनशे पानी ग्रंथाची किंमत २०० प्रमाणे आठ खंडांसाठी १६०० रुपये मूल्य आहे. मात्र हीरकमहोत्सवनिमित्ताने विशेष बाब म्हणून पूर्वनोंदणी करणाऱ्या सहाशे जणांना हा संच ५०० रुपयांत दिला जाणार आहे. ज्येष्ठ समीक्षक डॉ. रा. ग. जाधव यांनी संपादकपदाची जबाबदारी स्वीकारली असून प्रा. ग. प्र. प्रधान प्रमुख सल्लागार म्हणून काम पाहात आहेत. पन्नालाल सुराणा, प्रा. यशवंत सुमंत, विनोद शिरसाठ आदींच्या सहकार्याने 'संकलित साधना'साठी प्राथमिक निवड पूर्ण झाली आहे. पहिला खंड साने गुरुजींनी 'साधना'त केलेले लिखाण व त्यांच्यावर आजपर्यंत प्रकाशित झालेले लेखन यावर आहे. दुसरा खंड हा साठ वर्षांच्या कालखंडातील निवडक संपादकीयांचा आहे. तिसरा लोकशाही समजावादावरील, चौथा चळवळी आणि आंदोलने यांचा तर राजकीय व आर्थिक विषयाला पाचवा खंड वाहिलेला आहे. सहावा खंड सामाजिक आणि सांस्कृतिक विषयांवरील आहे. सातव्या

खंडात ललित आणि चिंतनपर लेख असून आठव्या खंडात सामाजिक चळवळींचा परामर्श घेतला आहे.

### * 'लोकराज्य' राज्यात पहिल्या क्रमांकावर

माहिती व जनसपर्क महासंचालनालयातर्फे प्रकाशित होणाऱ्या 'लोकराज्य' मासिकाने तीन लाखांवर प्रती काढून मराठी नियतकालिकांत आघाडी मिळवली आहे.

'लोकराज्य'ची तीन लाखावी प्रत माहिती व जनसंपर्क खात्याचे प्रधान सचिव डॉ. जयराज फाटक यांच्या हस्ते नुकतीच मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांना देण्यात आली. 'लोकराज्य'च्या मुख्य संपादक मनीषा पाटणकर-म्हैसकर या आहेत. या वेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते मासिकाचा एप्रिल २००७ चा अर्थसंकल्प विशेषांक प्रकाशित झाला. नव्या व आकर्षक स्वरूपामुळे सहा महिन्यांत मासिकाने खपात आघाडी घेतली आहे.

### * प्र. के. घाणेकर यांचा सत्कार

किल्ले हे महाराष्ट्राचे वैभव असून राज्यातील प्रत्येक किल्ला हा दृश्य अथवा अदृश्य अलंकाराने नटलेला आहे. गडांमध्ये राष्ट्र आणि समाज उभारण्याची शक्ती आहे, असे शिवचरित्रकार बाबासाहेब पुरंदरे यांनी सांगितले.

दुर्गपंडित आणि लेखक प्रा. प्र. के घाणेकर यांचा पुरंदरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. प्रा. प्र. के. घाणेकर सत्कार समिती आणि स्नेहल प्रकाशन यांच्या वतीने सत्काराचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. मानपत्र, पस्तीस हजार रुपयांचा धनादेश आणि पुणेरी पगडी देऊन सत्कार करण्यात आला. घाणेकर लिखित 'भटकंती रायगड जिल्ह्याची' या पुस्तकाचे प्रकाशनही या कार्यक्रमात करण्यात आले.

लहानपणापासूनच आपल्याला गड आणि किल्ल्यांची ओढ असल्याचे सांगितले. आतापर्यंत राज्यातील आणि परराज्यातील तीनशेहून अधिक गड फिरून झाले आहेत. 'दुर्ग, दुर्गेश्वर रायगड' हा ग्रंथ लवकरच लिहिणार असल्याचे घाणेकर यांनी सांगितले.

### * 'गा विहंगांनो'चे प्रकाशन

४५ पक्ष्यांचे आवाज ध्वनिमुद्रित करून ऋतुरंग संस्थेतर्फे तयार करण्यात आलेल्या 'गा विहंगानो' या सीडीचे प्रकाशन श्री. अस्थाना, तर पक्ष्यांचा आवाज वापरून तयार केलेल्या 'गाणाऱ्या घड्याळाचे' उद्घाटन श्री. पाध्ये यांच्या हस्ते करण्यात आले.

पक्षिजीवनाचे विविध कंगोरे आणि बारकावे उलगडत अभ्यासक किरण पुरंदरे यांनी पक्ष्यांचे आवाज सादर केले.

'नेचर वॉकतर्फे कट्टा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. अध्यक्षस्थानी 'सकाळ'चे सुरेशचंद्र पाध्ये होते. पुण्याचे मुख्य वनसंरक्षक शिरीष अस्थाना, अनंत नागपूरकर, अनुज खरे कार्यक्रमात सहभागी झाले होते.

''सध्या आपण टीव्ही वाहिन्यांवर आणि संगणकावर निसर्ग अनुभवतो, मात्र निसर्गात प्रत्यक्ष जाऊन काम करणारी माणसे फार कमी आहेत. किरण पुरंदरे यांना पक्ष्यांच्या अभ्यासाचे यश, साधनेतून मिळाले आहे,'' असे श्री. पाध्ये म्हणाले.

### * मेहता बुक सेलर्सचा अभिनव उपक्रम

वाचनसंस्कृती हरवत चालली असल्याची ओरड करणारे भरपूर असतात. पण ती जपण्यासाठी कुणी पुढे सरसावत नाही.

इलेक्ट्रॉनिक प्रसारमाध्यमे, इंटरनेट तसेच विविध वाहिन्यांमुळे विद्यार्थ्यांचीच नव्हे शिक्षकांची देखील वाचनाची आवड कमी होत चालली असल्याची तक्रार वारंवार कानी पडते. अशावेळी विविध चर्चासत्रे, व्याख्यानांमधून वाचनसंस्कृती टिकवण्याविषयी गंभीरपणे मते मांडली जातात. वाचनसंस्कृती जोपासली तरच जीवनात यशस्वी व्हाल असे मार्गदर्शनपर बोल सुनावले जातात. पण प्रत्यक्ष कृती करणारे अपवादात्मक स्थितीत आढळतात.

पुस्तकांच्या जगातच वावरणाऱ्या ज्येष्ठ प्रकाशक श्री. अनिल मेहतांना ही परिस्थिती अगदी जवळून पाहाता येते. त्यामुळे त्यांच्या मनात ठोस कृती करण्याची इच्छा अनेक दिवसांपासून होती.

दि. २३ एप्रिल हा दिवस जगभरात जागतिक पुस्तक दिन म्हणून साजरा करण्यात येतो. यावर्षी सोमवार दि. २३ एप्रिल रोजी जागतिक पुस्तक दिनानिमित्त मेहता बुक सेलर्स, कोल्हापूरतर्फे 'सत्याचे प्रयोग' हे महात्मा गांधीजींचे पुस्तक डॉ. सुनीलकुमार लवटे यांच्या हस्ते शंभर मुलांना मोफत देण्यात आले.

विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाव्यतिरिक्त अवांतर वाचनाची आवड लावली तर ती त्यांच्या सर्वांगिण व्यक्तिमत्वविकासास सहाय्यभूत ठरेल, आणि भविष्यात ही आवड ते इतरांना लावतील असा विश्वास श्री. अनिल मेहता यांनी यानिमित्ताने व्यक्त केला.

❐

विशेष वार्ता

# 'स्वामी'कार रणजित देसाई पुरस्कार सोहळा

'मेहता पब्लिशिंग हाऊस फाउंडेशन'तर्फे प्रतिवर्षी मराठी भाषेत उत्कृष्ट साहित्यनिर्मिती करणाऱ्या लेखकांना 'स्वामी'कार रणजित देसाई पुरस्कार दिला जातो.

२००६ सालचे पुरस्कार नुकतेच जाहीर करण्यात आले. यंदा या पुरस्काराचे आठवे वर्ष होते. मुंबईतील प्रसिद्ध शल्यचिकित्सक डॉ. रवी बापट यांच्या वॉर्ड नंबर पाच, केईम या अनुभवकथनात्मक पुस्तकाला, डॉ. सुशीलकुमार लवटे यांच्या 'खाली जमीन वर आकाश' या आत्मचरित्राला तसेच श्रीमती सुप्रिया वकील यांना 'लिव्हिंग हिस्ट्री' या पुस्तकाच्या अनुवादाबद्दल हे पुरस्कार देण्यात आले.

रु. ६००० तसेच प्रत्येकी ५,००० रोख व स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

पुरस्कारसमारंभ ८ एप्रिल रोजी कोल्हापूर येथे पार पडला. ज्येष्ठ नाट्यदिग्दर्शक व छायाचित्रकार श्री. मोहन वाघ हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

याप्रसंगी बोलताना श्री. मोहन वाघ म्हणाले, ''रणजित देसाईंनी 'स्वामी'च्या अपूर्व यशानंतर 'राधेय' ही कर्णाच्या जीवनावर आधारित कादंबरी लिहिण्यास घेतली. याबाबत वि. स. खांडेकरांनी 'राधेय' जेव्हा प्रकाशित होईल, तेव्हा वाचक 'ययाती'ला विसरून जातील, असे उद्‌गार काढले होते.

'स्वामी' या कादंबरीवर आधारित नाटक प्रेक्षकांपुढे यावे असे आम्हा नाटककर्मींना वाटे. यासाठी प्रत्यक्ष रणजित देसाईंनाच 'कादंबरीचे नाट्यरूपांतर करावे' अशी गळ आम्ही घातली. त्यासाठी खूप प्रयत्न करावे लागले. शेवटी रणजितदादांनी 'स्वामी'चं नाट्यरूपांतर केलं. या नाटकाचा पहिला प्रयोग शनिवारवाड्यासमोर झाला. तो यशस्वी ठरला.'' अशी आठवण श्री. वाघ यांनी सांगितली.


रणजित देसाई वि. स. खांडेकरांना गुरुस्थानी मानत. शिष्याला प्रोत्साहन देणारा वि. स. खांडेकरांसारखा गुरू लाभल्याने रणजित देसाई साहित्यक्षेत्रात अजोड कामगिरी करू शकले असे मतही श्री. वाघ यांनी व्यक्त केले.




डॉ. रवि बापट

ज्येष्ठ शल्यचिकित्सक डॉ. रवी बापट म्हणाले, ''मी काही लेखक-साहित्यिक नाही. पण जीवनात आलेले अनुभव पुस्तकाद्वारे मांडण्याचा प्रयत्न मी केला. तो वाचकांना भावला. या पुस्तकानंतर वाचकांचा व समीक्षकांचा भरघोस प्रतिसाद मला लाभला. यातून मराठी वाचकांना अनुभवसिद्ध लिखाण आवडते हे सिद्ध झाले आहे.''

'खाली जमीन वर आकाश' या आत्मकथनातून वाचकांशी एक चांगला संवाद झाला. समाजमनाचे संबंध तसेच द्वंद्व उलगडण्याचा प्रयत्न यातून केलेला आहे. परस्पर मानवी संबंध हेच चिरस्थायी टिकणारे असतात हा अनुभव या आत्मकथनाच्या निमित्ताने मला आला, असे डॉ. सुशीलकुमार लवटे यांनी म्हटले.


डॉ. सुनीलकुमार लवटे


सुप्रिया वकील

'मेहता पब्लिशिंग हाऊस'ने नवख्या लेखकांना प्रोत्साहित करण्याचे मोठे काम केले आहे.

'लिव्हिंग हिस्ट्री' सारखे मोठे आत्मचरित्र या प्रोत्साहनामुळेच मी अनुवादित करू शकले, असे मनोगत श्रीमती सुप्रिया वकील यांनी व्यक्त केले.

श्री. अनिल मेहता यांनी प्रास्ताविक तसेच उपस्थितांचे स्वागत केले. सूत्रसंचालन नीना मोत्री-नाईक यांनी केले.

❐

## अरुणा सबाने यांची नवी कादंबरी

### विमुक्ता

अरुणा सबाने

मुखपृष्ठ - चंद्रमोहन कुलकर्णी

**शब्दालय प्रकाशन,** श्रीरामपूर.

**किंमत : २२० रुपये**

**विमुक्ता**मध्ये स्त्रीमुक्तीचे वास्तवनिष्ठ आणि कलात्मक, विचारगर्भ आणि प्रत्ययपूर्ण चित्रण आहे.

ती स्त्रीवाचकालाच नव्हे पुरुषवाचकालाही आपले सामाजिक आत्मचरित्र वाटेल!

**- डॉ. द. भि. कुलकर्णी**

**विमुक्ता** - सामाजिक बांधिलकी आणि कौटुंबिक वात्सल्य यात संतुलन साधत आपले व्यक्तित्व फुलविणाऱ्या, तिचे एकएक पंख उपटून टाकणाऱ्या कोंडीतून धाडसाने बाहेर पडणाऱ्या अशा आत्मनिर्भर कर्तृत्वसंपन्न **विमुक्ता**ची ही कलात्मक आणि वास्तव कहाणी. 'अनुबंध' लिहिणाऱ्या अरुणा सबाने त्यांच्या समर्थ लेखणीचा हा कसदार आविष्कार!

**- शंकर सारडा,** पुणे

अरुणा सबाने यांची **विमुक्ता** ही कादंबरी जीवनसंघर्षात खचलेल्या स्त्रीमनाला निश्चितपणे आधार वाटावी अशा स्वरूपाची आहे.

वाट्याला आलेल्या दुःखभरल्या प्रसंगावर मात करून जिद्दीने आयुष्याला सामोरे जाण्याचे शिक्षण देणारी, विशेषत: स्त्रीचे सबलीकरण करण्याची क्षमता बाळगणारी ही **विमुक्ता**

**- विलास खोले,** पुणे

**- पुस्तके पुढील ठिकाणी उपलब्ध -**

**आकांक्षा प्रकाशन,** ए/५६० गणेश गौरी, कोतवाल नगर, गुमास्ता लेआउट, नागपूर ४४० ०१५. **फोन - ९५२३६८५४८३, (०७१२)२२४७८८४**




नवीन

## वास्तु-अजित

**अजित राजाराम जाधव**

**किंमत : ३०० रुपये**

**पोस्टेज : २५ रुपये**




वेदोपनिषदांच्या मूलाधारासह आधुनिक वास्तुशास्त्राच्या सर्व संकेत, संदर्भांनी युक्त असलेला आदर्श वास्तुग्रंथ. पाकगृह, बैठकगृह, निद्रागृह, स्नानगृह, शौचालय अशा आवश्यक वास्तुविभागांचे त्यातील सूक्ष्म बारकाव्यांचे शास्त्रीय मिमांसेसहित सचित्र मार्गदर्शन. केवळ राहते घरचं नाही तर कार्यालय, दुकाने, औद्योगिक कारखाने, बांधकामांचे आराखडे, बांधकामातील विविध टप्पे यांचे वास्तुशास्त्राच्या संकेतानुसार केलेले तौलनिक अभ्यासात्मक मार्गदर्शन.

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**



**प्रख्यात कन्नड लेखिका, इन्फोसिस फौंडेशनच्या अध्यक्षा 'सुधा मूर्ती' यांची १३ मार्च रोजी नाशिकच्या 'कालिदास कला मंदिरात' प्रकट मुलाखत झाली. 'पुण्यभूमी भारत या त्यांच्या पुस्तकाचे प्रकाशनही त्यानिमित्ताने झाले. 'मेहता पब्लिशिंग हाऊस' तर्फे आयोजित या कार्यक्रमास नाशिककरांनी अलोट, उत्स्फूर्त उपस्थिती लावली.**

**या मुलाखतीत सुधा मूर्तींनी आपल्या वाटचालीतील महत्वाच्या घटना, घडामोडींचा पट उलगडून दाखवला. यानिमित्ताने उपस्थित रसिक वाचकांना सुधा मूर्तींमधल्या सिद्धहस्त लेखिकेचे, दक्ष गृहिणीचे, प्रेमळ शिक्षिकेचे तसेच तळमळीच्या समाजसेविकेचे दर्शन घडले.**

**'ग्रंथजगत'च्या वाचकांसाठी या मुलाखतीचा पहिला भाग एप्रिलच्या अंकात प्रसिद्ध केला. हा दुसरा आणि शेवटचा भाग.**

***७. प्रश्न : 'इन्फोसिस'च्या उभारणीत श्री. नारायणमूर्ती व त्यांच्या इतर सहकाऱ्यांप्रमाणे आपलाही महत्त्वाचा वाटा आहे. कंपनी सुरू करण्यासाठी आपण श्री. नारायणमूर्तींना १०,००० रु. भांडवल म्हणून दिले, त्यावेळी 'इन्फोसिस'ला भविष्यात मोठे यश लाभेल असे वाटले होते का?***

अजिबात नाही. नारायणमूर्तींचा पिंड लक्षात घेता ते कोणत्याही नोकरीत स्थिर होतील असे वाटत नव्हते. कारण त्यापूर्वीही दोन नोकऱ्या त्यांनी सोडल्या होत्या. एखादी स्वतंत्र, माहिती तंत्रज्ञानावर आधारित कंपनी सुरू करावी असे त्यांना वाटत होते. तो विचार त्यांनी मजजवळही बोलून दाखवला होता. त्यासाठी १०,००० रु. भांडवल त्यांना हवे होते.

माझा नवरा कोणत्याही नोकरीत टिकणार नाही याची मला खात्री होतीच. आता एखादा स्वतंत्र व्यवसाय सुरू करावा असे त्याला वाटतेय, तर तोही प्रयोग करून बघूया...! असे म्हणून दरमहा बचतीतून जमलेले १०,००० रुपये मी नारायणमूर्तींकडे सुपूर्द केले.

'तुम्ही नेमकं काय करणार आहात?' असा प्रश्न मी नारायणमूर्तींना विचारला असता ते म्हणाले, 'सुधा, येत्या काही वर्षांत माहिती तंत्रज्ञानावर आधारित उद्योगांना प्रचंड वाव असणार आहे. भारताने या संधीचा फायदा घेऊन या क्षेत्रात उडी घ्यावी, असे मला वाटते. आज जगभर आपण सर्वत्र पाहतो, ऐकतो तेव्हा, Japanies goods are good, English goods are good असे कानी पडते. मात्र एक दिवस Indian Software is good असे सर्वत्र म्हटले जावे अशी माझी इच्छा आहे. मला माझ्या सहकाऱ्यांसह एक Software Company सुरू करावयाची आहे. यातच मी स्वत:ला झोकून देणार आहे.'

नारायणमूर्ती गांभीर्याने बोलत आहेत हे लक्षात आल्यावर मी त्यांना म्हणाले, 'ठीक आहे. कंपनीच्या उभारणीसाठी तुम्ही नेटाने प्रयत्न करा. मुलांची, घराची सर्व जबाबदारी मी पेलेन.'

यानंतर मूर्तींनी त्यांच्या सहकाऱ्यांसह इन्फोसिसच्या उभारणीसाठी अक्षरश: झोकून दिले. यानंतरचा इतिहास आपणा सर्वांना ठाऊकच आहे.

***८. प्रश्न : 'इन्फोसिस' या कंपनीची सुरुवात कशी झाली, सुरुवातीला कामाचं स्वरूप कसं होतं, प्रत्येकानं काय योगदान दिलं, या आठवणींना तुमच्या हृदयात नक्कीच विशेष स्थान असेल असं वाटतं, तेव्हा याबाबत काही सांगावं?***

इन्फोसिसची मूळ सुरुवात पुण्यात झाली. दोन बेडरूमच्या लहानशा फ्लॅटमध्ये आम्ही इन्फोसिसची सुरुवात केली. आम्हा दोघांशिवाय, नंदन निलकेणी आणि त्यांची पत्नी रोहिणी, गोपालकृष्णन आणि सुधा, शिबुलाल आणि कुमारी, रामन आणि जमुना आणि अविवाहित असलेला अशोक असे इतर सहकारी होते. यापैकी नंदन निलकेणी आणि शिबुलाल हे अमेरिकेत राहून इन्फोसिसला contract basis work कसे मिळवता येईल हे पाहत असत.

जाहिरात देवून आम्ही उमेदवारांची भरती करण्यास सुरुवात केली. सुरुवातीला कोणीही फारसा प्रतिसाद दिला नाही. कंपनीला स्वत:ची जागाही नाही हे पाहून कोणीही येण्यास तयार नव्हते. थोडेफार कामकाज सुरू झाले होते. मात्र अचानक सर्वांना बँगलोरला स्थायिक व्हावे लागले. तिथं मात्र कंपनीसाठी स्वतंत्र जागा घेतली. आम्ही सर्वजण तीन बेडरूमच्या मोठ्या फ्लॅटमध्ये एकत्र राहू लागलो.

कंपनीच्या कामानिमित्त प्रत्येकाला काही ना काही जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागत होत्या. मी एकाच वेळी Receptionist, Accountant, Controller अशा विविध आघाड्या सांभाळत होते. अशा वेळी मुलांकडे नंदनची पत्नी रोहिणी लक्ष देत असे. अशा प्रकारे परस्परांच्या अडचणींना सोडवणं, मुलाबाळांना

सांभाळणं, या जबाबदाऱ्या समूजतदारपणे कोणताही वाद न होता पार पाडल्या जात. कारण आम्हा सर्वांचं ध्येय इन्फोसिसला प्रगतीपथावर नेणं हेच होतं.

***९. प्रश्न : इन्फोसिस प्रगतीच्या एका विशिष्ट टप्प्यावर असताना नारायणमूर्तींनी, 'या कंपनीसाठी एकतर मी पूर्णवेळ काम करेन, नाही तर तू' अशी अट तुम्हाला घातली. तुम्ही ती मान्य केली आणि कंपनीच्या दैनंदिन कामकाजातून बाहेर पडलात. मात्र तुमचं एकंदरीत स्वतंत्र व्यक्तिमत्त्व पाहता ही अट मान्य करताना तुम्हाला मानसिक क्लेश झाला का?***

नक्कीच झाला. एक वेळ अशी आली होती की माझी कार्यक्षमता पाहून नंदन निलकेणींनी, 'Sudha, you are well qualified, you should become director,' असे म्हणून मला कंपनीचा मुख्य संचालक होण्यास सुचवले होते. नारायणमूर्तींनीही याला विरोध केला नव्हता. मात्र खासगीत ते मला म्हणाले, 'सुधा, एकाच कंपनीत पती-पत्नी मुख्य अधिकारपदावर असतील तर संपूर्ण system ला कौटुंबिक स्वरूप प्राप्त होते. कंपनीची सुरुवात जरी आपण केली असली तरी त्याला एक professional स्वरूप असले पाहिजे. कौटुंबिक मक्तेदारी नुकसानकारक ठरू शकते. दोघेही कंपनीच्या कामात गुंतलो की मुलांकडे दुर्लक्ष होईल. मुलांच्या योग्य संगोपनाकडेही लक्ष देणे तितकेच आवश्यक आहे. त्यामुळे आपल्यापैकी कोणी एकानेच कंपनीसाठी पूर्णवेळ द्यावा असे मला वाटते. अर्थात तू संचालक होण्याचा निर्णय घेतलास तरी माझे तुला सहकार्य असेलच.'

मूर्तींच्या या उद्‌गारांवर मी अंतर्मुख झाले. सारासार विचार केला. इन्फोसिसला प्रगतीपथावर न्यायचे असेल तर कामानिमित्त सतत देशा-विदेशात फिरावे लागेल. शिवाय तो काळ 'लायसन्स राज'चा होता. सरकार दरबारी सतत चकरा माराव्या लागत. एखादं-दुसरा कॉम्प्युटर मिळवण्यासाठीही थेट 'वॉशिंग्टन'ला एकेक महिना मुक्काम करावा लागे. या सर्व गोष्टी विचारात घेता, लहान मुलांची जबाबदारी असलेली स्त्री हे काम पार पाडू शकणार नाही, हे वास्तव माझ्या लक्षात आले.

लहान वयातच मुलांवर योग्य मूल्यसंस्कार आवश्यक असतात. मूल्यसंस्कारांची ही जबाबदारी वडिलांपेक्षा आई अधिक सक्षमपणे पार पाडू शकते. शेवटी मातृत्व श्रेष्ठ ठरलं आणि मी इन्फोसिसच्या दैनंदिन कामकाजापासून स्वत:ला अलिप्त ठेवले.

अर्थातच मातृत्वाची जबाबदारी समर्थपणे पेलण्यात मी यशस्वी झाले याचा अनुभव मला माझ्या मुलांसंदर्भात अनेकदा आला आहे.

१३ डिसेंबर रोजी संसदेवर झालेल्या आत्मघातकी हल्ल्यात शहीद झालेल्या सुरक्षारक्षकांच्या विधवांची भेट घेण्यास, त्यांना सहाय्य करण्यास माझ्या मुलानेच मला प्रवृत्त केले.

'इन्फोसिस' कंपनी सुस्थापित झाल्यानंतर 'इन्फोसिस फाउंडेशन' उभारण्याचा मार्ग माझ्या मुलीनेच सुचवला.

मुलांमध्ये अशी समज मी निर्माण करू शकले हे केवळ त्यांना योग्य वयात दिलेल्या मूल्यसंस्कारांमुळेच हे नक्की.

***१०. प्रश्न : आज इन्फोसिस फाउंडेशन विविध समाजोपयोगी कार्यांना सक्रिय मदत करत आहे. मदतकार्यात योग्य ती दक्षता बाळगणाऱ्या या फाउंडेशनने स्वतंत्र ओळख प्रस्थापित केली आहे. एखाद्या कार्यासाठी मदत देण्याचे आपले निकष काय आहेत?***

ठराविक निकषापेक्षाही संबंधित व्यक्ती, संस्था अथवा प्रसंगाचे योग्य ते गांभीर्य ठेवून इन्फोसिस फाउंडेशन मदत करते. नैसर्गिक आपत्ती असो की आणखी काही; कोठेही जात, धर्म, प्रांत, भाषा या घटकांचा विचार केला जात नाही. अनाथ बालकं, असहाय्य स्त्रिया, शिक्षणापासून अद्यापही वंचित असलेला घटक, रुग्णालयं, शाळा अशा विविध मात्र खऱ्या गरजू घटकांपर्यंत आमची मदत जावी यासाठी आम्ही प्रयत्नशील असतो. पूर्वानुभवांमुळे काही बाबतीत वस्तुनिष्ठता, सत्यासत्यता फाउंडेशनच्या संबंधित कार्यकारिणीद्वारे पाहिली जाते. मात्र सरसकट सर्वांबाबतीत हा न्याय लावला जात नाही. प्रत्यक्ष भेटी दिल्या जातात. निधीची आवश्यकता जोखली जाते. त्यानुसार मदत केली जाते.

सध्या फाउंडेशनचे कार्य ओरिसा, महाराष्ट्र, तामिळनाडू, आंध्रप्रदेश, कर्नाटक आणि पंजाब या सहा राज्यांत चालू आहे. हळूहळू इतरत्रही राज्यांत पोहोचवण्याचा आमचा प्रयत्न राहील.

***११. प्रश्न : इन्फोसिस फाउंडेशनच्या निमित्ताने देशभर फिरताना तुम्हाला विविध जीवनानुभव आले ते तुम्ही शब्दबद्ध केलेत. 'समाजातील सर्वाधिक उपेक्षित, दुर्लक्षित घटकांनी मला नवीन जीवनदृष्टी दिली' असे तुम्ही म्हटले आहे. ही जीवनदृष्टी मिळाली म्हणजे नेमकं काय?***

उत्तर : इन्फोसिस फाउंडेशनचं कार्य प्रामुख्यानं ग्रामीण भागात चालते. कामानिमित्त मी देशाच्या बहुतांश ग्रामीण भागात हिंडले. तेथील समाजजीवन जवळून अनुभवले. यानिमित्ताने बरेच अनुभव आले. काही अनुभवांनी विलक्षण अस्वस्थ केलं, तर काहींमुळे जीवनाकडे बघण्याची दृष्टीच पालटली. 'वाईज अँड अदरवाईज' या पुस्तकात मी हे सर्व अनुभव शब्दबद्ध केले आहेत!

ओरिसामध्ये नुकतचं फाउंडेशनचं कार्य सुरु झालं होतं.ओरिसात प्रचंड गरिबी आहे,आदिवासींची संख्याही बरीच आहे. कलाहंडी या गावाला भेट देण्यासाठी

मी गेले होते. आदिवासी वस्ती असलेलं हे गावं. तिथं एक वृद्ध व्यक्ती मला भेटली.या वृद्धाशी झालेलं माझं संभाषण मला वेगळा जीवनानुभव देवून गेलं. त्यांचं वय किमान शंभर तरी सहज असावं.

इतकं वय असूनही गेल्या सत्तर-ऐंशी वर्षात भारतात घडलेल्या स्थित्यंतराची त्याला यत्किंचितही कल्पना नव्हती. यावरुन संपूर्ण आदिवासी समाजच राष्ट्रीय प्रवाहापासून किती दूर आहे याची आपण कल्पना करु शकतो.

सहज कुतूहल म्हणून मी त्यांना विचारले, 'बाबा, आपल्या देशावर आता कुणाचं राज्य आहे. ते म्हणाले 'कंपनी सरकारचं.'भारताला स्वातंत्र्य मिळून पन्नास वर्ष उलटली याची कल्पना त्यांना नव्हती. मी त्यांना काही चलनी नाणी, नोटा दाखवून आपण आता स्वतंत्र झालो आहोत, आपल्यावर आता कुणाचही राज्य नाही असे सांगीतले. पण त्यांना काहीच बोध झाला नाही. मी त्यांना म्हणाले, 'बाबा, या कागदाच्या तुकड्यातून तुम्ही कपडे,खायला चांगलं अन्न तसेच गरजेच्या इतर गोष्टी विकत घेवू शकता.याची तुम्हाला कल्पना आहे. का?असे सांगीतल्यावर ते म्हणाले, 'बाई तुम्ही शहरातली लोक या कागदाच्या तुकड्यासाठी आपापसात भांडता,जवळच्या माणसांपासून दूर जाता, प्रसंगी एकमेकांच्या जिवावर उठता,आम्ही मात्र या कागदाच्या तुकड्याशिवाय आम्ही इतकी वर्ष इथे व्यवस्थित जगलोच ना!आमच्या पिढ्यानपिढ्या इथे सुखानं आयुष्य जगत आहेत.तुमच्या या कागदी तुकड्यामुळे आमच्या आयुष्यात फार मोठी उलथापालथ घडेल.त्या वृद्ध बाबांच्या या उत्तरामुळे मी अंतर्मुख झाले.हा प्रसंग माझा दृष्टीकोण बदलवणारा ठरला हे निश्चीत.

**१२. *प्रश्न : आज इन्फोसिस फौंडेशनशिवाय सुधा मूर्ती यांची ओळख एक विख्यात स्तंभलेखिका तसेच कन्नड साहित्यातील नामवंत लेखिका म्हणूनही आहे.कादंबऱ्यांतून,ललित लेखनांमधून आपल्यातील सर्जनशील लेखिकेचे दर्शन घडते.प्रत्येक साहित्यकृतीमागे आपण एक संदेश दिला आहे. असे संदेशात्मक लेखन आपण जाणीवपूर्वक करता की तो आपल्या स्वभावाचाचं एक भाग आहे?***

मी पेशाने शिक्षिका आहे. अभ्यासक्रमासोबतच विद्यार्थ्यांना जीवनव्यवहारमूल्यांची शिकवण देणं हे शिक्षकाचं कर्तव्य आहे. प्रत्येक तासिकेनंतर मी विद्यार्थ्यांना कायम एखादी बोधकथा सांगत असे. विद्यार्थी लक्ष देवून या गोष्टी एकत असत.

काही जुने विद्यार्थी अजूनही भेटतात.मी त्यांना विचारत असते,'काय रे,मी तुम्हाला विविध विषय शिकवले.त्यात सर्वाधिक लक्षात काय राहिलं?

ते म्हणतात,'बाई, कोणताही विषय आता फारसा स्मरणात नाही,पण तुम्ही ज्या बोधकथा सांगत होता. त्यातून जी मूल्य शिकवत होता, ती आज पदोपदी उपयोगी पडत आहेत.

आज लहान मुलांपुढे, तरुणांपुढे आदर्श असावा अशी व्यक्तीमत्व समाजात कमी आहेत. तशातच विभक्त कुटुंबपद्धती अस्तित्वात येत आहे. त्यामुळे आई-वडिलांच्या सहवासाशिवाय आजी-आजोबांच्या सहवासाची जी आवश्यकता असली पाहिजे ती मिळत नाही. आपल्या पुढच्या पिढीवर संस्कार करण्याची जबाबदारी आपलीच आहे. त्यामुळे माझ्या लेखनाचा बहुतांश कल हा बोधप्रद संदेश देण्याकडे असतो, तो माझ्यातील शिक्षक आणि लेखक हा समान पातळीवर जागृत असल्यामुळेच.

**१३ *प्रश्न : या कार्यक्रमासाठी तरुणवर्ग मोठ्या संख्येने इथे उपस्थित आहे.या तरुणवर्गापुढे गेल्या काही वर्षात राष्ट्रपती डॉ.कलाम, नारायणमूर्ती, अजिम प्रेमजी यांसारखे आदर्श निर्माण झाले.२०२० साली भारत महासत्ता होणार आणि त्यात तरुणवर्गाचा मोठ्या प्रमाणात सहभाग असणार असे चित्र रंगवले जात आहे. याबाबत आपले काय मत आहे?***

आपण योग्य मार्गाने जात राहिलो, त्यात सातत्य राखले तर ही बाब अशक्य नाही.जागतीकीकरणामुळे अर्थव्यवस्था खुली झाली आहे. बहुराष्ट्रीय कंपन्या भारतात येत आहेत. तरुणवर्गाला नवनवीन संधी उपलब्ध होत आहेत. केवळ उत्तम पगार मिळतो म्हणून तरुणांनी त्यातच समाधानी असू नये.सदैव ध्येयवादी असावे.महत्वाकांक्षी असावे.पैसाही उत्तम कमवावा आणि तो ही सन्मार्गाने.

हृदयात अनुकंपा, इतरांविषयी प्रेम,देशाविषयी कायम जागृत ठेवा.जग अनेक प्रलोभनांनी युक्त आहे. तारुण्य प्रलोभनांना भुलतं. मात्र स्वत:वरचा विश्वास आणि जीवनमूल्यांची शिकवण कायम अढळ ठेवाल तर यशस्वीतेचा मार्ग सहज सापडेल.

तुमच्यापुढील हे आदर्श याचं मार्गाने पुढे गेले आणि यशस्वी झाले तुम्हीदेखील याचं मार्गाने जाल तर नक्कीच यशस्वी व्हाल याची खात्री बाळगा.

मुलाखतकार - **अपर्णा वेलणकर**

**मेहता पब्लिशिंग हाऊसची दर्जेदार ग्रंथसंपदा**
**'ऐका' आता थेट नभोवाणीवर...**

**वाचकमित्रहो...**

महाराष्ट्रातील तसेच महाराष्ट्राच्या बाहेर जगभरातील कोट्यावधी मराठी वाचकांपर्यंत पोहोचण्यासाठी 'मेहता पब्लिशिंग हाऊस' विविध माध्यमांद्वारे सतत प्रयत्नशील असते. www. mehtapublishinghouse.com या आमच्या वेबसाईटची जगभरातील मराठी वाचकांनी आवर्जून दखल घेतली आहे. 'मेहता मराठी ग्रंथजगत' सोबतच विविध वृत्तपत्रे, प्रसारमाध्यमांद्वारे आमच्या साहित्यसंपदेची ओळख मराठी वाचकाला आहेच...

आता पुणे नभोवाणीच्या सहकार्याने सकाळच्या प्रहरी, दर गुरुवारी, ठीक सात वाजून पन्नास मिनीटांनी (बातम्यांनंतर) आपण मेहता पब्लिशिंग हाऊसच्या पुस्तकांची ओळख 'ऐकू' शकाल. 'इथे पुस्तके भेटतात' मध्ये.

या कार्यक्रमामध्ये वाचक-श्रोत्यांना एक प्रश्न विचारला जाईल. प्रश्नाचे उत्तर 'पोस्टकार्ड'द्वारे मेहता पब्लिशिंग हाऊसच्या 'पुणे' येथील पत्त्यावर पाठवावे. सहभागी स्पर्धकांमधून भाग्यवान विजेत्याची निवड केली जाईल व त्याला मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे दर्जेदार पुस्तक भेट मिळेल.


**चला तर मग... भेटूया दर गुरुवारी सकाळी ठीक ७:५० वाजता 'पुणे नभोवाणीवर'.**

**प्रिय वाचकमित्रहो........**

आपल्या सोयीसाठी **'मेहता पब्लिशिंग हाऊस'**चे ग्रंथदालन
आत दर रविवारी नियमित सुरु राहील.
वेळ - सकाळी १० ते दुपारी ४

**सभासदांनी पुस्तकखरेदीस येताना मेंबरकार्ड जरूर आणावे.**




# टू सर विथ लव्ह

**ई. आर. ब्रेथवेट**
**अनु. लीना सोहोनी**

**१५०रु. पोस्टेज २०रु.**

मि. ब्रेथवेट....

एका ध्येयानं प्रेरित झालेल्या या शिक्षकानं विद्यार्थ्यांमधील रागाचं, द्वेषचं, तिरस्काराचं रुपांतर प्रेमात केलं.

पौगंडावस्थेतील बंडखोरीचं रुपांतर आत्मविश्वासात केलं. इतरांच्या दृष्टीकोनातून विचार कसा करावा, हे त्या मुलांना शिकवलं.

हा मि. ब्रेथवेट यांचा विजय होता. एका शिक्षकाच्या तळमळीचा, विद्यार्थ्यांविषयी वाटणाऱ्या कळकळीचा आणि सर्वात महत्वाचं म्हणजे त्यांचा प्रेमाचा...

***शाळेच्या दैनंदिन जीवनावर आधारलेली एक अभिजात साहित्यकृती... प्रत्येकाने वाचावीच अशी.....***

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**



## अनुवादांवर भर

**मंजूषा आमडेकर**


माझं पहिलं पुस्तक ‘मन्नो’ लिहिलं तेव्हा माझी सहा वर्षांची मुलगी डोळ्यापुढे होती. पण त्यानंतर बालसाहित्य लिहिताना ५ ते १२ असा वयोगट समोर ठेवून लिहायला सुरुवात केली. ‘मन्नो’ हे ‘वाचा आणि रंगवा’ या धर्तीवर तयार केले होते. त्याला मुलं-पालक आणि शिक्षकांचा उत्तम प्रतिसाद आला. पुढे अशाच धर्तीवर ‘रंगांची रंगीत गोष्ट’ हे वाचा-रंगवा-प्रयोग करा या प्रकारे मुलांना कल्पना-वास्तव यांचं मिश्रण करून स्वत:हून प्रयोग करण्यास उद्युक्त करणारं पुस्तक लिहिलं. त्यात मुलांचा भाषिक विकास होईल अशीही काळजी घेतली.

स्वतंत्र लेखनाबरोबरच अनुवादाच्या क्षेत्रातही काम करत आहे. या अनुवादांमधून मुलांना वेगवेगळ्या देशात, समाजात, संस्कृतींमध्ये काय काय चालतं ते कळू शकतं. नवीन शब्दांची भर पडून शब्दज्ञान वाढतं. कल्पकतेला चालना मिळते. मुलं स्वत: लिहिती होऊ शकतात.

वयोगटाचा विचार करून लिहिताना छोट्यांसाठी चित्रमय पुस्तकं, सोप्या शब्दांत लोककथा, परीकथा लिहिल्या, अनुवादित केल्या. मधल्या वयोगटाकरता तेनालीरामच्या कथा लिहिल्या. पुढे टीनएजच्या दिशेने प्रवास करणाऱ्या १०-१२-१३ वयोगटासाठी साहसकथा लिहिल्या. हॅरी पॉटरसारख्या पुस्तकांचे अनुवाद केले– करत आहे.

मुलांना थेट उपदेश देणारं किंवा बोध माथी मारणारं साहित्य फारसं लिहायला आवडत नाही. कल्पना आणि वास्तव यांचं मिश्रण करून लिहायला जास्त आवडतं. मुलं शिकत असतातच दर क्षणी. माझ्या मते, खरं प्रबोधन पालकांचंच होण्याची आजच्या घडीला गांभीर्याने गरज आहे. संपूर्ण जगच पुस्तकासारखं वाचणाऱ्या मुलांना आनंदाने, नैसर्गिकपणे कसं फुलू द्यावं हे पालकांनाच शिकून घेण्याची गरज आहे.






डोळ्यात काजळ, गालावर तिटी, कमरेला गोफ, पायात वाळा, अशी मन्नो सहा वर्षांची झाली.

आता ही मन्नो कोण? कुठलीही मुलगी... पिंकी, रिंकी, बबली, चंपी, बेबी, चिंगी... शहरातली. गावातली.

ही मन्नो मोठी चौकस आहे. आपल्या भिरभिरत्या डोळ्यांनी ती चौफेर बघत असते. काहीही नवे दिसले की रेंगाळते. संवाद साधू पाहते.

तिला कोंबडी दिसली की ती बघते– अरे ही दाणे टिपते, अंडे देते, कुकूचक करते.

तिला मोती दिसला की ती बघते– अरे, हा भाकरी खातो, राखण करतो, भू भू ओरडतो.

तिला मनी मावशी दिसली की ती बघते– अरे, ही दुदू पिते, उंदीर खाते, म्यांव म्यांव करते.

सगळ्या गोष्टी ती बघते, त्या गोष्टी मनात साठवते. त्यांची वैशिष्ट्ये लक्षात ठेवते.


कधी कधी आकाशात ढग गडगडतात, वीज कडकडते, पाऊस पडू लागतो.

मग ती गाणे म्हणते.

*ढमढम ढोल वाजला ढगात*
*छमछम पाऊस नाचला अंगणात!*
*कडाडकड वीज चमकली.*
*मन्नो बाबांच्या कुशीत शिरली...*

पहिला वळवाचा पाऊस पडला की तिला मातीचा वास येतो. ढग म्हणजे तिला आकाशावर चमचमणारे कापसाचे ढीग वाटतात. वाऱ्याबरोबर काळे काळे ढग हत्तीसारखे इकडेतिकडे पळताना दिसतात.

पाऊस, दंगा करत येतो, धो धो धो धो कोसळतो. डोंगरावरून नदीत येतो, झाडाझुडपातून दऱ्याखोऱ्यात जातो– शेतात, रानात धमाल करतो.



*सरीवर सरी सड सड सड*
*गारा पडल्या तड तड तड*
*शेतात नाचला थयथय फार*
*तोंडावर सपसप लागतो मार*

पावसाच्या दिवसांत शाळेला गाताना मन्नोला आणखीही खूप गोष्टी दिसतात.

बेडूक दगडाखालून वर येतात. पावसात भिजतात, डराव डराव ओरडत नाचतात बागडतात.

गायी डोंगरउतारावर चरत असतात. कावळे बगळे त्यांच्या पाठीवर बसतात.

गोगलगायी पोटात पाय घेऊन हळूहळू चालत असतात.

काळेकुट्ट भुंगे गुं गुं करीत फुलांभोवती घिरट्या घालतात.


कळप करून शेतात बसतात.

तळ्याकाठचा खेकडा वाकडावाकडा फेंगाडत चालत राहतो–

कधीतरी जोरदार वारा येतो आणि सिद्धीची छत्री उडून जाते. मग इतर मुले हसू लागतात. हसता हसता पुरेवाट होते.



*मज्जा झाली सिद्धीची*
*न ऐकणाऱ्या*
*मुलीची!*



मन्नोला पावसाळ्यात गंमत वाटते. पाणीच पाणी सगळीकडे!

पण नंतर पाऊस थांबतो. हिवाळा येतो.

थंडी सुरू होते. कुडकुडायला होते. ऊबदार कपडे घालावे लागतात. वडपिंपळाच्या ढोलीत खारूताई तळ देते. झाडाच्या फांदीच्या बेचक्यात पक्षी घरटी बांधतात. वळचणीला पारवे घुमू लागतात, मुंग्या वारूळ बांधू लागतात. वाघोबा गुहेत ताणून देतो.

झाडावरची पानं गळू लागतात.

रात्रभर जागून पाठीला कुबड आलेलं घुबड मन्नोला दिसतं.

उलटं लटकणारं वटवाघूळ तिला दिसतं.

घुमून घुमून घसा बसलेला पारवा तिला आवडतो.

पाठीवर दप्तर घेऊन गोगलगाय आणि कासव शाळेत चाललेत असं तिला वाटतं.


खूप ओझं पाठीवर घेऊन चाललेलं गाढव फक्कड तान घेतंय असं मन्नोला वाटतं.

आकाशातला ढग आणि झाडकाका यांच्याशी मन्नोची दोस्ती होते. ढग मग तिला जंगलातून मस्तीत चाललेल्या हत्तीची गोष्ट सांगतो; सोन्याचा हंडा देणाऱ्या हुशार माशाची गोष्ट सांगतो; तर झाडकाका लंब्याचवड्या थापा मारणाऱ्या बंडोजीची आणि टोपीविक्या माकडांची गोष्ट सांगतात.

आता आपली मन्नोही आजच्या टीव्ही-इंटरनेटच्या (पीसीवर) जमान्यातली आहे. ती डिस्कव्हरी चॅनेल बघते. आपल्या संगणकावर गेम खेळते.

*मी आणि माझा पीसी*
*मजेत खेळत असतो*
*तो मला पुष्कळ गोष्टी*
*न रागावता शिकवतो*
*पेंटशॉपमध्ये जाऊन कधी*
*काढते मस्त चित्र*
*कधी पत्ते कधी चेस*

*खेळतो माझा मित्र*
*लहरी आली की खेळत*
*बसते*
*मी प्रिन्सचा खेळ*
*मधेच मावशीला सहज*
*म्हणून*
*पाठवून देते ई-मेल.*



ढग मन्नोला सल्ला देतो, ''तू माझी मैत्रीण. एक काम कर. झाडं लाव. स्वत: झाडं लाव, तुझ्या मैत्रिणींनाही सांग.''

मन्नो आपल्या आईला म्हणते,
''आई, मी झाड लावू का आपल्या सोसायटीत? वडाचं झाड... ते मोठं होईल. त्याच्याभोवती पार बांधू, तिथं संध्याकाळी मुलं जमतील. आजी गोष्ट सांगेल. दुपारी सावली मिळेल. शुद्ध हवा मिळेल. झाडावर खूप पक्षी येतील. घरटं करतील. मजा येईल.''

आई मन्नोची ही इच्छा ऐकून खूष होते. मन्नोचे कौतुक करते.

आता सांगा, अशी मन्नो तुम्हालाही आवडेल ना?

तुमच्या घरातही ती असेल कदाचित्. तिला योग्य उत्तेजन द्यायला नको का?

ह्या मन्नोचे एक सांगणे आहे– ते लक्षात ठेवा

*आई बाबा, अभ्यासाची करू नका सक्ती*
*मोठ्ठं व्हायची उगीचच मग वाटत राहते धास्ती.*
*आई, मला फुलासारखं आनंदानं फुलू दे*
*रानामधल्या झाडासारखं मनमुराद वाढू दे*
*कुंडीमधल्या रोपट्यासारखं करू नको बरं*
*अभ्यासही हवा मला हवेत नवे छंद*

या पुस्तकाची आणखी एक खासियत आहे, बरं का!


या पुस्तकातील चित्रे रंगवण्यासाठी काढलेली आहेत.

ती तुम्ही रंगवू शकाल. ढग, झाडे, पशु, पक्षी, मोर, सूर्य, पाऊस, छत्री... खूप खूप!

मंजुषा आमडेकर यांची ही लाडकी मन्नो तुम्हा छोट्या दोस्तांनाही आवडेल.

**पृष्ठे: ३२ किंमत: २५रु. ● सभासदांना : १८रु. ● पोस्टेज :२०रु.**






## सोन्याचा पाऊस

**अद्‌भूत मजेदार कथा**

**मंजूषा आमडेकर**

'अलीबाबा आणि चाळीस चोर', ही 'अरेबियन नाइटस्' मधली कथा. तिची गंमत काही वेगळीच! कितीही वेळा ही गोष्ट ऐकली तरी शिळी वाटत नाही.

'तिळा उघड' म्हटल्याबरोबर गुहेवरचे दार उघडून आत प्रवेश करण्याचा मार्ग मोकळा होतो आणि त्या गुहेत शिरून अलिबाबा तेथील सोन्याचे दागिने, हिरेमाणके वगैरे घेऊन घरी येतो. त्याचा भाऊ कासीम याला ह्या गोष्टीचा पत्ता लागतो... तोही या गुहेत शिरतो. पण गुहेतून बाहेर पडताना नेमका परवलीचा शब्द विसरतो. डाकूंचा सरदार त्याला ठार मारून टाकतो. तो डाकूंच्या सरदार अलिबाबाचाही पत्ता लावतो आणि त्याला मारण्यासाठी कारस्थान रचतो. तेलाचा व्यापारी म्हणून अलिबाबाच्या घरी तो रात्रभर मुक्कामासाठी येतो. ''माझ्याबरोबर तेलाची ही पिंपेही अंगणात ठेवायला परवानगी द्या'' असे म्हणतो. या पिंपात त्या डाकूचे साथीदार लपलेले

असतात हे अलिबाबाच्या दासीला– मार्जिनाला ठाऊक असते. ती रात्री प्रत्येक पिंपात तेल ओतते तेव्हा ते दरोडेखोर ओरडू लागतात. डाकूंचा सरदार पळून जातो; पण हे चाळीस दरोडेखोर कोतवालाच्या ताब्यात सापडतात. अलिबाबा अफाट संपत्तीचा मालक होतो.

'अरेबियन नाइटस'मध्ये अशा अनेक गोष्टी आढळतात. त्या जगभर प्रसिद्ध आहेत.

त्याचप्रमाणे अनेक परीकथाही खूप गाजलेल्या आहेत. त्याही देशोदेशी पसरलेल्या आहेत. वेगवेगळ्या भाषांमध्ये त्या पुन:पुन्हा सांगितल्या जातात. त्यांचे अनुवाद वा पुनर्कथन वेगवेगळ्या वयोगटातील मुलांना समजावे अशा प्रकारे सातत्याने होत आले आहे.



मंजुषा आमडेकर यांनी 'सोन्याचा पाऊस' या पुस्तकात 'अलिबाबा'ची गोष्ट पुनर्निवेदित केली आहे; त्याचप्रमाणे काही गाजलेल्या परीकथांचेही स्वैर अनुवाद केले आहेत.

शिकारीला अरण्यात गेलेल्या राजपुत्राला एक संन्याशी भेटून सांगतो, ''थांब. त्या डोंगरावर जाऊ नकोस. एक चेटकीण सोनेरी पंखांचा पक्षी पाठवते. त्या पक्ष्यामागे गेलेल्या प्रवाशाचा संगमरवरी पुतळा बनवते. डोंगरावर असे खूप पुतळे तुला दिसतील. तू त्या चेटकिणीचे केस धरलेस तर ती तुझ्या ताब्यात येईल.''

तो राजपुत्र सोनेरी पक्ष्याचा पाठलाग न करता डोंगरावर जातो. झोपलेल्या चेटकिणीचे केस पकडतो. ''मला सोनेरी पंखांचा पक्षी दे'' असे म्हणतो. त्या पक्ष्याचा मुका घेतो तर काय आश्चर्य होते? पक्ष्याच्या ऐवजी तेथे एक सुंदर राजकन्या त्याला दिसते. चेटकिणीला मारून राजपुत्र त्या राजकन्येला राजवाड्यात आणून तिच्याशी लग्न करतो.



राजवाड्यातला एक आचारी राजपुत्राला पळवून नेऊन राजाला सांगतो, ''राणीने मुलाला मारून वाघाच्या पिंजऱ्यात टाकले.'' राजा राणीला तुरुंगात टाकतो. राजपुत्र मोठा होतो. तेव्हा आचाऱ्याच्या लबाडीचा पत्ता त्याला लागतो. तो आचाऱ्याचे रूपांतर कुत्र्यात करतो आणि राजाला जाऊन भेटतो. राजाला खरी हकीकत कळते. राणीची सुटका होते. राजपुत्र आचाऱ्याला पुन्हा माणूसरूप देतो.



'हिममानव', 'हॅन्सचे भाग्य', 'काचेची पेटी', 'जादूचे पाणी' वगैरे गोष्टीही अशाच अद्‌भुत आणि चमत्कृतिपूर्ण आहेत. फारसा पसारा न मांडता त्या थोडक्यात सांगितल्या आहेत.

चंद्रशेखर जोशी यांच्या बहुरंगी चित्रांमुळे गोष्टी अधिक रंजक व देखण्या बनल्या आहेत. समजायला अगदी सोप्या!

**पृष्ठे: ३२ किंमत: ३०रु. ● सभासदांना : २१रु. ● पोस्टेज :२०रु.**



**आई** : अमिता, अगं नेहा का रडत्येत बघ बरं!

**अमिता** : आई, मला वेळ नाही. तिचा लाडू मी खातेय. तो संपला की बघते.



# लेखनातील नवनवीन प्रयोगांवर भर

**राजीव तांबे**

मुलांसाठी लिहिणं म्हणजे एक तर नॉर्मल मुलांसाठी लिहिणं किंवा मुलांसाठी निव्वळ मनोरंजन करणारं लिहिणं, असाच खूपसा अर्थ गृहित धरला जातो. कारण बालसाहित्यिक (काही सन्मानीय अपवाद वगळून) या चाकोरीच्या बाहेरच जात नाहीत.

मुलांसाठी म्हणजे 'सर्व मुलांसाठी' लिहिणं आणि केवळ मनोरंजन नाही तर त्या मुलाची गरज ओळखून लिहिणं, असं मी समजतो. मुलांचा विचार करताना अंध, अपंग, कर्णबधिर, अनाथ, गतीमंद मुलं माझ्या परिघात आहेत का? शाळेत जाणाऱ्या व शालाबाह्य मुलांचा मी विचार करतो का? परप्रांतातून येऊन नव्याने मराठी शिकू इच्छिणाऱ्या मुलांना माझी मदत होते का? ग्रामीण वा नागरी मुलांना आपलंच वाटेल असं मी लिहितो का? मुलांना साहित्यातील विविध प्रकारांची/आकृतीबंधांची सहजी ओळख व्हावी यासाठी मी प्रयत्नशील आहे का? आणि केवळ मुलांसाठी लिहून प्रश्न सुटणार नाही तर त्या मुलाशी अत्यंत जवळून संबंधित असणाऱ्या व मुलावर प्रभाव टाकणाऱ्या शिक्षक आणि पालकांसाठी आपण काही लिहिणार का? मुलांसाठी लिहिताना अशा अनेक प्रश्नांचा कॅनव्हास माझ्या डोळ्यासमोर असतो आणि त्यातून मी मार्ग काढत असतो.

'बालसाहित्याच्या लेखनात मी प्रयोग केले' असं म्हणण्याचं धाडस मी करू शकेन. प्रयोगांची यादी खूपच मोठी होईल म्हणून काही वानगी दाखल पाहूया. आज मुलांना मराठी शिकायची असेल तर 'बालभारतीला' पर्याय नाही. मी 'चटकन पटकन वाचन लेखन' हे पुस्तक लिहिले. या पुस्तकात भाषेचे ५४ खेळ तर आहेतच त्याशिवाय वाचनपाठ,



अक्षरे योग्य वळणाने गिरविण्यासाठी कित्ता, लेखनपाठ, उजळणीपाठ आणि मूल्यांकनपाठ आहेत. विशेष म्हणजे या पुस्तकात मुलांना एकही प्रश्न विचारलेला नाही किंवा 'कोण कुणास म्हणाले, ते सांगा' असं विचारून मुलांना सतावलेले नाही. या पुस्तकाचा इंग्रजीत अनुवाद झाला असून अमराठी शाळा हे पुस्तक वापरतात. मुले हसत खेळत तीन महिन्यात मराठी शिकतात असा अनुभव आहे.

मुलांसाठी कथा, संवाद कथा, गणित कथा, अक्षर कथा, चित्र कथा, थीम बेस कथा, विज्ञान कथा, रुपक कथा, व्याकरण कथा, आत्मकथा, कादंबरी, प्रवास वर्णन, कविता, गाणी, जिंगल्स, एकपात्रिका, द्विपात्रिका, एकांकीका, नाटक, गणिताचे खेळ, भाषेचे खेळ, विज्ञानाचे सोपे प्रयोग, 'प्रिय मुलांनो' हे मुलांसाठी लिहिलेल्या पत्रांचे सलग तीन वर्ष सदर, पालकांसाठी वर्षभर सदर लेखन, शिक्षकांसाठी शैक्षणिक लेखन, शैक्षणिक मासिकातून लेखन, मुलांच्या मासिकांचे व दिवाळी अंकांचे संपादन, कॅसेटस्, सीडी इत्यादी अनेक लेखनातले फॉर्म हाताळले. इंग्रजी प्रमाणेच काही पुस्तकांची गुजरातीत भाषांतर झाली आहेत. हिंदी व इंग्रजी भाषांतून बाल साहित्य प्रकाशित झाले आहे.

मुले,शिक्षक,पालक व घरातील आजी-आजोबा यांच्यासाठी घेतलेल्या कार्यशाळां बाबत लिहिणे, हा वेगळ्या लेखाचा विषय होऊ शकतो. असो.

एक महत्वाची गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की,'मुलांसाठी सहज सोपं लिहिणं, कुठलाही पूर्वग्रह मनात न ठेवता स्वच्छं सकारात्मक दृष्टीकोनातून लिहिणं आणि हे लेखन मुलांच्या भावविश्वाशी त्यांच्या रोजच्या जगण्याशी नुसतं संबंधित नाही तर त्यात मिसळून जाणारं असणं...हे सर्वार्थाने कठीण काम आहे!!

कठीण आहे कारण,एखादी घटना आपण समजून घेणं आणि त्या घटनेचा मुलाने त्याच्या नजरेतून अन्वयार्थ लावणं ह्यात जमीन अस्मानचा फरक आहे.

मुलांच्या नजरेतून एखादी गोष्ट पाहणं,त्यांच्या मानसिकतेचा विचार करुन ती समजून घेणं किंबहुना पूर्णत: बालकेंद्री विचार करण्याची ताकद सर्वांजवळ नसते, कठोर परिश्रम करुन ती कमवावी लागते. पण, ही शक्ती प्राप्त झाल्यानंतर त्याविषयी मनात जरा जरी इगो निर्माण झाला,त्याबाबत इवलासा जरी गर्व झाला तरी,प्रचंड परिश्रमाने कमावलेली ही शक्ती क्षणात विरघळून जाते....

.......आणि त्याक्षणी तो लेखक मुलांपासून खूप लांब निघून जातो!!

पण जो बालसाहित्यिक आपण कमावलेल्या शक्तीची पुन्हा पुन्हा 'लिटमस टेस्ट' करण्याची हिंमत दाखवतो व रिझल्ट नकारात्मक येईल अशी पुसटशी शंका जरी आली तरी तो स्वत:त सकारात्मक बदल घडवून आणतो; तोच खरा बालसाहित्यक. ही 'लिटमस टेस्ट' अगदी सोपी आहे. मुलांसाठी काम करणारी, त्यांच्यासाठी लेखन करणारी मोठी माणसं कधीच एकटी

एकलकोंडी नसतात. त्यांच्या ह्रदयातलं मूल सदैव जागं असतं, सजग असतं,

नवनवीन गोष्टी शिकून घ्यायला उत्सुक असतं. आणि ती मोठी माणसं ‘त्या आतल्या मुलाला’ साक्षी ठेवून समोरच्या मुलांसाठी काम करत असतात, लिहित असतात. जेव्हा कुणी अनोळखी मुलगा ह्या मोठ्या माणसांना भेटतो तेव्हा तो ‘त्या आतल्या मुलाला’ ओळखतो, ‘त्याला’ साद घालतो व ‘त्याची ओळख पटली की’ तो अनोळखी मुलगा ‘त्याच्याशी’ बोलू लागतो,मैत्री करतो......त्या मोठ्या माणसाच्या माध्यमातून!! तुम्ही अशी ‘लिटमस टेस्ट’ कधी अनुभवली आहे का?

तुमची लिटमस टेस्ट एखादवेळेस वेगळी असेल किंवा त्याचे रिझल्ट ही वेगळे असतील. पण लिटमस टेस्ट करण्याची हिंमत दाखविणाऱ्या मित्रांशी मैत्री करायला मला आवडेल.



**मावशी** : “राजू, स्वयंपाकघरात काय करतोयस?”


**राजू** : “निनादला मदत करतोय?”

**मावशी** : “अरे वा! आणि निनाद काय करतोय?”

**राजू** : “पाहुण्यांसाठी केलेलं आईस्क्रीम खाऊन बघतोय.”








राजीव तांबे यांच्या हसोबा-ससोबाने केलेल्या गमतीजमती तुम्ही बघितल्याच आहेत.

त्यांच्या बंटूच्याही करामती अशाच आहेत.

बंटू बसला ढगात, बंटूचा टिकटिक मित्र ही त्यांची पुस्तके वाचायला हवीत. या दोन्हीत मिळून बंटूच्या चार गोष्टी आहेत.

बंटूचे बाबा एका रविवारी अडगळीची खोली आवरायचे ठरवतात. बंटू म्हणतो, “मी तुम्हाला मदत करू का?”

बाबा म्हणतात, “आता तर तू अंगणात जा आणि खेळ. तुझी मदत लागली तर मी तुला हाक मारीन.” पण बंटू एक नंबरचा वस्ताद. “नाही. मी तुम्हाला मदत करायला इथंच थांबणार.” तो म्हणतो.

अडगळीची खोली बरेच दिवस बंद होती. ती उघडली तर कुबट वास आला. दोनतीन खोकी हलवली तर उंदराचं पिलू उडी मारून पळालं.

बंटू दचकला. बाबाही दचकले.



बंटू म्हणाला, ''आपण एक मांजर पाळू. म्हणजे उंदीर गायब होतील.''

बंटू अशा आयडियावर आयडिया देत राहतो. बाबा म्हणतात, ''आधी आवराआवर करतो. मग तुझ्या आयडिया ऐकतो.''

बाबांना एक गजराचं घड्याळ दिसतं. ते घड्याळ बंटूला देऊन बाबा म्हणतात, ''हे बघ, हा तुझा नवा दोस्त. याच्याशी खेळत बस.''

बंटू त्या गजराच्या घड्याळाशी खेळू लागतो. ''माझं गजरू घड्याळ ते.''

ते गजरू घड्याळ चक्क बंटूशी बोलू लागतं... ''अरे वा! तुलाही माझ्यासारखे दोन कान आहेत– दोन हात आहेत– आता एक हात मोठा आहे, दुसरा छोटा आहे हे खरं! पण माणसं मला टपला मारतात– पहाटे गजर सुरू झाला की बंद करायला– त्यामुळं टेंगूळ आलंय... माझा कान पिळतात, चावी देतात– मी आता म्हातारा झालोय... दिवसरात्र चालवत नाही... म्हणून मला अडगळीत टाकलंय ना!''

बंटू त्याला खोबरेल तेल देतो– गजर वाजू लागतो... घड्याळ टिकटिक करू लागते. बाबाही चकित होतात.

बंटू आपल्या दोस्ताभोवती फेर धरून नाचू लागतो.

तर असा हा आयडियाबाज बंटू– त्याची कुणाशीही दोस्ती व्हायला वेळ लागत नाही.

ह्या बंटूची पोपटाच्या पिलाशीही मैत्री होते. त्या पिलाला तो म्हणतो, पोपू.



बंटू पोपूला पेरू देतो. भिजवून मऊ केलेली डाळ देतो.

पोपूकडे त्याची आईही येते. बंटूची आई म्हणते, ''पोपूला त्याची आई भेटली. बरं झालं बाई. एवढं शहाणं पोर, आईशिवाय कसं राहणार?''

बंटू पोपूला म्हणतो, ''मला



विसरू नकोस. मोठा हो. मग आपण एकत्र शिटी वाजवू.''



हा बंटू एकदा डोळे बंद करून आडवा पडतो. तर त्याला आपण ढगावर बसून आभाळातून दूर दूर चाललोय असं जाणवतं. ढगही किती प्रकारचे? कुणी हत्तीसारखे, कुणी लठ्ठ, कुणी काळे कुळकुळीत; ढगाला तो सांगतो, ''मला मामाच्या घरी घेऊन चल.''

बंटूला मामाचं घर दिसतं. तिथं अंगणात असतो मोर.

मग ढग म्हणतो, ''हे बघ, तू थांब इथं. मी जरा वर आकाशात जातो. थोडा पाऊस पाडतो. घरावर. बागेत. झाडावर. या मोरालाही थोडं पाणी प्यायला देतो.''

...आणि तेवढ्यात अंगणात येऊन बाबा बंटूला गदागदा हलवून म्हणतात, ''अरे, पावसाचं अंगणात असं झोपतात का कधी! उठ, सर्दी होईल...''

तरीही बंटू आपला ढगांच्या कुशीतच रममाण!

या बंटूचे एक काका असतात. शिस्तीचे भोक्ते. रागीट. खाष्ट. सगळी मुलं उनाड असा त्यांचा पक्का समज. त्यामुळं मुलांना ते सतत रागावत असतात. त्यांचा नोकर चंदू– तो मात्र प्रेमळ.

काकांच्या घरात नऊ खोल्या.

बंटूचे काका एकदा झाडावरून पडतात. पायाला मार लागतो. पाय सुजतो.

बंटू त्यांना मलम लावतो. त्यामुळं पायाची सूज लवकर उतरते.

डॉक्टर म्हणतात, ''पडल्यावर पायाला लगेच मलम लावलं ना– म्हणून सूज लवकर उतरली. बंटू हुशार आहे.''

काका म्हणतात, ''ही मुलं छान आहेत. मी उगाच रागावत असतो.''

काका बंटूला म्हणतात, ''पुढच्या सुटीतही काकांकडे यायचे, बरं का!''

राजीव तांबे यांचा बंटू असा आयडियाबाज आहे. घड्याळाशी दोस्ती करणारा आहे. तो पोपटाच्या पिलाशी गप्पा मारतो. ढगांवर बसून हिंडून येतो. खाष्ट काकांचीही मर्जी संपादन करतो...

तुम्हाला ह्या बंटूशी दोस्ती करावीशी नक्कीच वाटेल, नाही का?

**पृष्ठे: ३२ किंमत: ३०रु. ● सभासदांना : २१रु. ● पोस्टेज :२०रु.**

# बालवाङ्मय-निरंतर आनंदमयी स्रोत

**अरुंधती महाम्बरे**

भरपूर वाचन करणारी, उच्चशिक्षित अशी एक परिचित स्त्री मला म्हणाली, ''खरं सांगू, मला अजूनही बालवाङ्मय वाचायला आवडतं.''

तिचे हे उद्गार अपवादात्मक नसावेत, कारण नातवंडाचं निमित्त करून छान छान परीकथा, साहसकथा वाचणारे आजी-आजोबा आपण घरोघरी पाहतोच. ह्या कल्पनारम्य कथा नातवंडांना सांगत असताना नातवंडांच्या कल्पनाशक्तीला चालना मिळत असते आणि त्या भुरळ घालणाऱ्या कथांच्या योगे आजी-आजोबाही आपल्या बालपणीच्या साम्राज्यातून फेरफटका मारून येत असतात.

लहानपणी वाचलेल्या बालवाङ्मयात प्रौढत्व सुसह्य करण्याची जबरदस्त शक्ता असते. 'प्रौढत्वी निज शैशवास जपणे बाणा कवीचा असे.' असं जरी म्हटलं असलं तरी तो 'बाणा सकल जनांचा असे' असं म्हणणंच उचित ठरेल.

निखळ, रम्य आठवणींचा ठेवा बालवाङ्मय प्रौढत्वाला बहाल करतं.

मात्र, बालांसाठी साहित्य लिहिणं हे वाटतं तितकं सोपं नसतं. अनेक पथ्यं पाळावी लागतात. अनेक अवधानं ठेवावी लागतात; आणि लेखनात सावधगिरीही बाळगावी लागते.

त्यांच्या भावना कुस्करल्या जाणार नाहीत हे पहात असताना मुलं अतिभावुक होणार नाहीत याचे भान ठेवावे लागते. अंधश्रद्धांचे समर्थन होऊ नये हा विचार करत असताना मुले पूर्ण अश्रद्ध होऊ नयेत ह्याची काळजी घ्यावी लागते. भाषा सोपी असावी, पण अतिबाळबोधही नसावी. भयावहता टाळताना अतिभेकडपणाचे तर समर्थन केले जात नाही ना ह्याकडे लक्ष द्यावे लागते.

मुलांना विविधांगी जीवनाकडे नेत असताना वाटेतले काटेकुटेही टाळता येत नाहीत आणि सौंदर्यस्थळांचा आस्वाद घ्यायचा असतो.

अशी ही तारेवरची कसरत, पण झुल्यावरच्या आनंददायी झोक्यासारखी असते.






अरुंधती महाम्बरे यांनी बालवाचकांसाठी 'ठकुबाई ठेंगे', 'बुटुक बैंगण विसरभोळे', 'ढगांमागे पळणारे', 'जहाजाची शिडे रंगवणारे रमज्यागमज्या' अशा गमतीदार वल्लींच्या गोष्टी सांगितल्या आहेत.

ठकुबाई ठेंगे या रहात होत्या पऱ्यांच्या राज्यातल्या अटकमटक गावात.

अटकमटक गाव मोठे आखीवरेखीव. सुंदर घरे, प्रत्येक घराभोवती बाग. रंगीबेरंगी संगमरवरी पायऱ्या, खिडक्यांना पडदे. गाव पऱ्यांचे. स्वच्छ सुंदर.

पण ठकुबाईचं घर याला अपवाद.

तिला कामाचा भयंकर कंटाळा. त्यातल्या त्यात घर स्वच्छ ठेवायचा फारच कंटाळा. त्यामुळं तिच्या घरात कचरा तसाच पडलेला. कोपऱ्या कोपऱ्यात कोळ्याची जाळी. भिंतींना पोपडे पडलेले. रंग विटलेले. न्हाणीत भांडी तशीच खरकटी पडलेली. कपडे धुवायचे ढीगभर पडलेले. जमिनीवर

वस्तू इकडेतिकडे कशाही टाकलेल्या... घरात स्वच्छ हवा यायची नाही. कुजलेल्या शिळ्या पदार्थांचा वासही कधीकधी यायचा. ठकूबाई त्या कचऱ्याकडे बघायचीच नाही.

त्यामुळे तिचे शेजारीपाजारीही वैतागत. संपूर्ण अटकमटक गाव स्वच्छ ग्राम स्पर्धेत केवळ ठकूबाई ठेंगेच्या घरामुळे मागे पडे.

आता गावकऱ्यांनी ठरवले, ठकुबाईला घर स्वच्छ करायला लावायचे.

पण ती कोणाचेच ऐकायला तयार नाही.

तिला तिच्या भाचीकडे एक दिवसासाठी पाठवून, तिच्या गैरहजेरीत तिचे घर स्वच्छ करायचे असाही बेत गावकरी रचतात.



पण ठकुबाई लवकर उठतच नाही. तिची त्यामुळे गाडी चुकते.

मग गावकरी एका मांत्रिकाकडे जातात. ठकुबाईला घर स्वच्छ करायची इच्छा व्हावी, तिने घर साफ करावे यासाठी काहीतरी मंत्र हवा, अशी मागणी करतात.

मांत्रिक त्यांना एक हिरा देतो. तो हिरा अंगठीत बसवला की त्या त्या ठिकाणचा कचरा लख्ख दिसू लागेल. तो कचरा दूर करायचा विचार तिच्या मनात येईल.

गावकरी तो हिरा एका अंगठीत बसवतात. एका छान डबीत ती ठेवतात.

''तुझ्या भाचीने ही वस्तू पाठवलीय'' म्हणून गावकरी ती अंगठी ठकुबाईला देतात.

हिऱ्याची अंगठी बघून ठकुबाई खूष होते. ती लगेच बोटात अंगठी घालते.



आनंदाने स्वत:भोवती गिरक्या घेते. कोपऱ्यात जाते. तर त्या अंगठीमुळे कोपऱ्यातला कचरा तिला दिसतो. ठकुबाईला नवल वाटते, ''अरे, एवढी घाण आपल्या घरात आहे, हे कधी दिसलेच नव्हते की!''

मग ती झाडू घेते, ब्रश घेते. तो कोपरा स्वच्छ करते.

सगळा कचरा एका मोठ्या पिशवीत भरून बाहेर रस्त्यावर कचराकुंडीत टाकते. तो कोपरा स्वच्छ करून ती थकून जाते.

ती स्वयंपाकघरात जाते. तर त्यातही घाणच घाण दिसते.

फडताळात तेल-तूप सांडलेले असते. भाज्यांचे देठ, फळांची टरफले जमिनीवर पडलेली असतात... दूध उतू गेलेले– त्यामुळे शेगडी भरलेली– ती वैतागते. स्वच्छ करायला लागते. कपाट लखलखीत करते. शेगडी घासूनपुसून घेते...

बालमित्रांनो, त्या मांत्रिकाने दिलेल्या हिऱ्याच्या प्रकाशाने ठकुबाईला नवीन नजर मिळते. घरातली घाण तिला दिसू लागते. घर स्वच्छ करायची प्रेरणा मिळते.



ठकुबाई घरातली प्रत्येक खोली साफ करते. मग बाहेर बागेत येऊन, बागेतला कचराही हटवते. खूप वाढलेले गवत कापून काढते. पालापाचोळा लोटून एकत्र ढीग करते.

परीराज्याचा राजा मग अटकमटक गावाला भेट देतो.

त्याच्यासाठी मेजवानीची व्यवस्था ठकुबाईच्या बागेत होते.

स्वच्छ गावाचे बक्षीस अटकमटक गावाला मिळते.

ठकुबाईला नंतर त्या मांत्रिकाची आणि हिऱ्याच्या अंगठीची खरी हकीकत कळते.

ती सरपंचाला म्हणते, ''आता मला या अंगठीची गरज नाही. घर घाण ठेवणाऱ्या दुसऱ्या एखाद्या माणसाला द्या.''

तर अशी ही ठकुबाई ठेंगे.

घर स्वच्छ ठेवण्यासाठी तिला मांत्रिकाच्या खड्याची गरज पडली.

या खड्यामुळे तिची नजर तीक्ष्ण झाली. इकडेतिकडे पडलेली घाण तिला स्वच्छ दिसू लागली...

आपणही कसलीतरी झापडे लावून जगत असतो. मग कोणीतरी मांत्रिक येतो, गुरू येतो. आपली झापडे दूर करतो. आपली नजर स्वच्छ होते. आपले दोष आपल्याला दिसू लागतात. ते दोष दूर करायची इच्छा होते...

आपण सुधारतो.

मग लोक आपला गौरव करतात.

या पुस्तकात, दुसऱ्या एका गोष्टीत पऱ्यांचा एक छोटा दूतही भेटतो बरे का!

छोटे बूट घातलेला, गोंडेदार कानटोपी घातलेला, निळ्या रंगाचे दोन नाजूक पंख असलेला, अंगठ्याएवढा हा दूत– तो रडत असतो मुन्नीच्या बागेत–

काय झाले त्याला रडायला?

त्याचे अळिंबीचे घरच कोणीतरी मोडलेले असते.

–मग मुन्नी त्याला धीर देते. खेळण्यातले लाकडी ठोकळे घेऊन– मुन्नी त्याचे घर त्याला करून देते.

मग त्या छोट्या घरात बसून हा बुटबैंगण परीदूत परीराणीच्या वाढदिवसाच्या निमंत्रणपत्रिका तयार करतो आणि त्या मधमाशीला देऊन ज्याच्या त्याच्याकडे पोचवायला सांगतो.



–आणि मुन्नीलाही त्या मेजवानीला जायला मिळते.

***''पौर्णिमेच्या रात्री तळ्याकाठच्या वडाच्या झाडाखाली परीराणीच्या वाढदिवसाला अगत्य यावे. नृत्य, संगीत, खेळ वगैरे कार्यक्रमात सहभागी व्हावे. पहाटे कोंबडा कुकुचकू करीपर्यंत ही मेजवानी चालू राहील... आपण या कार्यक्रमात सहभागी होऊन आमचा आनंद द्विगुणित करावा.''***

...या मेजवानीला जावे, असे वाटते ना तुम्हाला?

...तर अशा या गमतीदार गोष्टी– वाचायलाच हव्यात, नाही का?

**पृष्ठे: ३२ किंमत: ३०रु. ● सभासदांना : २१रु. ● पोस्टेज :२०रु.**





## वयोगटाचे भान आवश्यक


**शकुन्तला फडणीस**

लेखकाला कथाकल्पना बीजरूपातच सुचते. ती सुचल्यानंतर कोणत्या वयोगटासाठी ती कथा योग्य ठरेल हे मी निश्चित करते. त्यानुसार कथेची रचना होते. माझ्या कथेतील पात्रे, वातावरण वगैरे मध्यम किंवा कनिष्ठवर्गीय असते. बहुसंख्य बालवाचक त्याच वर्गातले असतात. त्यामुळे मुलांना ती गोष्ट आपली वाटते. मुले कथेशी समरस होतात.

कुमारवयीन मुलेमुली साहसप्रिय असतात. त्यांच्यासाठी साहसकथा तर शिशुगटासाठी प्राणिकथा लिहिल्या. मुलांना गमतीजमती खूप आवडतात. त्यांच्यासाठी खमंग धडा हा संग्रह आहे. उपेक्षा कुणाचीही करू नये– उपेक्षित मुलेमुलीच काय, पण पशुपक्षीसुद्धा आपल्या गुणांची चुणूक दाखवीत असतात. फक्त ते समजण्यासाठी तशी दृष्टी हवी हे मध्यवर्ती सूत्र 'कौतुकाचा गंगाराम'मध्ये आहे.

आजची लहान मुले खरोखरच बुद्धिमान आहेत. आपण त्यांना समजून घेतले पाहिजे असे मला वाटते. 'आजीचा धडा' हा संग्रह याच सूत्राभोवती आहे. यात लहान शाळकरी मुले आपल्या आजीआजोबांना शिकवतात. त्यांच्या गैरसमजुती, अंधश्रद्धा दूर करतात. ही कल्पना मुलांनाच काय, मोठ्यांनाही आवडते. यातली नवी दिशा ही कथा मा. राष्ट्रपती ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनाही आवडलेली आहे!

मुलांसाठी आता ललित गद्य लिहिण्याचा विचार आहे.




‘आजीचा धडा आणि इतर कथा’ या पुस्तकातील गोष्टी लिहिल्या आहेत शकुंतला फडणीस यांनी! बालमित्रांसाठी मजेदार गोष्टी लिहिण्यात त्यांचा हातखंडा आहे. कल्पकता आणि नर्मविनोदाचा शिडकावा यामुळे त्यांच्या कथांची लज्जत वाढते.

‘आजीचा धडा’मधील गोष्टींची एक खासियत आहे.

आईवडील, आजीआजोबा, शिक्षक हे सर्व लहान मुलांना नित्य सांगत असतात, “अमुक कर, तमुक करू नको. अभ्यास कर. खेळात वेळ घालवू नको... आळस करू नको. खोटे बोलू नको, पाण्यात भिजू नको, नदीत डुंबू नको...” एक ना दोन, सारखे आपले उपदेशाचे डोस. सारख्या सूचना... सारखी टोचणी...

आता अशा सूचनांच्या सरबत्तीने मुलांनाही कधी कधी फारच वैताग येतो. थोरांचा उपदेश असतो तो काही गैर नसतो. आपल्या कल्याणाचाच



असतो. परंतु त्याचा सारखाच मारा केला गेला की त्याचा कंटाळा येऊ लागतो. तो ऐकून कान किटू लागतात.

म्हणून पालकांनी मुलांना ऊठसूट उपदेशाचे डोस पाजू नयेत हेच योग्य.

याउलट आणखी एक प्रकारही आढळतो.

काही मुलेच खूप हुशार असतात. आजीआजोबांना किंवा पालकांना तीच काही गोष्टी सांगतात. आईबाबांना न येणाऱ्या, न समजणाऱ्या गोष्टी ही छोटी तल्लख मुले सहजपणे करतात, सांगू शकतात. संगणकावर गेम खेळणे असो, ई-मेल पाठवणे असो, आजीआजोबांना ते काही जमत नाही. नातू मात्र सहजपणे ते करू शकतो. तेव्हा आता नातूच आजीआजोबांना नव्या तंत्रज्ञानाचे धडे देऊ लागतो.

शकुंतला फडणीस यांनी अशा हुशार नातवांच्याच गोष्टी सांगितल्या आहेत.

‘आजीचा धडा’ ही गोष्ट आहे तन्मयची.



हा तन्मय दहावीतला आहे. त्यामुळे सारखा अभ्यास चालू. दहावीचे वर्ष म्हणजे घरच्या सर्वांनाच टेन्शन. आई तन्मयला अभ्यासाच्या टेबलावरून उठावे लागू नये म्हणून नाश्तादेखील त्या टेबलावरच आणून द्यायची! झोप, टी.व्ही., खेळ या सगळ्यांवर बंधनेच बंधने! आजीआजोबांनी तर कामाशिवाय त्याच्याशी बोलणेच बंद केलेले! तन्मयच्या अभ्यासात व्यत्यय येऊ नये म्हणून सर्वजण काळजी घेत.

एकदा सकाळीच वीज जाते. तन्मयची आंघोळ त्यामुळे थांबते. वीज येईपर्यंत थांबायचे कशाला? म्हणून आई गॅसवर पाणी तापवून देते...

तन्मय आंघोळीला जातो– तर पाणी भयंकर गरम! जोरदार वाफा.

तन्मय त्या बादलीतले अर्धे पाणी दुसऱ्या बादलीत ओततो. वर झाकण ठेवतो आणि आपल्या बादलीत गार पाणी टाकून, गरम पाण्याने आंघोळ करतो. कपडे घालून शाळेची तयारी करतो.

तेवढ्यात आजी बाथरूममध्ये जाते. गरम पाण्याची बादली बघते. ती तन्मयला विचारते, “अरे, नीट आंघोळ का केली नाहीस? बादलीत पाणी तसेच आहे.”



तन्मय सांगतो, ''ते पाणी जास्त होते. खूप कडकडीत होते. म्हणून ठेवले...''

आजी काटकसरी. ती म्हणाली, ''एवढे गरम केलेले पाणी कशाला वाया घालवायचे? खूप आंघोळ करायची!''

तन्मय म्हणाला, ''आजी, पाणी तापवण्यासाठी गॅस खर्च झालाच होता. आता नको असताना इतकं पाणी आंघोळीला खर्चून वाया का घालवायचं?''

आजीने त्यावर म्हटले, ''अरे, यंदा पाऊस का कमी झालाय? उगाच पाण्याची काटकसर कशाला?''

तन्मयने आजीला समजावले, ''अग, यंदा पाऊस खूप झालाय. पण पुढच्या वर्षी काय? पाऊस कमी पडला तर? पाणी नेहमी काटकसरीनं वापरायला हवं. थेंबे थेंबे तळे साचे. त्याचप्रमाणे थेंब थेंब पाणी वाया घालवले तर ते तळेही आटून कोरडे होईल ना!''

आजीच्या डोक्यात प्रकाश पडला, ''खरं सांगतोस रे तू बाळ–''

ती तन्मयला शाबासकी देते.

जेवताना पूर्ण भरलेल्या पेल्यातलं अर्धं पाणी परत तांब्यात ओतते. पाण्याचा जपून वापर करण्याचा धडा आजी गिरवते. तन्मयला ती गुरू करते.

–तर अशी आजची मुलं हुशार आहेत, नाही का?

केतनचे वडील एक फ्लॅट घेतात. रिसेलचा हा फ्लॅट. बनूमावशी वास्तुशांतीला येते. ती म्हणते, ''अगो बाई, कुठलं घर शोधलंय हे? भुताटकीची विहीर बुजवून त्याच जागेवर हे घर बांधलंय. हे घर अपशकुनी आहे... इथं आधी राहणाऱ्या वेणूताईंच्या मुलीला खूप त्रास झाला. मुलगा नापास झाला. नवऱ्याला अपघात झाला. कशाला विषाची परीक्षा बघता? ह्या फ्लॅटमध्ये राहू नका.''





बनूबाईचं हे बोलणं ऐकून आजी म्हणते, ''हे घर नकोच. मी इथं राहणार नाही.''

केतनचे बाबा दुसरे घर बघतात. त्या घराचा प्लॉट दक्षिणमुखी असतो. दक्षिणमुखी प्लॉट अशुभ... असे त्यांना लोक सांगतात. आजी हे घर नको म्हणते. तेव्हा शाळकरी केतन म्हणतो, ''हे शास्त्र म्हणजे भंकस आहे तुझं. जगात लाखो घरं दक्षिणमुखी आहेत. शहरात एवढी निवड करायला कुठं वाव असतो? उजेड आणि शुद्ध हवा मिळतेय ना?... इथं आधी राहणारा मालक– त्यानं बंगला बांधलाय– म्हणून हे घर विकतोय... त्याची मुलंबाळं इथं राहून शिकली. इंजिनिअर-डॉक्टर झाली.''

मग मात्र आजीचे डोळे उघडतात... केतनचे बोलणे तिला पटले.

''पहिल्या मालकाचं इतकं सगळं चांगलं झालेलं असेल तर हरकत नाही. घेऊ या हे घर.'' असे आजी म्हणते. तिच्या शंकांचे निरसन होते. अंधश्रद्धा दूर होते.


आपल्या नातवाकडून हा धडा आजीला मिळाला. नवी दिशा तिला दिसली.

जुनी कागदपत्रं आणि मूर्ती आजोबांकडे असतात. त्यांचे संशोधन करायला अण्णा देसाई परवानगी मागतात. पण आजोबा नको म्हणतात. त्यांची नात सई त्यांना समजावते...

दिवाळीत दत्तमंदिरात दिवे लावण्यात येतात. त्या मंदिराला इमर्जन्सी दिवा भेट देण्याची कल्पना मिनूताई मांडते. आजोबाही ती कल्पना मान्य करतात.

अशा हुशार नातू-नातवांच्या या कथा– तुम्हाला नक्कीच आपल्या वाटतील, नाही का?

**पृष्ठे: ३२ किंमत: ३०रु. ● सभासदांना : २१रु. ● पोस्टेज :२०रु.**




वृषाली पटवर्धन यांच्या 'नशीबवान शेखर' या पुस्तकात 'राधा-रघूची युक्ती- चेटकिणीची सुट्टी', हिरवा जादूगार आणि चलाख चतुरा', 'बिच्चारं ऑम्लेट' आणि 'नशीबवान शेखर' अशा चार कथा आहेत.

ॲनाबाई, तिची सात मुलं हॅरी, जिमी, जिनी, टोनी, बंटी, मॉंटी आणि पॅटी; ब्रेकफास्टला दूध-ब्रेड आणि ऑम्लेट असे तपशील आले की 'बिच्चारे ऑम्लेट' ही कथा परदेशी वातावरणातील आहे हे लक्षात येतेच. तर अशा मस्त मस्तपैकी जागतिक लोककथा मराठीत वाचायला मिळाल्या की आनंद वाटणारच.

बालसाहित्य हे विश्वसाहित्य असे म्हणतातच ना! इसापनीतीतला इसाप ग्रीसमधला गुलाम. अरेबियन नाइटमधल्या गोष्टी अरबस्तानातल्या; हॅन्स अँडरसन डेन्मार्कमधला, ग्रिम बंधू जर्मनीतले; पॅराल्ट फ्रान्समधला; विझार्ड ऑफ ओझचा लेखक बॉम अमेरिकन; हॉबिटचा लेखक टोलकिन ब्रिटिश;



हॅरी पॉटरची लेखिकाही ब्रिटिश; पंचतंत्र-हितोपदेश हे ग्रंथ भारतातले... म्हणजे आपण जगातल्या निरनिराळ्या देशांतल्या लेखकांच्या गोष्टी वाचतो; म्हणून बालसाहित्याचे आपण वाचक हे सगळ्या विश्वाचे नागरिक ठरतो. नाही का?

वृषाली पटवर्धन यांनी जगभर गाजलेल्या काही लोककथा मराठीत आणल्या आहेत. त्यांची 'लोखंड खाणारं उंदीर' आणि चतुर बोकोबा' ही पुस्तकेही 'नशीबवान शेखर'च्या जोडीने प्रसिद्ध झालेली आहेत.

'बिच्चारं ऑम्लेट' या गोष्टीतलं भलंमोठं ऑम्लेट तव्यावरून उडी मारून चक्क घराबाहेर पळ काढतं. त्याला पकडायला ॲनाबाईची ती सात मुलंही त्याच्या मागून धावायला लागतात... ऑम्लेटला पुढं एक टोपीवाला दिसतो. पण ''तू काय मला पकडणार?'' असे म्हणत ऑम्लेट त्यालाही हुलकावणी देऊन पुढे जाते. नंतर दिसते मनीमावशी. पण तिलाही ऑम्लेट मागे टाकतं. पळणारं ऑम्लेट आणि त्याच्या मागं धावणारी मनीमावशी, टोपीवाला, सात मुलं व त्यांची आई ॲना अशी लांबलचक रांग बघून तुरेवाला कोंबडाही त्याचा पाठलाग करू लागतो... पुढं दिसतं पांढरंशुभ्र फेंगाड्या पायाचं बदक. त्यानंतर काळं कुत्रं... अन् ही सारी मिरवणूक जाते नदीकाठी. आता नदी कशी ओलांडायची असा प्रश्न ऑम्लेटला पडतो. तेथे असतं एक डुक्कर. ते डुक्कर त्याला म्हणते, ''मी वाचवू शकतो तुला. माझ्या पाठीवर बस. मी तुला नदीपलीकडे नेतो.'' ऑम्लेट डुकराचं म्हणणं ऐकतो. त्याच्या नाकावर ते ऑम्लेट बसतं... आणि डुक्कर त्याला अलगद पकडून त्याचा चट्टाकट्टा करतं अन् ढेकर देतं... इतक्या मोठ्या आवाजात डुक्कर ढेकर देते की तो काळू कुत्रा, ते फेंगडे बदक, तो कोंबडा, तो टोपीवाला, ती सात मुलं आणि त्यांची आई ॲना– सगळेजण धूम पळून जातात.

'नशीबवान शेखर'मधला शेखर धनीचंद व्यापाराकडे काम करतो. त्या धनीचंदच्या गुदामात उंदरांचा सुळसुळाट असतो. शेखर एक मांजर आणून त्या मांजराचा बंदोबस्त करतो. त्याचं ते मांजर परदेशात विकायला धनीचंद बोटीवरून जातो. त्या बोटीवरून जातो. त्या बोटीवरही खूप उंदीर असतात.





त्या बोटीचा कॅप्टन त्या मांजराला उंदरावर सोडून देतो. मांजर उंदरांचा चट्टामट्टा करतं. ते बघून बोटीवरून प्रवास करणारा एक राजा खूष होतो. ''हे मांजर मला विकत दे'' असे राजा कॅप्टनला सांगतो. राजा त्यासाठी हिरे-माणकांनी जडवलेला मोठा हार त्याला देतो. शेठजी तो हार शेखरला मांजराची किंमत देतात. शेखर श्रीमंत होतो. तो शेठजींच्या मुलीशी लग्न करतो आणि शेठजींचा धंदा पुढे सांभाळू लागतो.


अनंतपूरची चतुरा एकदा घरात एकटीच असते; फक्त तिचा मोत्या कुत्रा बरोबर... सोसाट्याचा वारा येतो अन् तो तिला तिच्या घरासकट सुमंतपूरला नेऊन सोडतो. तिथं तिला उत्तरेकडची देवदूत उत्तरा भेटते. ती चतुराला म्हणते, ''तू आधी हरितपूरच्या हिरव्या जादूगाराकडे जा.'' तिला वाटेत एक बुजगावणं दिसतं. ते म्हणते, ''मीही येतो तुझ्याबरोबर.'' नंतर त्यांना भेटतो एक लाकूडतोड्या. त्याचे अंग असते पत्र्याचे. तो म्हणतो, ''त्या जादूगाराकडे चाललाय ना? मीही येतो बरोबर. माझे शरीर त्याने पत्र्याचे बनवलेय. माझे हृदय काढून घेतलेय. ते मला परत हवे आहे.'' नंतर भेटतो सिंह... शेवटी हिरवा जादूगार त्यांना भेटतो... तो म्हणतो, ''त्या पश्चिमेच्या चेटकिणीला मारा. मग मी तुमच्या इच्छा पूर्ण करीन.'' ...आणि मग ज्याला जे हवे ते त्याला मिळते. 'विझार्ड ऑफ ओझ'ची ही रूपरेखा सांगणारी कहाणी येथे 'हिरवा जादूगार' बनून भेटते.

रघू आणि राधा ही भावंडे सावत्र आईच्या जाचाला कंटाळून घर सोडतात. वाट चुकून जंगलात जातात. तिथं त्यांना केकच्या भिंती असलेलं घर दिसतं. त्याच्या खिडक्या असतात बिस्किटांच्या आणि त्यावर नक्षी असते गोड गोळ्यांची! ते घर असते दुष्ट चेटकिणीचे! ती रघूला पिंजऱ्यात टाकते आणि राधाला घरकाम करायला भाग पाडते.

आता तिच्या तावडीतून सुटण्यासाठी राधा व रघू काय युक्ती करतात ते तुम्ही मुळातूनच वाचलेले बरे!

**पृष्ठे: ३२ किंमत: ३०रु. ● सभासदांना : २१रु. ● पोस्टेज :२०रु.**







# इमानी कुत्रा

**चमत्कृतिपूर्ण कल्पनाशक्तीची उड्डाणे**

**शरद दळवी**

मोराला हजार डोळे असतात, गिधाडे मृत जनावरांचे मांस खाऊन जगतात; कुत्रा इमानदार म्हणून माणसाचा आवडता मित्र मानला जातो हे आपल्याला सगळ्यांना ठाऊक आहे. पण मोराला हजार डोळे कसे मिळाले, गिधाडाला पृथ्वीवर तिरस्कृत का मानण्यात येते, कुत्र्यामध्ये इमानदारपणा हा गुण कसा आला हे आपल्याला ठाऊक नसते.

त्याबद्दल 'बालकथाकार' शरद दळवी यांनी आपल्या कल्पकतेने काही अंदाज बांधले आहेत. एका कथेच्या रूपात ते अंदाज खुलवून सांगितले आहेत. 'इमानी कुत्रा' हे त्यांच्या कथेचे नाव.

काय आहे ही कथा?

तर फार फार वर्षांपूर्वी प्रजापतीने देव, दानव आणि मानव या आपल्या तीन पुत्रांना वेगवेगळी राज्ये दिली आणि आनंदात रहा असे म्हटले. देव स्वर्गात राहू लागले. मानवाला पृथ्वीचे राज्य मिळाले. दानव

राहू लागले पाताळात.

देव कष्ट करीत. भरपूर धनधान्य निर्माण करीत. गाईगुरांची देखभाल करीत. खूप वैभवात रहात. दानव आळशी होते. कामचुकार होते. त्यांना देवांच्या वैभवाचा हेवा वाटे. ते चक्क देवांची गाई-गुरे पळवण्याचा, चोरायचा बेत आखतात. पण देवांच्या गोधनाची राखण करणारा राखणदार जो होता, त्याला हजार डोळे होते... त्यामुळे त्याचे चौफेर लक्ष असे. त्यामुळे देवांचे गोधन पळवणे दानवांना शक्य होत नव्हते.

मग दानव काय करतात? पृथ्वीवरच्या एका बासरीवाल्याला स्वर्गात नेतात, त्याच्या बासरीत जादू होती. बासरी ऐकून लोक मंत्रमुग्ध होत. बासरीवाल्यांची बासरी ऐकून देवांचा हजार डोळ्यांचा राखणदारही चक्क झोपी गेला. त्याबरोबर दानवांनी देवांचे गोधन पळवून पाताळलोकात नेले; तेथील दुर्गम दऱ्याखोऱ्यांत लपवून ठेवले. देव हैराण झाले. देवांचा राजा इंद्र राखणदारावर नाराज झाला. त्याने राखणदाराला शाप दिला, "तू आता पक्षी होशील..." वरुणाने म्हटले, "तू पक्षी झालास तरी तुझे हजार डोळे राहतील. पण तुझे हे डोळे बघू शकणार नाहीत."



आता बालमित्रांनो, मोराला हजार डोळे का ते तुम्हाला समजू शकेल. वरुणदेव पाऊस आणतो. पावसाचे ढग आकाशात जमा झाले की मोर पिसारा पसरून नाचतो, नाही का?

त्या राखणदाराचा तर मोर झाला.

पण देवांच्या गोधनाचे काय? ते कुठे गेले हे देवांना कळेना.

मग त्यांनी पक्ष्यांचा राजा जो गरूड, त्याला आज्ञा दिली, "तुझी दृष्टी तीक्ष्ण आहे, तुझी शक्ती अचाट आहे. तुझी बुद्धी असामान्य आहे. तू आपल्या गोधनाचा शोध लाव. दानवांनी पाताळलोकात आपले गोधन कुठे लपवून ठेवले आहे ते शोधून काढ."

त्याप्रमाणे गरूड दानवांच्या पाताळलोकात जातो.





तो आपल्याकडे का आला आहे हे दानवांच्या राजाच्या लक्षात येते. दानवांचा राजा गरुडाची पाहुणा म्हणून मस्त व्यवस्था करतो. मेजवानी देतो, नाचगाण्यांचा थाट उडवून देतो. महिनाभर गरूड आरामात राहतो. गोधनाचा शोध करायला त्याला वेळच मिळत नाही. गरूड परत देवलोकात जाऊन गोधन पाताळात नाही सापडले असे सांगतो. इंद्राला गरुडाचा खोटेपणा बघून राग येतो. तो गरुडाला पृथ्वीवर ढकलून देतो.

"तुझे वंशज पृथ्वीवर राहतील. मेलेल्या जनावरांचे मांस खातील. त्यांना फार उंच उडता येणार नाही. त्यांचा लोक तिटकारा करतील."

गिधाडांना माणूस जवळ करीत नाही हे तुम्हाला ठाऊक आहेच. त्याचे कारण म्हणजे इंद्राने दिलेला शाप.

आणि इंद्राला मग कुत्र्याची आठवण होते. कुत्रा इमानदार. त्याला इंद्र सांगतो, "अरे, आपले गोधन कुठे आहे ते शोधून काढ."

कुत्रा मानवलोकात सगळीकडे हिंडतो. पण गोधन दिसत नाही.

मग तो दानवांच्या पाताळलोकात जातो. तेथे गरुडाला गोधनाचा पत्ता लागू न देता कसे फसवले याचा जल्लोष चालू असतो... कुत्रा गोधन कुठे लपवले आहे त्याचा शोध घेतो. देवलोकात परत येतो.


देव खूष होतात. कुत्र्याला म्हणतात, "तू चांगले काम केलेस. तू इमानदार म्हणून माणसाचा जवळचा मित्र होशील. माणसे तुला आपल्या घरात ठेवतील."

आणि देव काय करतात? ते दानवांना हूल देऊन आपले गोधन परत स्वर्गलोकी नेतात...

शरद दळवी यांच्या कल्पनाशक्तीची ही झेप कशी वाटते तुम्हाला?

मोराचे डोळे किंवा गिधाडाचे ओंगळवाणे रूप याबद्दल त्यांनी लढवलेल्या कल्पना पटतात का तुम्हाला?

आता देवांना पाताळातले गोधन दिसू नये किंवा एकाच राखणदारावर



हजारो गायींच्या राखणाची जबाबदारी सोपवावी हे कदाचित पटणार नाही... पण गोष्टीत असे काहीतरी गृहीत धरावे लागते खरे!

'इमानी कुत्रा' या पुस्तकात 'मोतीची धिटाई' नावाची गोष्टही आहे. तिच्यातला 'मोती' हा हत्ती आहे आणि तो हत्ती असतो निलगिरी पर्वतातला; पण तो लहान असतानाच राजस्थानातील बारमेर संस्थानाचे राणा वीरसिंह महाराज त्याला आपल्या राज्यात नेतात; महाराज जंगलात शिकारीसाठी गेलेले असताना हा मोती नावाचा हत्ती त्यांना एका प्रचंड अजगराच्या तावडीतून सोडवतो. अजगर हत्तीच्या पुढल्या दोन पायांना विळखा घालतो, पण तरीही हत्ती सोंडेने अजगराला फटके मारत राहतो. संधी साधून महाराज वीरसिंह अजगराला गोळी मारतात. हत्तीच्या पायाभोवती विळखा कापून काढणे भाग पडते.

हत्तीच्या प्रसंगावधानाची ही गोष्ट लॉर्ड लिनथिनगो यांच्या काळात घडली. बारमेरच्या शाही दप्तरात तिची नोंद आलेली आहे. मोती हत्तीला राणांनी अत्यंत प्रेमाने सांभाळले हे सांगायला नकोच!

वाघोबाच्या शिकारीतला वाटा स्वत:ला विनासायास मिळावा म्हणून कोल्होबा काय चतुराई दाखवतो, हे वाघाचा भालदार या कथेत वाचायला मिळेल.

सर्व प्राणी आणि वनस्पती माणसावर आरोप करतात, ''आमचं अन्न आणि निवारा हिरावून घेत राहता. जंगलतोड करून निसर्गदेवतेच्या नियमांना डावलून पृथ्वीवरील सर्वांचे जीवन धोक्यात आणत आहात. तुम्ही खुनी आहात. कृतघ्न आहात.''

हे आरोप शिकारी माणसाला मान्य करावेच लागतात. ''या क्रूर कृत्यांबद्दल मला लाज वाटते... यापुढे मी प्राणीहत्या करणार नाही, जंगल तोडणार नाही'' अशी तो शिकारी प्रतिज्ञा करतो.

अशी पर्यावरण संरक्षणविषयक एक कथाही दळवी काकांनी या पुस्तकात दिलेली आहे.

पुस्तकातील खलील खान यांची मोठमोठी रंगीबेरंगी चित्रे गोष्टींची रंगत वाढवणारी आहेत. अजगराचा भयंकर जबडा, त्याच्यावर महाराजांनी झाडलेली बंदुकीची गोळी, वाघोबापुढे ऐटीत उभा राहिलेला कोल्होबा, अंगभर डोळे असलेला गायींचा राखणदार, शिकाऱ्याला समजावणारे झाड (पृष्ठ २८) ही चित्रे बघत रहावी अशी दिमाखदार आहेत.

**पृष्ठे: ३२ किंमत: ३०रु. ● सभासदांना : २१रु. ● पोस्टेज :२०रु.**



## चाकोरीबाहेरचे विषय हाताळले

**निर्मला मोने**

बालसाहित्य ही आजची मोठी गरज आहे असं मला वाटतं. विशेषत: अनेक प्रकारचे खेळ, दूरदर्शनवरचे रात्रंदिवस चालणारे कार्यक्रम, मालिका यामुळे त्यातून टिकून पुढे येण्याचं आव्हानही बालसाहित्यापुढे मोठंच आहे. घरातल्या मोठ्यांनी गोष्ट सांगणं कमी– जवळजवळ नाहीसंच झालंय. मुलं पुष्कळदा एकटी असतात. एकत्र कुटुंबं नाहीत, घरात माणसं नाहीत, अशा वेळी इतर अनेक व्यवधानांपेक्षा वाचन चांगलं हे सांगायला नकोच. पण त्यासाठी वाचनाची आवड निर्माण व्हायला हवी. ती होण्यासाठी आकर्षक वाङ्मय हवं. मुलांना कल्पक, स्वैर कल्पनाविहाराला वाव देणारं शिवाय जमिनीवरच पाय ठेवून निर्मितीला आव्हान देणारं, आपल्यातलीच वाटतील अशी पात्रं हवीत, तरच ते साहित्य भावतं, हे हॅरी पॉटरनं दाखवून दिलंच आहे.

डोळ्यांसमोर एकच वाचकवर्ग नसतो. पाच वर्षांचं मूल, दहा वर्षांचं मूल आणि पंधरा वर्षांचा कुमार यांची गरज वेगवेगळी असते. त्यानुसार गोष्टींचे विषय, भाषा, प्रसंग ठरतात. सामाजिक, सांस्कृतिक पार्श्वभूमीनुसार भाषा, विषय बदलतात. ते आवश्यकच आहे.

स्वैर कल्पनाविहार– अशक्य कोटीतील वाटणाऱ्याही गोष्टी मनोरंजनासाठी मुलांना हव्या असतात, त्यातील असंभाव्यतेची अगदी लहान वयातही त्यांना जाणीव असते असा अनुभव आहे.

मी मुद्दाम प्रयोग केले नाहीत. मात्र चाकोरीबाहेरच्या म्हणजे हिंस्र मानलेल्या प्राण्यांच्या, खेड्यातल्या, टंचाईच्या जीवनाच्या, झाडापानांच्या कथा लिहिल्या. मुलांना माहीत नसलेल्या विषयांवरच्याही कथा विषय आणि भाषेमुळे मुलांना आवडतात. मुलांना विश्वासात घेऊन गोष्टीरूपाने सांगितल्याने कथांना उदंड प्रतिसाद मिळतो.






## घड्याळातली कोकिळा

### खेळण्यांच्या जगातल्या गमतीजमती

**निर्मला मोने**

'घड्याळातील कोकिळा आणि गडबड गोष्टी' या पुस्तकात निर्मला मोने यांनी 'ठेंगूजी चोर', 'काचेची गोटी', 'काळी मेंढी', 'हत्तीची खोड मोडली' यांचा समावेश केला आहे.

'घड्याळातील कोकिळा'मध्ये दर तासाला भिंतीवरील घड्याळातून बाहेर येणाऱ्या कोकिळेची कहाणी सांगितली आहे. खेळण्यातल्या घड्याळात राहणारी कोकिळा एकदा घड्याळाचे दार लागल्यामुळे बाहेर पडू शकेना. ती घड्याळाच्या त्या खोलीतच अडकून पडते. विदूषक आणि इतर खेळण्यांना त्यामुळे चुकचुकल्यासारखे वाटते. ते दार उघडण्यासाठी डॉली बाहुली आपला ब्रूच देते; त्या ब्रूचच्या पिनने विदूषक घड्याळाचे दार तर उघडतो; पण त्या प्रयत्नात ब्रूच मोडतो. डॉली त्यामुळे कोपऱ्यात जाऊन रडू लागतो. कोकिळेला डॉलीचा ब्रूच मोडला म्हणून वाईट वाटते; डॉलीचे कौतुकही वाटते. एकदा डॉलीभोवती एक गांधीलमाशी गिरक्या मारू लागते; ती



आपल्याला चावणार म्हणून डॉली घाबरते. रडू लागते. त्यावेळी घड्याळातील कोकिळा सरळ दार उघडून बाहेर येते आणि त्या गांधीलमाशीला आपल्या चोचीने अलगद टोचून दूर करते. तेव्हा डॉली तिच्यावर खूष होते. ''घड्याळातून तू थेट कशी ग त्या गांधीलमाशीवर झेप घेतलीस! तुला छान उडता येतं की!'' असं डॉली तिचं कौतुक करते.

–आणि मी रोज तुमच्याशी खेळायला येईन असं वचन कोकिळा सर्व खेळण्यांना देते. घड्याळात दर तासाचे टोले पडले की त्या कोकिळेला दार उघडून बाहेर पडायची आता सवयच लागली आहे. आता अनेक घरांमध्ये कक्कू क्लॉक्स मोठ्या अभिमानाने भिंतीवर मिरवत असतात.

तुम्हाला गोट्या खेळायला आवडतात. गोटीने नेम धरून दुसऱ्या गोट्यांना मारायचा खेळ मुलांमध्ये लोकप्रिय आहे. 'काचेची गोटी' या गोष्टीतील बिट्टूची गोटी चेंडूएवढी होती– त्यामुळे त्याला ती गोटी जीव की प्राण वाटे. जनूने त्याला त्या गोटीच्या बदल्यात बारा गोट्या देऊ केल्या होत्या; पण तसे करायला बिट्टूने साफ नाही म्हटले. बिट्टू ही गोटी नेहमी आपल्या पँटच्या खिशात ठेवायचा. त्यावरून त्याला मुले चिडवत देखील असत. आई म्हणे, ''ही गोटी म्हणजे तुझं पाळलेलं कुत्रंच दिसतंय... त्या गोटीला बिस्किटं अन् दूध द्यायचंच तेवढं बाकी आहे.'' आता हा बट्टू एकदा शाळेच्या दारात आपटतो– आणि ही गोटी त्याच्या खिशातून बाहेर पडते. ती मग घरंगळतच राहते. कारण ती शाळा असते एका डोंगरावर. घरंगळत खाली येताना त्या गोटीला भेटते एक चिमणी; मग भेटते एक मांजर. त्यानंतर घोडा... तरी ती आपली घरंगळतच राहते. खूप दमते. तेव्हा तिला वाटते, आपले घरच चांगले. बिट्टूचा खिसा हेच आपले घर!... आणि ती चक्क बिट्टूच्या दाराशी येऊन थांबते. तिला बघून बिट्टू खूष होतो हे काय सांगायला हवे?

काळी मेंढी म्हणजे ब्लॅक शिप. रतनची सगळी खेळणी या काळोबाला दूर ठेवतात. शिष्ट म्हणतात. तिच्याशी फटकून वागतात. एकदा ही काळी मेंढी माळीबाबाच्या पांढऱ्या रंगाच्या डब्यात पडते. आणि पांढरीशुभ्र होते... मग मात्र खेळणी त्या पांढऱ्या मेंढीबरोबर मोठ्या प्रेमाने वागतात. तिला म्हणतात, ''ती काळी मेंढी ना– फारच कुरूप होती ती! उद्धटही होती. ती फार वाईट होती... पण तू चांगली आहेस. तू आज आमच्याबरोबर रात्री ये खेळायला.'' त्या मेंढीला मोठी गंमत वाटते. 'मीच ती काळी मेंढी' हे तिला सांगावेसे वाटते; पण कोणी आपले ऐकणार नाही, असे तिला वाटते.

या पांढऱ्या मेंढीचे पुढे काय होते? रतन तिला म्हणतो, ''तू कुठून आलीस? मी नवीन खेळणे तर आणलेले नाही. म्हणजे तू ती काळी मेंढीच असणार. रंगाच्या डब्यात पडलीस आणि पांढरी झालीस, नाही का?... थांब,

तुला पहिल्यासारखं करतो.''

आणि रतन तिला खरखरीत ब्रशने घासून काढतो. पांढऱ्या रंगाचा भुगा खाली सांडतो. मग ती राखी होते. शेवटी काळीभोर... सगळी खेळणी बघतच राहतात तिच्याकडे! ती म्हणतात, ''अरे, आम्ही तुझ्याशी फटकून वागलो याचे वाईट वाटते आम्हाला. आता तुला आम्ही कधी चिडवणार नाही.''


खेळण्यातला हत्ती इतर प्राण्यांना घाबरवून सोडायचा. नाचायचा, धावायचा. सगळ्या खेळण्यांना गपगार करायचा... एकदा मात्र हा हत्ती स्वत:च पडला आणि त्याचे तुकडे झाले. ''याला दुरुस्त करायला हवं'' असे ससा म्हणतो. त्याचे सगळे तुकडे गोळा करण्यात येतात. एकेक भाग चिकटवू लागतात... पण गंमत होते. सोंडेच्या जागी शेपूट आणि शेपटीच्या जागी सोंड चिकटवली जाते. अशी होते हत्तीची फजिती!

अशा खेळण्यांच्या जगातल्या या गमती जमती!

**पृष्ठे: ३२ किंमत: ३०रु. ● सभासदांना : २१रु. ● पोस्टेज :२०रु.**



## पोपटाला त्याच्या योग्य झाडावर जायला मदत करा





# प्रयोगक्षम नाटिकांची गरज

उज्ज्वला केळकर

माझ्या बाल-साहित्य लेखनाची सुरुवात, वाङ्मयातून म्हणजे वाणीतून, मौखिक रूपातच झाली. घरातल्या मुलांशी बोलताना अगदी सहज सहज लयबद्ध, यमकयुक्त गीतस्वरूप बोलण्यातून मुलांना गंमत वाटायची. त्यातून बडबड-गीतांची रचना सुरू झाली. मुलांना सांगता सांगताच कथारचनाही होऊ लागली.

पुढे डी.एड. कॉलेजमध्ये नोकरीला लागल्यानंतर पाठ निरीक्षणाच्या निमित्ताने, प्राथमिक शाळेत वारंवार जावं लागे. कळत-नकळत त्या वयातील मुलांच्या कल्पना-भावना, विचार-अपेक्षा, अनुभवविश्व लक्षात येत गेलं. ते सारं मनात कुठेतरी पडून राहिलं. नंतर रुजलं. त्यातून लेखन सुरू झालं. मात्र, विशिष्ट वय, परिसर, सांस्कृतिक-शैक्षणिक पार्श्वभूमी, निश्चितपणे डोळ्यापुढे ठेवून त्यासाठी आवर्जून असं लेखन मी केलं नाही. अर्थात याला एक अपवाद आहे. कॉलेजच्या विद्यार्थिनींना बालवाडीवर काही नमुना पाठ घेऊन दाखवावे लागायचे. तिथे पाठाच्या सुरुवातीला, मुलांचं लक्ष वेधण्यासाठी, वातावरण निर्मितीसाठी, विषयाच्या अनुषंगाने, काही बडबडगीते त्या विशिष्ट हेतूने तयार करून त्यांचा पाठासाठी वापर केला होता. उदा. एकवचन-अनेकवचन, नाम-विशेषण, तरंगणे-बुडणे इ. त्या त्या पाठासाठी त्या त्या हेतूने तयार केलेली ही बडबडगीते छोट्या मुलांना आणि आमच्या विद्यार्थिनींना खूप आवडायची. विद्यार्थिनींनी ती लिहून स्वत:च्या पाठाच्या वेळी त्यांचा वापरही केला होता; पण आवर्जून ती काही प्रसिद्धीला दिलेली आठवत नाहीत. ते सगळं लेखन व त्यांचा वापर प्रासंगिक होता.



१९८३ साली 'किशोर' मासिकाच्या पाच वर्षांच्या अंकांच्या (६० अंक) परीक्षणासाठी आणि सुधारणेसाठी शिफारशी हा शोध-प्रकल्प हाती घेतला. मुलांची मनोगते जाणून घेतली. स्नेहसंमेलनातून मुलांना सादर करण्यासारख्या छोट्या छोट्या नाटिकांची संवादांची संख्या यात खूप कमी दिसतेय. हे माझ्या शोध-प्रकल्पाच्या वेळी ध्यानात आल्यानंतर मी मुद्दाम नाटिका लिहू लागले. अर्थात नंतर कथा-कविताही लिहू लागले. हे सारं लिहिताना प्रॅक्टिसिंग स्कूलमधील आमचे विद्यार्थी, त्यांचं कल्पनाविश्व, अनुभवविश्व, त्यांच्या अपेक्षा, जे पूर्वीच मनात रुजलं होतं, त्याचा उपयोग झाला असणारच.

साहित्य संस्कारक्षम असावं, पण त्यात बाळबोध उपदेश नसावा, असा माझा पहिल्यापासून दृष्टिकोन होता. कथेच्या माध्यमातून भोवतालच्या घटकांचा परिचय, त्यातील भौगोलिक-वैज्ञानिक सत्याला बाधा येऊ न देता, करून देणाऱ्या अनेक कथा मी लिहिल्या. 'ब्रह्मकमळ उमलले', 'बदकाचे बूट', 'गवतफूल गात राहिले' या त्यातील काही. या कथांचे मी नाट्य रूपांतरही केले. अगदी बालवाडीपासून प्राथमिक शाळेपर्यंतच्या मुलांना या आवडतात, असा अनुभव कथाकथनाच्या वेळी आला.


'सशाचे घर', नाटिका 'किशोर'मध्ये प्रसिद्ध झाली. मुंबईच्या पोतदार चिकित्सक समूह या प्राथमिक शाळेने नाट्यस्पर्धेत ती सादर केली. द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. पुढे स्वच्छतेच्या सूत्रावर मी लिहिलेली 'हंसांनी घडवली अद्दल' ही नाटिकाही या शाळेने बसवली. हीच नाटिका सांगलीच्या एका शाळेमध्ये शाळेच्या अमृत महोत्सवाच्या निमित्ताने, इ. पहिलीच्या मुलांकडून त्यांच्या पालकांनी बसवून नाट्यगृहात सादर केली होती. (कॅसेटवर संवाद आणि मंचावर अभिनय असं या सादरीकरणाचं स्वरूप होतं. सांगलीतल्या वरदा खाडिलकर यांनी आपल्या बाल कला मंच या संस्थेतर्फे 'ब्रह्मकमळ उमलले' ही नाटिकाही मुलांना आवडली होती.

या क्षेत्रात सातत्याने काही प्रयोग करणे मला शक्य झाले नाही, कारण त्या वयोगटाचे विद्यार्थी माझ्याशी संबंधित नव्हते.

भावी काळात सुचेल ते लिहायचं, जमेल तिथे प्रसिद्धीला पाठवायचं, एवढीच योजना आहे.

❒

**वपुंचे मनस्वी शब्दचित्र, असंख्य दुर्मिळ छायाचित्रांसह**




# वपु

## स्वाती चांदोरकर

हा एक छोटासा जीवनपट आहे-माझ्या वडिलांचा-व.पु.काळे यांचा. जशी चरित्रं लिहिली जातात, तसं हे लिखाण नाही. त्यामुळे या जीवनपटात 'बालपणापासून ते उत्तरायुष्य' असे विभाग नाहीत. असे विभाग पाडताही येणार नाहीत. कारण आयुष्य हे एक सलग, अखंडच तर असतं.

'जीवनपट' लिहिला जावा, यासाठी अगदी नावाजलेली व्यक्तिमत्वेच हवीत असं अजिबातच नाही. सामान्य आयुष्यंही खूप काही शिकवून जातात. अशी अनेक आयुष्यं बापूंनी त्यांच्या कथांमधून मांडली. काही खरी. काही काल्पनिक. माणसांना मांडण्यापेक्षा त्यांनी माणसांच्या वृत्तींवर लेखन केलं म्हणूनच ते वाचक-रसिकांना भावलं.

\- स्वाती चांदोरकर.

**१२०रु. पोस्टेज २०रु.** **मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**



**सार्धसुधं...**

# हरवलेलं घड्याळ

**प्रमोदिनी वडके-कवळे**

आठवणी ह्या माळावर टाकलेल्या कुलुपकिल्लीसारख्या जुन्यापुराण्या असतात. कधी कोणती किल्ली लागून कुठचं कुलूप उघडेल ते काही सांगता येत नाही.

परवा देवपूजेसाठी आणलेली फुलांची पुडी सोडताना नेहमीप्रमाणे त्या पुडीच्या कागदाकडे लक्ष गेलं. लहान मुलांसाठी लिहिलेल्या पुस्तकाचा तो कागद असावा. अक्षरांचा किंचित मोठा टाईप आणि लडिवाळ भाषा. अधेमधे काढलेली आकर्षक चित्रं. मला अगदी राहवेना. ''नशीब! अजून फुलंतरी कॅरिबॅगमध्ये मिळायला नाही लागली.'' असं म्हणत फुलं बाजूला सारून मी आधी डोळ्यावर चष्मा चढवला. कागद उलटसुलट करून पाहिला तर, त्याच्या पाठपोट एक आख्खी गोष्ट सामावलेली!

कुठल्याशा देशातली ती भाषांतरित लोककथा असावी. एका लहान मुलाला त्याचे आजोबा साखळीचं घड्याळ बक्षीस देतात. तो अगदी खूष होतो. त्या घड्याळाला जिवापाड जपतो. त्याच्या काट्यावर आपलं खाणंखेळणं, अभ्यास सगळ्याचं वेळापत्रक बसवतो. पण कसं कोण जाणे, एके दिवशी शाळेतून येताना त्याच्या हातून ते घड्याळ हरवतं. तो खूप शोधतो, पण तो कुठेच मिळत नाही.

रात्र होते. तो घरी येतो. दुसऱ्या दिवशी शाळेची सहल जाणार असते. त्याला वाटतं, आता आपल्याजवळ घड्याळ नाही म्हणजे रात्र संपणारच नाही. आपल्यासाठी सकाळ उगवणारच नाही. आपण झोपूनच राहू. सगळे मित्र सहलीला निघून जातील.

आणि मग तो ओक्साबोक्शी रडायला लागतो.

त्याचे आजोबा त्याला जवळ घेऊन सूर्यचंद्राचं घड्याळ समजावून देतात आणि सांगतात, ''घड्याळ असं कुणा एकासाठी नसतंच कधी. संपूर्ण जगासाठी एकच एक मोठ्ठं घड्याळ असतं. काळ! आपण फक्त त्याच्याबरोबर चालायचं...''

गोष्ट साधीच. काहीशी उपदेशात्मक. पण ती लहान मुलांना आवडेल आणि पचेल अशा भाषेत लिहिलेली. वाचायला फार गोड वाटणारी.

वाचता वाचता माझं मन रोह्याच्या भाटे सार्वजनिक वाचनालयात पोचलं.

माझं बालपण समृद्ध करणारी साध्या बांधणीची ती बैठी वस्तू. आत शिरल्यावर, उजव्या बाजूच्या लाकडी शेल्फमध्ये बालवाङ्मय ठेवलेलं असायचं. जादूच्या, राक्षसांच्या, परीच्या अद्‌भुत गोष्टी, वाचताना मनात अभिमान जागवणाऱ्या स्वातंत्र्यवीरांच्या कथा, श्वास रोखून धरायला लावणाऱ्या साहसकथा, रात्रीच्या अंधारात हमखास आठवणाऱ्या भयकथा, गोनिदांची आईची देणगी, आमच्याशी जवळचं नातं सांगणारी सानेगुरुजींची धडपडणारी मुलं, ताम्हनकरांचे गोट्या चिंगी, भागवतांचा फास्टर फेणे... सगळंसगळं आठवलं.

वाचनालय बंद होईपर्यंत त्याच्या पायरीवर बसून चाललेलं आमचं वाचन, हवं ते पुस्तक मिळवण्यासाठी वाचनालय उघडण्याआधीच जाऊन नंबर लावणं, तिथल्या खडुस सरवटेकाकांना मस्का मारून नवीन आलेलं पुस्तक आधी मिळवण्यासाठी केलेल्या निरनिराळ्या युक्त्या.

त्यावेळीही मला अशा लोककथा वाचायला फार आवडायच्या. त्यातली वेगळी विशेषनामं हळूहळू ओळखीची होत जायची. आज सगळी आठवत नाहीत, पण रशियन लोककथेतला 'झार' मात्र अजून लक्षात आहे.

भूमध्यसमुद्रातल्या संपन्न प्रदेशांचे वर्णन वाचताना तर माझी जीभ नाकाला टेकून पुढे जायची. त्याकाळी सफरचंद हे आमच्यासाठी केवळ पुण्यामुंबईसारख्या शहरात मिळणारं अपूर्वाईचं फळ. पण इथे झाडांच्या फांद्या सफरचंदाने लगडलेल्या असायच्या. वाचनालयाच्या पायरीवर बसल्याबसल्या मी त्या स्वप्नप्रदेशात पोचायची आणि झोपडीतल्या चेटकिणीची पर्वा न करता झाडाखाली पडलेली सफरचंदं वेचायची. त्या वयात वास्तव नावाच्या जहरी शब्दाचा स्पर्श आमच्या अकलेला झालेला नसल्याने आम्ही खूपखूप सुखी होतो. आमची इवलीइवली सुखदु:खं बालकथेतल्या घटनांशीच बांधलेली होती. सिंड्रेलाला भोपळ्याच्या रथातून घेऊन जाणारे उंदीर, तिचा काचेचा बूट, एका फटक्यात तिच्यावर भाळणारा राजपुत्र हे सगळं जेवढं सत्य वाटायचं, तेवढेच सानेगुरुजींच्या मिरीचे हालही खरे वाटायचे. गोट्याची आई 'खोटी' असूनसुद्धा खऱ्या आईपेक्षा जास्त प्रेम कसं करते ही शंका जशी मनात डोकावायची नाही, तशीच वहिनीच्या रागावरून मिठाची पोती आणायला गेलेला भूषण एका वर्षात यशस्वी होऊन येईल याचीही मनापासून खात्री वाटायची.

...घड्याळाला किल्ली द्यावी तशी त्या एका सुट्या पानाने माझ्या आठवणींना किल्ली दिली आणि काळाचे काटे उलटे फिरवले.

खाकी वेष्टनात लपेटलेल्या, पिवळ्या कागदांच्या त्या पुस्तकांशी आणखी एका वेगळ्याच गंधाची आठवण जोडलेली होती. शंकरपाळ्या तळल्याचा गोड तुपकट वास.

आईला वाचनाचा फार नाद. घरात कितीही काटकसर करावी लागली तरी दरमहा वाचनालयाची वर्गणी भरून ती पुस्तकं आणून वाचायची. रोज रात्री थोडंतरी वाचल्याशिवाय तिला झोप येत नसे. अपवाद असायचा तो फक्त आजोळी जाण्याच्या आदल्या रात्रीचा. त्या दिवशी माहेरी न्यायला म्हणून आईला शंकरपाळे करायचे असत म्हणून तिला वाचायचा वेळ व्हायचा नाही. मग मी त्या दिवशी वाचनालयातून माझ्यासाठी पुस्तक आणायची. रात्रीची जेवणं आवरली, की आई शंकरपाळ्या करायला घ्यायची. अण्णा तिला मदत करायचे आणि मी जागून पुस्तक पुरं करायच्या खटपटीत असायची. कारण दुसऱ्या दिवशी आजोळी जायला दहाची गाडी असायची. त्यापूर्वी ते पुस्तक सकाळी नऊ वाजता वाचनालयात जाऊन ते परत करून मला धावतपळत एसटी स्टँडवर यावं लागायचं.

शंकरपाळ्या तळल्याचा गोड वास आणि पुस्तकातल्या चटकदार गोष्टी यांच्या माझ्या मनातल्या आठवणी अतूट आहेत. कारण दरवेळी माहेरी नेण्यासाठी गूळ घालून केलेल्या शंकरपाळ्या हा आईचा ठरलेला पदार्थ होता. त्याचं कारण तेव्हा कळलं नाही, पण आता लक्षात येतंय. आईचं माहेर श्रीमंत आणि अण्णा रोह्याच्या म्युनिसिपालिटीतले साधे कारकून. आई जाताना शंकरपाळ्यांनी भरलेला एक पेढेघाटी डबा न्यायची तेवढाच! पण येताना त्याच्या कितीतरी पट जास्त जिनसा आजी बांधून द्यायची. पापड, मुरांबे, साजूक तूप, चुरमुऱ्याचं पीठ, खारीकखोबरं, घरच्या दुधाचा खवा, गुळपापडीचे लाडू... किती न काय!

एवढं सगळ्या देणाऱ्या आजोळच्या घरात काय कधी शंकरपाळ्या होत नसतील? पण नाही. माहेरी जाताना रिकाम्या हाताने जाणं आईच्या स्वाभिमानी मनाला पटायचं नाही. ती मारे लाडूकरंज्या न्यायचे बेत करायची, पण आयत्या वेळी दामाजीपंत दगा द्यायचे. महिनाभराच्या तुटपुंज्या हिशोबातून चार मुलं आणि ती स्वत: यांच्या भाडेखर्चाची मिळवणी करताना बाकी कशासाठी पैसे उरायचे नाहीत. मग घरात असलेल्या गूळ आणि कणीक यासारख्या वस्तू वापरून तिला तेवढा एकच पदार्थ करता यायचा. तिच्या हाताला चव असल्यामुळे असेल, किंवा कोंड्याचा मांडा करण्याच्या तिच्या कौशल्यामुळे असेल, पण तिच्या शंकरपाळ्या खरोखरीच 'स्पेशल' व्हायच्या. दुधातुपात वाढलेली माझी सगळी मामेभावंडं म्हणायची, ''माईआत्या, तुझ्यासारख्या शंकरपाळ्या कुणाला जमत नाहीत. तू येताना बाकी काही आणलं नाहीस तरी चालेल. पण शंकरपाळे मात्र नक्की आण.''

आता कोंड्याचा मांडा करावा अशी परिस्थिती उरली नाही. पण तो करणारी आईही राहिली नाही. आजकाल शंकरपाळ्या तळल्याचा तो विशिष्ट वाससुद्धा नाकाला कुठे भेटत नाही. कारण शंकरपाळ्या घरात बनतच नाहीत. कोणत्याही दुकानात खुसखुशीत शंकरपाळ्यांचं आयतं पाकीट केव्हाही तयार मिळतं.

शंकरपाळ्यांच्या त्या वासासारखीच गोष्टीच्या पुस्तकाशी आणखी एक आठवण

बांधलेली आहे. मराठीच्या कुलकर्णी बाईंची! पाचवी ते नववी ही पाच वर्षं बाईंनी आम्हाला मराठी हा विषय शिकवला. पुस्तकातल्या धड्यांबरोबरच लोककथांमधलं सौंदर्य उलगडून दाखवलं. आणि मुख्य म्हणजे वाचनाची गोडी लावली. अशा स्वप्नाळू पण नीतिमत्ता उंचावणाऱ्या गोष्टी वाचण्याची सवय याच वयात सुटून जाते आणि मनाचं फुलपाखरू बेगडी प्रीतिकथांभोवती भिरभिरायला लागतं. पण बाईंनी ते होऊ दिलं नाही. धडे शिकवता शिकवता त्या इतके रसाळपणे लोककथेतले दाखले देऊन धड्यातला अवघड भाग सोपा करायच्या, की धड्यापेक्षा ती लोककथाच जास्त लक्षात रहायची. शाळेच्या वाचनालयातली लोककथांची पुस्तकं बाई आम्हाला मुद्दाम वाचायला आणून द्यायच्या.

मी थोडंफार लिहायला लागले आणि ते प्रसिद्ध झालं, तेव्हा मला बाईंचं पत्र आलं... 'अशा विद्यार्थ्यांचा मला फार अभिमान वाटतो. तुझ्यासारखे विद्यार्थी शिक्षकी पेशा पत्करल्याचं सार्थक करतात...' त्यातल्या पत्त्यावरून कळलं, बाई आता निवृत्तीनंतर चिंचवडलाच मुलाकडे येऊन राहिल्यायत. नोकरी-घरसंसाराच्या चक्रातून चुटपुटता वेळ काढून मी भेटायला गेले तेव्हा, बाईंची तब्येत जरा खालावलेली दिसली. मागच्या काही घटनाही त्यांना सुसंगतपणे आठवत नव्हत्या. तरीही त्यांनी माझ्याशी भरभरून गप्पा मारल्या आणि 'पुन्हा निवांतपणे ये ग' असा आग्रहही केला.

पुढच्या वेळी मी बराच वेळ काढून गेले तेव्हा मात्र बाई गप्पा मारण्याच्या पलीकडे गेल्या होत्या. त्यांची स्मृती हरवल्यामुळे त्यांना काहीही बोलायला सुचत नव्हतं. भांबावल्यासारख्या त्या माझ्याकडे नुसत्या बघत राहिल्या.

वर्गात भरभरून बोलणाऱ्या, भाषेचं, शब्दांचं सौंदर्य आम्हाला उलगडून दाखवणाऱ्या, कुलकर्णी बाईंचं ते नि:शब्द रूप मला पाहवलं नाही.

पण शेवटी पाहिल्याने आता मनावर तेच कायमचं कोरून राहिलंय.

पुढ्यातला तो चुरगळलेला कागद आणि त्यावरची बालकथा वाचताना हे सगळं मनासमोर उभं राहिलं आणि गोष्टीतल्या त्या आजोबांना ओरडून सांगावंसं वाटलं, आम्ही आमची घड्याळं काळाच्या बरोबरच लावून घेतलीयेत हो... पण एका क्षणापुरतं तरी आम्हाला एखादं जादूचं घड्याळ बक्षीस द्या ना... ज्याचे काटे उलटे फिरवता येतील आणि क्षणभरासाठी का होईना, पण काळाने हिरावलेली ही मायेची माणसं पुन्हा दिसतील. काळाच्या घड्याळातून हरवलेले हे श्रीमंत क्षण पुन्हा जगता येतील.

———————————

**प्रमोदिनी वडके-कवळे**
प्राजक्त, अपूर्वा हौ. सोसायटी, सर्व्हे नं. ६०,
सुखसागरनगर क्र. २, गल्ली क्र. १०,
कोंढवा बुद्रुक, पुणे ४११०४८



# पुरस्कार

## * डॉ. श्रीराम लागू यांना पुण्यभूषण पुरस्कार

ज्येष्ठ अभिनेते डॉ. श्रीराम लागू यांना यंदाचा 'पुण्यभूषण पुरस्कार' जाहीर करण्यात आला आहे. 'त्रिदल-पुणे' संस्थेतर्फे गेली १८ वर्षे हा पुरस्कार दिला जातो.

एक लाख रुपये आणि सोन्याच्या फाळाने पुण्याची भूमी नांगरत असलेल्या बालशिवाजींची चांदीची प्रतिकृती असे पुण्यभूषण पुरस्काराचे स्वरूप आहे. या समारंभातच पाच ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिकांचाही सन्मान केला जातो. यंदा प्रा. नरसिंगराव व्यंकटराव रत्नाळीकर, श्रीमती भारती नखाते, पत्रकार गोपाळराव पटवर्धन, प्रभुदास दगडूदास शेठ आणि पंडितराव आत्माराम कर्वे या पाच जणांचा सन्मान केला जाणार आहे.

चित्रपट आणि नाट्यसृष्टीवर तसेच प्रायोगिक रंगभूमीवर आपला ठसा उमटवलेल्या डॉ. लागू यांनी १९७१ मध्ये 'पिंजरा' या चित्रपटातून आपली चित्रपट कारकीर्द सुरू केली. आत्तापर्यंत त्यांनी सव्वाशे चित्रपट केले आहेत. 'सामना', 'भिंगरी', 'किनारा', 'इन्कार', 'देवकीनंदन गोपाला', 'पिंजरा' हे त्यांचे काही गाजलेले चित्रपट, तर 'वेड्याचं घर उन्हात', 'गिधाडे', 'नटसम्राट', 'हिमालयाची सावली', 'किरवंत', 'उद्‌ध्वस्त धर्मशाळा', 'काचेचा चंद्र', 'इथे ओशाळला मृत्यू' ही त्यांची काही गाजलेली नाटके.

भारत सरकारने १९७३ मध्ये त्यांना 'पद्मश्री' दिली. अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कार्यात ते सदैव अग्रणी राहिले आहेत. सार्वजनिक सामाजिक कृतज्ञता न्यासाच्या माध्यमातून सामान्य कार्यकर्त्यांना मदत देण्याचे काम डॉ. लागू यांनी उभे केले आहे.

## * बालसाहित्य पुरस्कार

मुले वाचत नाही ही तक्रार करत बसण्यापेक्षा वाचनासाठी चांगले बालसाहित्य निर्माण होणे ही लहान मुलांची गरज आहे. पूर्वीपेक्षा बालसाहित्य मोठ्या प्रमाणात उपलब्ध असून आता वाचन हीच चळवळ होण्याची गरज आहे, असे 'लोकसत्ता'चे निवासी संपादक मुकुंद संगोराम यांनी सांगितले.

अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संमेलन संस्थेचे वाङ्मय पुरस्कार

संगोराम यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

डोळे आणि कान उघडे ठेवून निरीक्षण केले तर लिहिण्याची क्षमता येऊ शकते. लहान मुलांनी सतत लिहीत रहायला हवे. आपल्याला लिहिता येणार नाही अशी वृत्ती न ठेवता ते तपासण्यासाठी आधी लिहून पाहायला पाहिजे असे संगोराम यांनी सांगितले. गोष्ट लिहिण्याबरोबरच ती वाचणे ही एक कला असते. मुलांनी रवींद्रनाथ टागोर, रस्किन बाँड यांच्या कथा वाचाव्यात असे रेणू गावसकर यांनी सांगितले.

उत्कृष्ट दिवाळी अंक पुरस्कार 'छात्रप्रबोधन' आणि 'छावा' या दोन मासिकांना देण्यात आला. उत्कृष्ट कथेसाठीचा गोपीनाथ तळवलकर पुरस्कार सुहासिनी देशपांडे यांना 'मामू' मासिकातील 'चल सोडूनी जा' या कथेसाठी इंदुमती आरकडी यांना 'छावा' मासिकातील 'नवं नातं' या कथेसाठी देण्यात आला.

उत्कृष्ट कवितेसाठीचा 'आनंदयात्रा' पुरस्कार आश्लेषा महाजन, डॉ. नीलिमा गुंडी, कविता कुलकर्णी यांना प्रदान करण्यात आला.

## * डॉ. पी. एस. गोयल यांना आर्यभट्ट पुरस्कार

बंगलोर येथील 'अॅस्ट्रॉनॉमिकल सोसायटी ऑफ इंडिया'ने २००५ चे पुरस्कार जाहीर केले असून आर्यभट्ट पुरस्कार भूविज्ञान मंत्रालयाचे सचिव डॉ. पी. एस. गोयल यांना जाहीर झाला आहे.

अवकाश तंत्रज्ञानात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना हे पुरस्कार दिले जातात. एक लाख रुपये रोख व स्मृतिचिन्ह असे आर्यभट्ट पुरस्काराचे स्वरूप असून अन्य पुरस्कारांचे स्वरूप २१ हजार रुपये रोख व स्मृतिचिन्ह असे आहे. सांघिक संशोधनासाठी एक लाख रुपये व स्मृतिचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

### आर्यभट्ट पुरस्कार

**क्षेपणास्त्र तंत्रज्ञान :** पी. वरदराज, संरक्षण संशोधन आणि विकास प्रयोगशाळा, हैदराबाद. अवकाश शास्त्र आणि उपयोजकता : डॉ. व्ही. के. अगरवाल, इस्रो, प्रा. आर. श्रीधरन. अवकाश प्रणाली व्यवस्थापन : एस. के. शिवकुमार.

### अन्य पुरस्कार

**क्षेपणास्त्र तंत्रज्ञान :** टी. आर. चिदम्बरम्, अंतराळयान तंत्रज्ञान : बी. एन. बालीगा, डॉ. एस. बी. शर्मा, अवकाश प्रणाली व्यवस्थापन : बी. एस. भाटिया, अवकाश शास्त्र आणि उपयोजिता : डॉ. पी. एस. रॉय, डॉ. व्ही. के. दधवाल, महिला वैज्ञानिक पुरस्कार : कल्पना अरविंद, शेफाली अगरवाल, सांघिक संशोधनासाठीचे पुरस्कार : के. रत्नकारा आणि सहकारी, पी. ए. कृष्णमूर्ती व त्यांचे सहकारी, आर. शेखैया आणि त्यांचे सहकारी, एम. बी. एम. मूर्ती व सहकारी.



## * डॉ. अशोक कामत यांना 'संत ज्ञानेश्वर पुरस्कार'

संत श्री ज्ञानेश्वर गुरुकुलतर्फे देण्यात येणारा 'संत ज्ञानेश्वर पुरस्कार' या वर्षी पुणे विद्यापीठातील संत नामदेव अध्यासनाचे प्रमुख व संत वाङ्मयाचे अभ्यासक डॉ. अशोक कामत यांना जाहीर झाला आहे. एकतीस हजार रुपये गौरवदक्षिणा व मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. संत नामदेव अध्यासनाच्या माध्यमातून गेली दोन तपे डॉ. कामत यांचे लेखन, चर्चासत्रे, व्याख्याने, संतसाहित्य संमेलने, संशोधन चालू आहे.

## * वर्धन यांना गणितातील 'अॅबेल' पुरस्कार

गणितातील नोबेल पुरस्कार म्हणून ओळखला जाणारा यंदाचा अॅबेल पुरस्कार भारतीय वंशाचे गणितज्ज्ञ प्रा. श्रीनिवास वर्धन यांना जाहीर झाला आहे. गणितातील उल्लेखनीय कामगिरीसाठी साडेआठ लाख डॉलरच्या या पुरस्कारासाठी त्यांची निवड झाली आहे. नॉर्वेजिअन अॅकॅडमी ऑफ सायन्स अँड लेटर्सतर्फे गेल्या पाच वर्षांपासून हा पुरस्कार दिला जातो. प्रा. वर्धन गेली चाळीस वर्षे न्यूयॉर्क विद्यापीठात अध्यापन करीत आहेत.

चेन्नईत जन्मलेल्या प्रा. वर्धन यांनी मद्रास विद्यापीठातून पदवी मिळवली आणि त्यानंतर कोलकत्यातील भारतीय संख्याशास्त्र संस्थेत पीएच.डी. संपादन केली. आंतरराष्ट्रीय ख्यातीचे तमीळ गणितज्ज्ञ श्रीनिवास रामानुजन यांचा त्यांच्यावर प्रभाव आहे. प्रा. वर्धन यांची भारताशी नाळ घट्ट आहे. ते वारंवार भारतात येत असतात. २२ मे रोजी त्यांना अॅबेल पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

## * डॉ. नारळीकर यांना कलाभूषण पुरस्कार

''समाजात अंधश्रद्धा, जातिभेद आणि ग्रहगोलांचा बागुलबुवा अद्यापही कमी झालेला नाही. या गोष्टींपासून समाजाला स्वातंत्र्य कसे मिळेल याबाबत विचार करण्याची गरज आहे,'' असे मत आंतरराष्ट्रीय कीर्तीचे शास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर यांनी व्यक्त केले.

राजवैभव प्रतिष्ठान, औंध यांच्या वतीने देण्यात येणारा 'श्रीमंत बाळासाहेब पंतप्रतिनिधी कलाभूषण पुरस्कार' डॉ. नारळीकर यांना माजी केंद्रीय मंत्री राम नाईक यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. विद्यापीठाच्या संस्कृत विभागाच्या माजी प्रमुख डॉ. सरोजा भाटे अध्यक्षस्थानी होत्या. मोहन धारिया, विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव, बाबासाहेब पुरंदरे आदी व्यासपीठावर उपस्थित होते. औंधच्या पंतप्रतिनिधींनी सामाजिक जागृती व समाजात चांगल्या संकल्पना रुजण्यासाठी कायम प्रयत्न केले. औंध संस्थान व पंतप्रतिनिधींनी याबाबत केलेले प्रयत्न निश्चितच लक्षणीय आहेत. सध्याच्या काळातही असे प्रयत्न व्यापक स्वरूपात व्हावेत, अशी अपेक्षा डॉ. नारळीकर यांनी व्यक्त केली. औंध संस्थानच्या कार्यपद्धतीचा अभ्यास व अवलंब सध्याच्या स्थानिक स्वराज्य संस्थांनी करावा, असे मत पुरंदरे

यांनी व्यक्त केले. डॉ. जाधव म्हणाले, ''खगोलशास्त्र व विज्ञान या विषयांची सर्वसामान्यांना समजेल अशा सोप्या भाषेत डॉ. नारळीकर यांनी सातत्याने मांडणी केली आहे.'' ''विद्या आणि विनय यांचे दर्शन डॉ. नारळीकरांच्या लेखनात दिसून येते,'' असे मत डॉ. भाटे यांनी अध्यक्षीय समारोपात व्यक्त केले. दत्ता जगदाळे यांनी प्रास्ताविक केले. अरविंद इनामदार यांनी सूत्रसंचालन केले.

*** एम्मी पुरस्कार.**

दूरचित्रवाणी वाहिन्यांच्या वृत्तांकनासाठी अनेक पुरस्कार मिळविणाऱ्या भारतीय वंशाच्या सुकन्या कृष्णन हिला प्रतिष्ठेचा एम्मी पुरस्कार मिळाला आहे. चेन्नईत जन्म झालेल्या ३२ वर्षांच्या सुकन्याने विविध वाहिन्यांसाठी काम केले असून, तिने वृत्तांकन केलेल्या बातम्यांमध्ये अमेरिकेचे माजी अध्यक्ष बिल क्लिंटन यांच्याविरुद्ध चाललेल्या महाभियोगाच्या घटनेचाही समावेश आहे. चित्रीकरण, संपादन वृत्त लेखनाबरोबर दूरचित्रवाणीच्या वृत्तांकनाच्या प्रत्येक क्षेत्रात तिने काम केलेले आहे. तामिळ, इंग्लिश व स्पॅनिश भाषेवर प्रभुत्व असलेल्या सुकन्याने उत्तर अमेरिकेतील फेडरेशन ऑफ तामिळ संगमचाही पुरस्कार मिळवला आहे.

*** शब्द-शोध वाङ्मय पुरस्कार जाहीर.**

संत गाडगेबाबा वाचनालय,नांदेड आणि 'शब्द-शोध' दैनिकाच्या वतीने शब्द-शोध वाङ्मय पुरस्कार नुकतेच जाहीर करण्यात आले.पुरस्कारविजेते लेखक आणि त्यांच्या साहित्यकृती खालीलप्रमाणे.

* 'मुक्काम पोस्ट - खैरलांजी.' (कादंबरी)
प्रा. प्रदिप सरदेसाई, धरमपेठ, नागपूर.

* 'वाळवंट' - (कथासंग्रह)
गजानन माकोडे, लखाडा, वाशिम.

* 'मराठी मसाला....वऱ्हाडी-वांग' (काव्यसंग्रह)
सु. सा. खंडारे, अकोला.

विजेत्यांसह इतर स्पर्धकांना उत्तेजनार्थ प्रशस्तिपत्र यशावकाश पाठविण्यात येईल,असे कार्यवाह राजीव रोहणकार यांनी पत्रकाद्वारे कळवले आहे.


*** साहित्य साधना पुरस्कार.**

मराठी लेखक राजीव पुरुषोत्तम रोहणकार यांना जानेवारी २००७ चा साहित्य साधना पुरस्कार त्यांच्या 'डोंगरवाडी' ह्या कादंबरीबद्दल देण्यात आला.

ही कादंबरी महाजन ब्रदर्स यांनी प्रकाशित केली आहे. एक हजार रुपये रोख असे ह्या पुरस्काराचे स्वरूप आहे.

❐






# सीज़र

रॉबिन कुक
अनु. डॉ. प्रमोद जोगळेकर

किंमत ३०० रु.
पोस्टेज २५ रु.

पेशींचे क्लोनिंग करून मानवजातीला ग्रासणाऱ्या पार्किन्सन्ससारख्या आनुवंशिक विकारांवर उपचार करण्याचे तंत्र विकसित करणारा विलक्षण बुद्धिमत्तेचा शास्त्रज्ञ डॅनियल लॉवेल आणि लोकांच्या भावनांशी खेळून स्वत:चा राजकीय मतलब साधणारा एक महत्त्वाकांक्षी सिनेटर, एकमेकांच्या समोर उभे ठाकतात. पेचातून सुटका व्हावी म्हणून डॅनियल सिनेटर बटलरचा अनैतिक प्रस्ताव मान्य करून कोणी कधी न केलेले जनुक उपचार करायला तयार होतो. उपचारासाठी लागणारे जनुक थेट ख्रिस्ताच्या रक्तापासून मिळवण्याची विलक्षण अट बटलर घालतो आणि त्यातून सुरू होते ती पेच-डावपेचांची जीवघेणी मालिका...

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**




**मा. संपादक**

आपला मार्च २००७ चा अंक वाचण्यात आला.

जसवंतसिंग यांची क्षणचित्रे आवडली. 'संपादकीय' निश्चितच अंत:र्मुख करणारे आहे. अ. भा. मराठी साहित्य संमेलन, नागपूर येथील वास्तव चित्रण आणि त्यामागची जनसामान्यांची उदासीनता लक्षात आली. आयोजक मंडळाची 'अनास्था' त्यातून प्रामुख्याने जाणवली!

'मराठी साहित्य : ग्लोबलायझेशनची आव्हाने–' हा विलास वाडकर यांचा लेख अभ्यासनीय वाटला. आजचे अग्रगण्य प्रकाशक श्री. अनिल मेहता आणि आशा बगे यांची मुलाखत– मराठी साहित्य क्षेत्रात– एक निश्चितच– एक दिशा दाखवणारी ठरावी. श्री. शंकर सारडा यांचा नागपूर संमेलनावर लेख छान वाटला.

**पुरुषोत्तम रोहणकार**, किनवट (नांदेड)

**मा. संपादक**

मार्च महिन्याच्या अंकातील श्री. शंकर सारडा यांची नागपूरच्या साहित्य संमेलनाबद्दलची समीक्षा वाचण्यात आली. नागपुरातच हे संमेलन असल्यामुळे रात्रंदिवस हजेरी लावली होती. नामवंतांची भाषणे, विचार, सरकार यांचा पूर्णपणे आस्वाद आम्ही घेतला. जेवण घेतलं नाही. फक्त टपरीवरचा चहा घेतला. संमेलनातील त्रुटी, उणिवा, गर्दी, थंडी, कार्यकर्त्यांची धावपळ, मदतीचा हात कसा पोचता होता, नव्हता याबद्दल लिहीत नाही. मोठे संमेलन म्हटले की हे कमीजास्त चालायचेच. आपली वृत्तीही 'चलता है चलने दो' अशी असते.

कार्यक्रम चालू असताना कोणी प्रतिष्ठित व्यक्ती उशिरा आली तर संयोजक चालू कार्यक्रमात आडवे पडून त्या व्यक्तीचे स्वागत करीत होते. खरे तर स्टेजवर आजी व माजी अध्यक्ष आणि मुख्य अतिथी एवढ्या तीनच खुर्च्या ठेवाव्या. आजी अध्यक्षांची पत्नी हजर तर आणखी एक खुर्ची वाढवावी. त्यांचाच सत्कार करावा. नैसर्गिक फुलांऐवजी कृत्रिम फुलांचे गुच्छ द्यावे. पण माझे हे विचार कोणाला पटणार नाहीत असे वाटते.

**डॉ. जयंत जुन्नरकर**, नागपूर.



**मा. सुप्रिया वकील**

आपण अनुवादित केलेले फाईव्ह पॉईंट समवन हे पुस्तके नुकतेच वाचले. फार आवडले. अनुवाद उत्तमरित्या जमला आहे.

मला अनुवादित साहित्य वाचनाची आवड आहे. आपण इतरही गाजलेल्या साहित्यकृतींचे अनुवाद केले आहेत. कृपया त्याबाबत कळवावे, अनुवादासह आपल्या स्वतंत्र लेखनाची अपेक्षा बाळगून आहे.

**व्यंकटेश शिवाजी साळे**, सिंधुदुर्ग.

*प्रेमातला अत्युत्कट आनंद, विरहाच्या असह्य वेदना, यांच्याही पलीकडे जाऊन, प्रेमातला त्याग, प्रेमासाठी मोजावी लागणारी किंमत, प्रेमामुळे झालेले अंतर्बाह्य बदल अशा सर्वच प्रेमरंगांची ही गाथा.....*

*आज, काल किंवा उद्या, प्रेमात पडणाऱ्या प्रत्येकानं वाचल्याच पाहिजेत अशा, ठराविक साचा मोडीत काढणाऱ्या एकमेवाद्वितीय प्रेमकथा.....*

**स्वप्नातील चांदणे**

रत्नाकर मतकरी



**७०रु. | पोस्टेज २०रु.**

नवे कोरे




## तंत्रज्ञानाची मुळाक्षरे

कविता भालेराव

| २३०रु. | पोस्टेज २५रु. |
|---|---|

'गरज ही शोधाची जननी आहे.' या उक्तीलाच अनुसरून या पुस्तकाची निर्मिती केलेली आहे.

यातील विलक्षण मनोरंजक माहिती कुमार वयोगटातील मुलांना उद्‌बोधक व प्रेरणादायी होईल. आपल्या सभोवताली कितीतरी वस्तू आणि साधनं असतात. त्याचे मूळ शोधणे गरजेचे असते.

मुलांसाठी सौदर्यदृष्टी व सर्जनशीलता कशी वाढवावी याचे रंजक भाषेतील विवेचन या पुस्तकामध्ये केलेले आहे.

ख्रिस्तपूर्व ८००० पासून २००२ पर्यंत लागलेल्या सर्व शोधांची माहिती यामध्ये आहे.

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.





T BOOK CLUB

या क्लबचे सभासद व्हा.
आणि उत्तमोत्तम अनुवादीत पुस्तके
निम्म्या किंमतीत मिळवा!

### टी बुक क्लब योजनेतील 'क्लासिक्स' साठी खास सवलत!

५० रु. भरा व कोणतीही ६ किंवा सर्व पुस्तके एकाचवेळी निम्म्या किंमतीत मिळवा.

### खालील यादीतील पुस्तके एकाचवेळी घेणाऱ्या ग्राहकासाठी खास सवलत!

**अजून ५०रु. भरा आणि मेहता मराठी ग्रंथजगतचे ६ महिन्याचे सभासदत्व व ६ महिने इतर पुस्तकांवर ३०% सवलत मिळवा!**

६ पुस्तकांसाठी ५० रु. व सर्व पुस्तकांसाठी एकूण पोस्टेज १०० रु.

| पुस्तकाचे नाव | मूळ लेखक | अनुवाद | किंमत | सभासदांना |
|---|---|---|---|---|
| नॉट विदाऊट माय डॉटर | बेट्टी महमूदी | लीना सोहोनी | २००रु. | १००रु. |
| डिस्क्लोजर | मायकेल क्रायटन | माधव कर्वे | २२०रु. | ११०रु. |
| काँगो | मायकेल क्रायटन | अरुण मांडे | १६०रु. | ८०रु. |
| ज्युरॅसिक पार्क | मायकेल क्रायटन | प्रमोद जोगळेकर | २५०रु. | १२५रु. |
| नॉट अ पेनी मोअर, नॉट अ पेनी लेस | जेफ्री आर्चर | अंजनी नरवणे | १२०रु. | ६०रु. |
| द फोर्थ के | मारिओ पुझो | वनिता सावंत | २००रु. | १००रु. |
| द लास्ट डॉन | मारिओ पुझो | अनिल काळे | ३५०रु. | १७५रु. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| द हॉट झोन | रिचर्ड प्रेस्टन | प्रमोद जोगळेकर | २००रु. | १००रु. |
| कन्टेजन | रॉबिन कुक | प्रमोद जोगळेकर | २४०रु. | १२०रु. |
| द फिस्ट ऑफ गॉड | फ्रेडरिक फोरसीथ | अनिल काळे | ३००रु. | १५०रु. |
| क्रोमोझोम - ६ | रॉबिन कुक | वैशाली जोशी | ३५०रु. | १७५रु. |
| डॉक्टर झिवागो | बोरिस पास्तरनाक | आशा कर्दळे | २५०रु. | १२५रु. |
| फिअर इज द की | ॲलिस्टर मॅक्लीन | अशोक पाध्ये | १६०रु. | ८०रु. |
| द पेलिकन ब्रीफ | जॉन ग्रिशॅम | रवींद्र गुर्जर | २८०रु. | १४०रु. |
| द गोल्डन गेट | ॲलिस्टर मॅक्लीन | अशोक पाध्ये | २२०रु. | ११०रु. |
| सेव्हिंग फेथ | डेव्हिड बेल्डासी | माधव कर्वे | २००रु. | १००रु. |
| द क्लायंट | जॉन ग्रिशॅम | माधव कर्वे | ३००रु. | १५०रु. |
| टाइमलाइन | मायकेल क्रायटन | प्रमोद जोगळेकर | ३६०रु. | १८०रु. |
| द रेनमेकर | जॉन ग्रिशॅम | अनिल काळे | ३८०रु. | १९०रु. |
| फर्स्ट टु डाय | जेम्स पॅटरसन | रवींद्र गुर्जर | २००रु. | १००रु. |
| द ब्लाइन्ड असॅसिन | मार्गरेट ॲटवूड | चारुता नानिवडेकर | २५०रु. | १२५रु. |
| द गोल्डन रॉन्देव्हू | ॲलिस्टर मॅक्लीन | अशोक पाध्ये | २००रु. | १००रु. |
| फ्रॉम रशिया विथ लव्ह | इयान फ्लेमिंग | विजय देवधर | २५०रु. | १२५रु. |
| ऑन द विंग्ज ऑफ ईगल्स | केन फोलेट | ज्योत्स्ना लेले | २५०रु. | १२५रु. |
| सिटी ऑफ बोन्स | मायकेल कॉनेली | अजित ठाकूर | २४०रु. | १२०रु. |
| ओमेर्ता | मारिओ पुझो | अनिल काळे | २२०रु. | ११०रु. |
| द डार्क क्रुसेडर | ॲलिस्टर मॅक्लीन | अशोक पाध्ये | २४०रु. | १२०रु. |
| सन्स ऑफ फॉर्च्यून | जेफ्री आर्चर | अजित ठाकूर | ३५०रु. | १७५रु. |
| टॉक्सीन | रॉबिन कुक | प्रमोद जोगळेकर | २५०रु. | १२५रु. |
| मूनरेकर | इयान फ्लेमिंग | उदय नारकर | १५०रु. | ७५रु. |
| साऊथ बाय जावा हेड | ॲलिस्टर मॅक्लीन | अशोक पाध्ये | २५०रु. | १२५रु. |
| फॉर युवर आईज ओन्ली | इयान फ्लेमिंग | अनिल काळे | १२०रु. | ६०रु. |
| मयादा इराकची कन्या | जीन सॅसन | भारती पांडे | २५०रु. | १२५रु. |
| द दा विंची कोड | डॅन ब्राऊन | अजित ठाकूर | ३२०रु. | १६०रु. |
| द लायन्स गेम | नेल्सन डेमिल | अशोक पाध्ये | ६८०रु. | ३४०रु. |






### * मृणालिनी जोगळेकर

ज्येष्ठ लेखिका मृणालिनी परशुराम जोगळेकर (वय ७०) यांचे ३१ मार्च रोजी नाशिक येथे दीर्घ आजाराने निधन झाले.

त्यांच्या मागे पती, एक पुत्र व दोन कन्या असा परिवार आहे. प्रसिद्ध गायिका पद्मजा फेणाणी जोगळेकर त्यांच्या स्नुषा होत.

'संध्याकाळचा चेहरा' या कथासंग्रहाला पंचवीस वर्षांपूर्वी महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळाला होता. तर 'रंग अमेरिकेचे' आणि 'प्रवासिनी' हे त्यांचे लेखसंग्रह. संत तुकारामांच्या साहित्याचे फ्रेंच अभ्यासक फादर दलेरी यांचे चरित्रही त्यांनी लिहिले. टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेसतर्फे 'एकोणिसाव्या शतकातील स्त्रीमुक्तीच्या उद्गात्या' पंडिता रमाबाई, रानडे, जनाक्का शिंदे, ताराबाई शिंदे अशा कर्तबगार स्त्रियांवरील लेखन तीन खंडात तयार केले होते.

सोलापूरच्या डीएव्ही कॉलेजमध्ये आणि पार्ले येथील डहाणूकर कॉमर्स कॉलेजमध्ये त्यांनी मराठीचे अध्यापन केले.


### * जगत मुरारी

'फिल्म इन्सिटट्यूट'चे माजी प्राचार्य आणि ज्येष्ठ चित्रपट निर्माते जगत मुरारी (वय ८५) यांचे १३ एप्रिल रोजी पुणे येथे निधन झाले.

मुरारी यांनी १९५४ मध्ये दिग्दर्शित केलेल्या 'महाबलीपुरम्' या चित्रपटाला राष्ट्रपतींचे सुवर्णपदक प्राप्त झाले होते. 'फिल्म इन्स्टिट्यूट' बरोबरच राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयाच्या जडणघडणीतही मुरारी यांचे योगदान महत्त्वपूर्ण राहिले. जया भादुरी, सुभाष घई, अदूर गोपालकृष्णन, शबाना आझमी आदी नावारुपाला आलेले चित्रकर्मी हे मुरारी यांचे विद्यार्थी होत. मुरारी यांनी स्वप्रयत्नातून १९७५ मध्ये चित्रपट संचालनालयाचेही पुनरुज्जीवन केले. 'जय जवान जय मकान', 'पिया का घर', 'बिजली' आदी चित्रपटांची निर्मिती त्यांनी केली होती.

❐

# ‘टर’ ची टुरटुर



| | | |
|---|---|---|
| पाणी | वॉटर | WATER |
| लोणी | बटर | BUTTER |
| एक सण | इस्टर | EASTER |
| सत्र | सेमिस्टर | SEMESTER |
| पत्र | लेटर | LETTER |
| लेखक | रायटर | WRITER |
| बहीण | सिस्टर | SISTER |
| हिवाळा | विंटर | WINTER |
| मोजण्याचे परिमाण | मीटर | METER |
| पाव भाजण्याचे साधन | टोस्टर | TOASTER |

**बघा बरं, तुम्हांला किती ‘टर’ (TER) सुचतायत.**






# नको रे बाबा पक्ष्याचा जन्म

एक होतं गाव.



डोंगरगाव त्याचं नाव. तिथं पुष्पा नावाची एक मुलगी रहात होती. पुष्पा अंगानं रोड, पण स्वभावानं होती गोड. रंगानं होती गोरी. दिसायला होती बरी.


पुष्पाला फुलं फार आवडायची. गुलाब, मोगरा, जाईजुई! पण तिला सर्वात जास्त आवडायचा तो म्हणजे-गुलाब! गुलाबी रंगाचा. अवीट गंधाचा. त्या गंधाच्या धुंदीत ती रहायची. फुलांशीच बोलायची. फुलांवर बसलेल्या फुलपाखरांशी खेळायची.



तिला नको होता तो अभ्यास. नको होता मैत्रिणींचा सहवास. तिला हवा होता सुगंधी सुवास आणि सहवास. फुलांचा, फुलपाखरांचा.पाखरासारखं



होण्याचा होता तिला हव्यास. आपण पक्षी होऊ. मग खूप हिंडू-बागडू, मजा करू. पाण्यात पंख भिजवून खेळू. झाडावर बसू.



झाडावरची फळं खाऊ. सुरेख व सुंदर फळं. पेरू, आंबा, संत्रा, मोसंबी... फळं खाल्ल्यानं बळ येईल. तिथं अभ्यासाची सजा नाही. आईची किरकिर नाही. वडिलांची किटकिट नाही. दादाची हिटहिट नाही. कोणतीच नाही सजा. असेल फक्त मजाच मजा!

ती मजा आपण मिळवायला हवी. तिनं ठरवलं, पक्षी होण्यासाठी अंबादेवीची प्रार्थना करावी.



ठरवल्याप्रमाणं, गावा-बाहेरच्या दूरच्या देवळात, देवीच्या दारात पुष्पा दाखल झाली. आणि प्रेमभावानं, भावभोळ्या श्रद्धेनं प्रार्थना करू



लागली.



''देवी अंबिके, माझी किनई एक प्रार्थना आहे. मला पक्षी व्हायचंय. बनवशील का मला पक्षी? बनव हं, मी हात जोडून सांगतेय.''

त्या भावभोळ्या मुलीची प्रार्थना ऐकून देवी प्रसन्न झाली. प्रकट होऊन म्हणाली,

''पुष्पा... बेटी, काय हवंय तुला?''

''म... मला किनई... पक्षी व्हायचंय.''

''पक्षी?... अग वेडे, पक्षी होणं चांगलं नाही.''

''चांगलं आहे.''

''वेडी आहेस.''

''असू दे. तू मला पक्षी बनव. नाहीतर मी बोलणार नाही तुझ्याशी. अगदी आपली गट्टी फू...''



आणि ती फुगून आणि फुरंगटून बसली.

ते पाहून देवी हसली. पुष्पाचा हट्ट आणि हक्क देवीला चांगला कळत होता. ती म्हणाली, ''तुझी इच्छा असेल तर बाई, मी तुला अवश्य पक्षी बनवीन.''

''अय्या, खरंच!''

पुष्पाची अचानक कळी खुलली.

''देवी, तू कित्ती कित्ती चांगली आहेस ग! तू... मला किनई तू खूऽप खूऽप आवडतेस.''

देवी हसली.

तिनं पुष्पाच्या डोक्यावर वरदहस्त ठेवला आणि म्हटले,

''तथास्तु!''

आणि पुष्पा पक्षी बनली.



सुरेख व सुंदर पंख... मऊ-मखमली अंग... छोटीशी, अणकुचीदार, बाकदार, टोकदार लाल चोच... छोटे छोटे डोळे!

आगळ्या आनंदाचा आल्हाद अनुभवीत ती वेगळ्या विश्वात आली. आता ती झाडावर बसू



लागली. कधी पिवळ्या पेरूच्या झाडांवर, तर कधी आंबराईतील आंब्यावर! कधी जांभळावर तर कधी तपकिरी रंगाच्या चिक्कूवर!


ती पोटभर फळं खायची. कधी चिकट चिक्कू तर कधी पिवळा पेरू!

तिला भारी मजा वाटे. वसंतऋतूत ती आनंदानं नाचे. तर कधी नदीच्या पाण्यात भिजे.

आनंदी आनंद गडे... जिकडे तिकडे चोहिकडे! अशी तिची अवस्था झाली होती.

आणि इकडे तिच्या आईवडिलांची अवस्था विषण्ण झाली. कारण त्यांची लाडकी पोर पुष्पा बेपत्ता झाली होती. तिच्या शोधाशोधामध्ये ते कावले होते.

पुष्पाची मात्र चैन होती. मनमोकळं हिंडायचं आणि पोटभर खायचं.



असे काही दिवस गेले.

एक दिवस... एके दिवशी पुष्पा आंब्याच्या झाडावर, गर्द सावलीत आंबा खात बसली होती. एक एक चोचीचा घाव त्या आंब्यावर मारत होती. हळूच गळयात गिळत

होती. आंबा खाण्यात ती मोठी मशगूल होती.



एवढ्यात...


ठो... ऽ... ठो... ऽऽ असा मोठा आवाज झाला. कुणी शिकारी हरणाची शिकार करीत होता. त्याच्या बंदुकीचा आवाज होता तो...

तो आवाज ऐकून ती घाबरली. बावरली. चोच चटपट वाजू लागली. अंग थरथर कापू लागली. तिला वाटलं, त्या शिकाऱ्यानं आपल्याला ठार मारलं तर! उगीच आपण पक्षी झालो. पक्ष्यापेक्षा पुष्पाच बरी होती. तिला वाईट वाटलं. पण करेल काय बिचारी?

त्या दिवशी तिच्यावर दुसरं संकट कोसळलं. ती घरात एकटीच होती. वादळवारा आणि पाऊस यांचं तांडवनृत्य सुरू होतं. त्या वादळाच्या तडाख्यात ती रहात होती, तो वृक्ष धाडकन् खाली कोसळला. एखादा पहाड पडावा तसा!

पण सुदैवानं ती वाचली. पण ती भारी पस्तावली. कशाला झालो आपण पक्षी? आता तिला पश्चात्ताप होऊ लागला. काय करावं तिला समजत नव्हतं.







एकदा ती बाहेर फिरायला निघाली. पोटभर फळं खाल्ली आणि सहज आराम करावा म्हणून ती रानात कुणीतरी तयार केलेल्या घरात शिरली. आणि तिथं आरामात झोपली. गुलाबी, सुंदर स्वप्नं पाहात राहिली.

काही वेळानं, तिला जाग आली.

आणि पाहते तर ती एका पारध्याच्या जाळ्यात सापडलेली! तेव्हा तर तिला रडूच कोसळलं.

तो पारधी मोठा पारखी आणि हुशार, चतुर होता. त्यानं पक्ष्याच्या दोन्ही पायांत दोरा बांधला आणि त्याला बाजारात विकायला घेऊन आला.

तिसऱ्या प्रहरापर्यंत तो बसला. पण एकही गिऱ्हाईक फिरकलं नाही. हे पाहून तिला आनंद झाला. पण पायाला बांधलेला दोरा पाहून ती दुःखी झाली. पक्षी झाले नसते



तर किती बरे झाले असते, हा विचार विजेसारखा तिच्या डोक्यात चमकून गेला.

संध्याकाळी मात्र एका हौशी माणसानं तिला विकत घेतलं. तिनं ओळखलं, आत्ता आपली खैर नाही. हा माणूस आपल्याला सुरीनं स्वर्गात देईल पाठवून. आपली भाजी करील. आपलं रक्षण न करता भक्षण करील. खादाड मेला! असा विचार तिच्या मनात आला.

पण त्या माणसानं तिला मारलं नाही. एका पिंजऱ्यात बंद करून ठेवलं.

तो रोज तिची काळजी घ्यायचा. सकाळ संध्याकाळ काही ना काही खायला द्यायचा. पाण्याची पितळी वाटी ठेवायचा.

पण ती तेवढ्यानं सुखी नव्हती. समाधानी नव्हती. तिला स्वतंत्र व समर्थ राहायचं होतं. तेही पक्षी होऊन नव्हे, पुष्पा होऊन! पण ते आता कसं शक्य आहे?

त्या माणसानं तर तिला पिंजऱ्यात बंद करून ठेवलं



होतं. ती त्या पिंजऱ्यातून सुटण्याचा नेहमी विचार करी. पण व्यर्थ!

एक दिवस- काय झालं, त्या माणसाच्या मुलानं तो पिंजरा उघडला आणि त्यातली वाटी काढली. त्या वाटीत पाणी आणण्यासाठी तो आतल्या खोलीत गेला आणि



पिंजऱ्याचं दार बंद करायचा विसरला.

तिनं ही सुवर्णसंधी साधली. आणि ती पिंजऱ्याबाहेर पळाली.

ती थेट देवीच्या देवळात आली.

ती पुन्हा देवीची प्रार्थना करू लागली. ''देवी अंबिके, मला किनई- पुष्पा कर. पहिल्यासारखी हुबेहूब... मला नको ते पक्षी होणं, नको ती फळफळावळं, नको ते हिंडणं-फिरणं... नको ती मजा...'' एवढं बोलून ती रडू लागली.

देवीला तिची दया आली आणि ती पुन्हा प्रकट नि प्रसन्न झाली.

''वेडे, तूच तर पक्षी बनव म्हणाली होतीस मला. मग रहा न् पक्षीच...''

''नको, मी पुष्पाच बरी...''

''अग, पक्षी होण्यात मजा आहे.''

''मजा झाली सजा. मला नको मजा. मला मुलगी बनव.''

देवी हसली. तिनं पुन्हा तिच्या डोक्यावर वरदहस्त ठेवला आणि म्हणाली,

''तथास्तु!''

आणि चमत्कार... ती पुन्हा पुष्पा झाली. तिला खूप आनंद झाला. देवीचं दर्शन घेऊन पुष्पा आपल्या घराकडे पळत सुटली.

पुष्पाला पाहून तिच्या आईवडिलांना आनंद झाला.

**राजीव रोहणकार**

साईनगर, किनवट,जि. नांदेड.



## चित्र रंगवा

○ हिरवा    □ निळा    × लाल

◇ पिवळा    ⁄ नारिंगी





## बालवाङ्‌मय

## चित्रमय रंगतदार कथा

**रंगीत पुस्तकांच्या 'खास' उपक्रमास अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघाचा प्रथम निर्मिती पुरस्कार २००५-२००६**

### वयोगट-८पासून पुढे

| | | |
|---|---|---|
| **चतूर बोकोबा आणि इतर कथा** | वृषाली पटवर्धन | ३० |
| **नशीबवान शेखर आणि इतर कथा** | वृषाली पटवर्धन | ३० |
| **लोखंड खाणारे उंदीर आणि इतर कथा** २००६ | वृषाली पटवर्धन | ३० |
| **सुंठ बिस्किटाचा माणूस आणि इतर कथा** | चारुता पुराणिक | ३० |
| **निद्राराणी आणि इतर कथा** | विजया देशपांडे | ३० |
| **जादूचं खीरपात्र आणि इतर कथा** | अरुंधती पंडित | ३० |
| **टिंबक टू आणि इतर कथा** | मंजूषा आमडेकर | ३० |
| **गम्मत गोष्टी** | मंजूषा आमडेकर | ३० |
| **धमाल गोष्टी** | मंजूषा आमडेकर | ३० |
| **मजेदार लोककथा** | मंजूषा आमडेकर | ३० |
| **आदर्श लोककथा** | मंजूषा आमडेकर | ३० |
| **राजाचं गुपित आणि इतर कथा** २००६ | मंजूषा आमडेकर | ३० |
| **ढुम ढुम ढुमाक आणि इतर कथा** २००६ | मंजूषा आमडेकर | ३० |
| **सोन्याचा पाऊस आणि मजेदार गोष्टी** २००७ | मंजूषा आमडेकर | ३० |
| **ड्रॅगनचे घर आणि मजेदार गोष्टी** २००७ | मंजूषा आमडेकर | ३० |
| **बुडबुड्यांचे विमान आणि इतर गोष्टी** २००६ | अर्चना ओक | ३० |
| **चालणारा हिमपुतळा आणि इतर गोष्टी** २००६ | अर्चना ओक | ३० |
| **छोटुसा पांढरा ससुकला आणि इतर गोष्टी** २००६ | अर्चना ओक | ३० |
| **छोटू किल्लीवाला उंदीर आणि इतर गोष्टी** २००६ | अर्चना ओक | ३० |
| **गंपू चिंपू आणि इतर कथा** २००६ | उमा खरे | ३० |
| **मैत्रीचे मोल आणि इतर कथा** २००६ | उमा खरे | ३० |
| **सिंड्रेला आणि इतर कथा** २००६ | उमा खरे | ३० |
| **घारीची चलाखी आणि मस्त मस्त गोष्टी** २००७ | उमा खरे | ३० |
| **गर्विष्ठ घोडा आणि मस्त मस्त गोष्टी** २००७ | उमा खरे | ३० |



| | | |
|---|---|---|
| **बदकाचे बूट आणि गम्मत गोष्टी** २००६ | उज्ज्वला केळकर | ३० |
| **गर्विष्ठ सूर्यफूल आणि गम्मत गोष्टी** २००६ | उज्ज्वला केळकर | ३० |
| **शेपटीवालं झाड आणि इतर कथा** २००६ | राजीव तांबे | ३० |
| **ससुल्या आणि इतर कथा** २००६ | राजीव तांबे | ३० |
| **शूर ससोबा आणि इतर कथा** २००६ | राजीव तांबे | ३० |
| **चला चहा पिऊया आणि इतर कथा** २००६ | राजीव तांबे | ३० |
| **बंटू बसला ढगात आणि इतर कथा** २००६ | राजीव तांबे | ३० |
| **बंटूचा टिकटिक मित्र आणि इतर कथा** २००६ | राजीव तांबे | ३० |
| **घड्याळातील कोकिळा आणि गडबड गोष्टी** २००६ | निर्मला मोने | ३० |
| **अस्वलाची शेपटी आणि गडबड गोष्टी** २००६ | निर्मला मोने | ३० |
| **खट्याळ खलाशी आणि गडबड गोष्टी** २००६ | निर्मला मोने | ३० |

## आजीनं सांगितलेल्या चातुर्यकथा



| | | |
|---|---|---|
| **पंचतंत्रातील मनोरंजक गोष्टी** | अनिल किणीकर | २५ |
| **पंचतंत्रातील रोचक गोष्टी** | अनिल किणीकर | २५ |
| **पंचतंत्रातील प्रेरक गोष्टी** | अनिल किणीकर | २५ |
| **पंचतंत्रातील बोधपर गोष्टी** | अनिल किणीकर | २५ |
| **हितोपदेश : बोधप्रद कथा** | मोहन वेल्हाळ | २० |
| **हितोपदेश : रोचक कथा** | मोहन वेल्हाळ | २० |
| **जातक कथा : प्रेरक** | निर्मला सारडा | २५ |
| **जातक कथा : रोचक** | निर्मला सारडा | २५ |
| **जातक कथा : शिक्षाप्रद** | निर्मला सारडा | २५ |
| **बिरबल - लाजवाब** | निर्मला सारडा | २५ |
| **बिरबल - विनोदवीर** | निर्मला सारडा | २५ |
| **बिरबलाचे चातुर्य** | निर्मला सारडा | २५ |
| **बिरबलाच्या रोचक गोष्टी** | निर्मला सारडा | २५ |
| **शेखचिल्लीचे किस्से** | निर्मला सारडा | २५ |
| **तेनालीरामचे चातुर्य** | मंजूषा आमडेकर | २५ |
| **तेनालीरामच्या रोचक गोष्टी** | मंजूषा आमडेकर | २५ |